२ ४१७ ; २८५३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय मेरू प्रवास
सं. क्र. ७८५

REFBK-0008143

# त्रिवेंद्रमची सफर

★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 1983

लेखिका

सौ. कमला फडके, एम्. ए.

REFBK-0008143

★

किंमत तीन रुपये

◆ — एकमेव विक्रेते —
कुलकर्णी ग्रंथागार
४४० शनिवार, पुणें २

◆ — प्रकाशिका —
सौ सीताबाई करंदीकर
२९९/१ सदाशिव पेठ पुणें २,

◆ मुद्रक—
ज. ग. जोशी,
ज. स. लि. चा प्रेस
२९४ सदाशिव पेठ, पुणें २.

◆ मुखपृष्ठ चित्रकार मुळगांवकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७९४३

# १

एका कवीनं अंगी चातुर्य आणण्याचे चार मार्ग सांगितले आहेत. पंडितमैत्री, सभेंत संचार, शास्त्रग्रंथविलोकन आणि देशाटन. ह्या चार मार्गांपैकीं पहिल्या तिहींचा अवलंब मीं करून पाहिला आहे. परंतु त्यामुळं अंगीं फारसं चातुर्य आल्याचा अनुभव मला नाहीं! म्हणून शेवटचा देशाटनाचा उपाय संधि सांपडतांच करून पाहायचा असं मीं ठरवलं होतं तशी संधि लवकरच आली. १९४५ सालची फिलॉसफीची कॉंग्रेस त्रावणकोर संस्थानची राजधानी त्रिवेंद्रम् या शहरीं भरणार असल्याची बातमी ऐकतांच या कॉंग्रेसला हजर राहण्याचा बेत आप्पांनीं ठरवला व मीं या बेताला दुजोरा दिला. फिलॉसफीच्या कॉंग्रेसला अप्पांनीं हजर राहावं हें ते फिलॉसफीचे प्रोफेसर असल्यामुळें उचितच होतं.

फिलॉसफी ऑफ जॉग्रफी या विषयावर स्वत: लिहिलेला एक प्रबंधहि ते या कॉंग्रेसपुढं वाचणार होते. प्रश्न होता फक्त माझा. प्रथम लॉजिकची विद्यार्थिनी आणि नंतर एका फिलॉसफरची सहचारिणी यामुळं फिलॉसफी या गहन विषयासंबंधीं माझ्या मनांत जिज्ञासा उत्पन्न झाली होती; परंतु मी त्रिवेंद्रमूला जायचं ठरवलं तें केवळ या जिज्ञासमुळं नव्हे, तर एकदां त्रावणकोरचं सौंदर्य पाहायची इच्छा होती म्हणून. ही इच्छा फार दिवसांपासूनची होती. हिंदुस्थानांतलीं जीं जीं प्रेक्षणीय स्थळं पाहण्याचे बेत आम्ही नेहमीं करीत असूं, त्या स्थळांत त्रावणकोरचं नांव पहिलं असे. त्रावणकोर संस्थानसंबंधींच्या वर्णनपत्रिकादेखील आमच्या संग्रहीं होत्या; उत्तर हिंदुस्थानचं नंदनवन जसं काश्मीर, त्याप्रमाणं दक्षिण हिंदुस्थानचं नंदनवन म्हणजें त्रावणकोर असं म्हणतात. नारळी-पोफळीचीं दाट वनं, मोठमोठे तलाव, हिरव्यागर्द वनश्रीमधून भांगासारखे जाणारे कालवे, उंचउंच घाटमाथ्यावरून कोसळणाऱ्या धबधब्यांचा जलतुषारामुळें शिखराशिखरावरून लटकणारीं इंद्रधनुष्याची तोरणं आणि पूर्व पश्चिम घाटाची वनशोभा खांद्यावर घेऊन एखाद्या आंग्ल युवतीप्रमाणें हिंदी महासागरांत घुसणारी कन्याकुमारी ! अशी ही त्रावणकोरची सृष्टिशोभा काश्मीरच्या हिमाच्छादित पर्वतशिखरांनाहि खालीं पाहावयास लावते असं आम्हीं ऐकलं होतं. अशा प्रेक्षणीय स्थळीं फिलॉसफीची कॉंग्रेस भरणार होती. हा एक सुंदर योगायोगच म्हणावयाचा. कॉंग्रेसला हजर राहाण्याचा परमार्थ आणि त्रावणकोरचं सौंदर्य पाहण्याचा स्वार्थ दोन्ही एकदम साधण्याची संधि आली होती. डिसेंबरच्या एकोणीस तारखेस कॉंग्रेस सुरू व्हावयाची होती. म्हणजे चांगला महिनाभर अवकाश होता. परंतु आमचा उत्साह एवढा दांडगा, कीं बेत ठरल्याबरोबर आम्हीं प्रवासाची तयारी सुरू केली.

आम्हीं म्हणण्यापेक्षां फक्त आप्पांनींच तयारी सुरू केली असंच म्हटलं पाहिजे. आजचं काम उद्यावर ढकलण्याचा माझा स्वभाव. इतक्यांतच कशाला तयारीची घाई करा, अशा 'स्वाभाविक' विचारानं मी स्वतः

स्वस्थ बसलें होतेंच; परंतु आप्पांनीं चालविलेल्या तयारीची खूप चेष्टाहि करीत होतें. एखादी गोष्ट तडीला नेण्याचं त्यांनीं मनांत आणलं कीं, मग त्या बाबतींतील त्यांची तन्मयता, ती शिस्त आणि तो व्यवस्थितपणा कांहीं विचारूं नका! प्रवासाचं नक्की ठरल्यावर त्यांनीं हिंदुस्थानचा नकाशा बाहेर काढला. त्रावणकोर संस्थानचा एक स्वतंत्र नकाशा आणवला, रेल्वेचं नवीन वेळापत्रक खरेदी केलं. निळी तांबडी पेन्सिल, आंखपट्टी वगैरे साहित्य टेबलावर मांडून ठेवलं आणि सवड मिळेल तेव्हां कोल्हापूर ते त्रिवेंद्रम रेल्वेमार्ग, वाटेंतील प्रमुख स्टेशनं, प्रत्येक स्टेशनवर गाडीच्या जाण्यायेण्याच्या वेळा वगैरे सर्व गोष्टींचीं व्यवस्थित टिपणं तयार करण्यांत ते रमून गेले. इतकंच काय, त्यांनीं वरील सर्व माहितीच्या खुणांसह आमच्या प्रवासाचे दोन स्वतंत्र नकाशे आंखून तयार केले. प्रवासाबद्दल मीं एखादा प्रश्न विचारला कीं, माझ्यापुढं नकाशा ठेवून शंभरावयांदा ते मला त्याची उजळणी देत! ही तयारी पुरी झाल्यावर मग त्यांनीं ठिकठिकाणच्या स्टेशन मास्तरांना आमच्या जागा रिझर्व करण्याकरितां पत्रं व तारा पाठविण्यास सुरुवात केली. आमच्या मित्रमंडळींकडुनहि अमुक पाहा, तमुक पाहा अशीं पत्रं येऊं लागलीं. त्या महिनाभरांत आमच्या टपालांत आणि संभाषणांत दुसरा विषय नव्हता. खालीं सैंपाकघरांत प्रवासाच्या फराळाची तयारी सुरू झाली. आमच्या बेबी रोहिणीला ताब्यांत घेण्यासाठीं माझी आईहि गावाहून आली. डिसेंबरचीं पंधरा तारीख उजाडली आणि "उद्यां पहाटे सहाच्या गाडीनं निघायचं" असं आप्पा म्हणाले तेव्हां "ससा आणि कासव" या गोष्टींतल्या सशाप्रमाणें मी खडबडून जागी झालें आणि बॅगमध्यें हव्या त्या साड्या आणि वस्तु भरण्याची माझी धांदल धांवपळ सुरू झाली. तयारी आटोपल्यावर मीं एक निःश्वास टाकला. एका दिव्यांतून तरी मी पार पडलें होतें. आतां दुसरं दिव्य होत-तें म्हणजे पहाटे उठण्याचं. वास्तविक पांचाचा गजर लावून ठेवायला हवा होता. परंतु बेबी मधून मधून गजर करतेच कीं; मग आणखी दुसरा गजर हवा कशाला, अशी कोटि करून आणि 'उद्यां पहाटे उठायचं हं'

असं एकमेकांना बजावून आम्ही झोपीं गेलों. मला एकदम टांग्याची आठवण झाली. मीं आप्पांना विचारलं, "टांगा सांगून ठेवला आहे?" आप्पा म्हणाले. "अगदीं आपल्या शेजारचाच टांगेवाला ठरवला आहे. 'पहांटे पांच वाजतां दारासमोर हजर हो' असं बजावलं आहे मी त्याला."

परंतु आप्पांची एक महिन्याची आणि माझी एका दिवसाची तयारी फुकट जाणार असा योगायोग होता. टांगेवाल्यानं वेळेवर हजर होणं आणि आम्हीं पहाटे उठणं या दोन्ही गोष्टी अशक्यच होत्या. सकाळीं आम्ही खडबडून जागे झालों आणि पाहतों तों घड्याळांत साडेपांच वाजून गेले होते. आणि टांगेवाल्याचा तर पत्ताच नव्हता! स्टँडवरून दुसरा टांगा आणण्यासाठीं गडी धावत पाठविला; पण तो लवकर येईना. पहिल्या टांगेवाल्याच्या घरीं मोलकरीण धाडली. ती सांगत आली कीं, टांगेवाला वर्दीला गेला आहे. आमचे डोळे घड्याळाकडे आणि टांग्याकडे लागून राहिले होते. पावणेसहा वाजले तशी गाडी साधण्याची आशा आम्ही सोडली. प्रवासाची सारीच घडी अशी विसकटावी, महिनाभर तयारी करून अखेर एका टांगेवाल्याच्या हलगर्जीपणामुळं सारा घात व्हावा याबद्दल संताप करावा कीं दुःख करावं हेंच कळेना! इतक्यांत बाहेर टांगेवाल्याची बायको ओरडली, "आला हो टांगा आमचा," आम्हीं झटकन् गॅलरींत गेलों आणि रस्त्यांत पाहिलं तो टांगा तर दिसत नव्हता. ती पुन्हां ओरडली, "हा आमच्याच घुंगराचा आवाज नव्हं का!"

टांगा दारासमोर येऊन उभा राहतांच एकच घाई उसळली. आप्पांचा रागहि उसळला. वर्दी घेऊन वेळेवर हजर न राहण्याबद्दल ते टांगेवाल्याची हजेरी घेत होते. "आतां गाडी साधली तर बरं, नाहींतर तमाशा दाखवतों.' एवढंच त्यांचं वाक्य मी ऐकलं. समोर चहा होता. पण तो देखील मीं घेतला कीं नाहीं कुणास ठाऊक! पावणेसहा वाजून गेले होते. स्टेशन दीड मैलावर. पंधरा मिनिटांत गाडी साधायची होती. आम्हीं सारा हवाला घोड्यावर ठेवला. बेबीचे घाईघाईनं पापे घेतले आणि टांग्यांत बसलों. टांगा स्टेशनांत शिरला तेव्हां सहा वाजून गेले

होते. दुसरी घंटा झाली होती. आणि उतारू आपापल्या जागा धरण्यासाठी गाडीकडे धावत होते. आप्पांनीं काय जादू केली कुणास ठाऊक; पण हाललेली गाडी पांच मिनिटं थांबली. सामानाची, तिकिटाची सर्व व्यवस्था लावून आम्ही आमच्या डब्यांत बसलों. थंडी विलक्षण पडली होती; अजून पुरतं उजाडलंहि नव्हतं. आतां सारे उतारू गाडींत चढले होते. स्टेशनमध्यें दिवे मिणमिण जळत होते. त्यामुळें स्टेशनचा प्लॅटफॉर्म ओकाओका दिसत होता. कोल्हापूर सोडतांना मला नेहमीं अवघड वाटतं. परंतु आतां गाडी स्टेशनाबाहेर पडत असतांना माझं मन आनंदानं भरलं होतं. मीं त्या रिकाम्या प्लॅटफॉर्मवरची नजर काढली आणि आंत पाहतें तों आप्पा मोठ्या ऐटींत सिगारेट ओढीत बसले होते. गाडी पकडल्याचा पराक्रम त्यांच्या मुद्रेवर अगदीं उघडउघड दिसत होता. मला हंसू लोटलं. मी त्यांना विचारलं, "तुम्ही टांगेवाल्याला काय बोललांत आठवतं ?" एक जोराचा झुरका घेऊन त्यांनीं विचारलं, "काय म्हटलं ?" "गाडी चुकली तर तमाशा दाखवीन असं म्हणालांत." "असं म्हणालों ?" असं विचारून ते हंसू सुटले. मीं आप्पांना म्हटलं, "गाडी साधली अन् तमाशा चुकला !"

पुढे प्रत्येक स्टेशनावर गाडी थांबत होती. परंतु आमच्या गप्पागोष्टी, हास्यविनोद थांबला नव्हता. आठ वाजतां गाडी मिरजेवर थांबली तेव्हां आम्हांला चहाची आठवण झाली. बेळगांवसाठीं आम्हांला गाडी बदलावयाची होती परंतु त्या गाडीला चांगला अडीचतीन तास अवकाश होता. तेवढ्या वेळांत आम्हांला स्वस्थपणानं चहा घेतां आला असता. सकाळीं गाडी साधण्याच्या गडबडींत आपण चहा घेतला नसावा अशी दाट शंका मला होतीच. आम्ही स्टेशनवरच्या उपहारगृहांत गेलों आणि पोच्ड एग, टोस्ट चहाची न्याहारी केली आणि सव्वा अकराला बेळगांवकडे जाणाऱ्या गाडींत बसलों.

सूर्य वर आला असला तरी हवेंतली थंडी कमी झालेली नव्हती. खिडकींतून बाहेर पाहावत नव्हतं. कोल्हापूर सोडल्यानंतर रुकडी, हातकणंगलें, जयसिंगपूर हीं तीनच लहान स्टेशनं लागत असलीं, तरी रेल्वे

मार्गाच्या दोन्ही बाजूंनीं दिसणारी अस्सल मराठी थाटाची सृष्टिशोभा पर-क्याला विलोभनीय वाटली असती. परंतु असा नियम आहे, कीं आपल्या बंगल्यांतल्या बगीच्याकडे आपणांपेक्षा रस्त्यानं येणारेजाणारे लोकच अधिक पाहतात ! तेव्हां मिरजेपर्यंत आणि आतां मिरज स्टेशनांतून गाडी बाहेर पडल्यावरहि बाहेरच्या सृष्टिशोभेकडे आमचं लक्ष गेलं नाहीं. दुसरं असं, की मिरज बेळगांव मार्गांत दिसणारी सृष्टिशोभा आमच्या परिचयाची होती. तिन्हाइताला आमच्या महाराष्ट्रांतल्या शेतांत चरणारीं गुरं वासरं, मळ्यांत चालणारी मोट, गर्द छायांचे वडपिंपळ आणि वांकडीतिकडी कांटेरी बाभळ सपाट मैदानं, आणि उघड्या टेकड्या हीं दृश्यं नावीन्यपूर्ण वाटलीं असतीं. आम्हांला तीं नेहमींचींच होती. बेळगांवला पोंचण्यास चांगला एकदीड वाजणार होता. करमणुकीचं भरपूर साहित्य आम्ही बरोबर घेतलंच होतं. मी बॅग उघडली आणि इंग्रजी मासिकांचे ताजे अंक, फराळाचा डबा आणि पानाचा डबा वगैरे साहित्य बाहेर काढलं. त्यामुळं दीड वाजला केव्हां तें आम्हांला समजलंदेखील नाहीं. पाच्छापूर, सुलधाल, सुळेभावी हीं छोटींछोटीं स्टेशनं लागलीं तेव्हां आम्हीं आमचीं करमणुकीचीं साधनं आवरलीं. सुळेभावीनंतरचं स्टेशन बेळगांव. बेळगांवच्या स्टेशनांत गाडी शिरली तेव्हां दीड वाजला होता. हुबळीकडे जाणारी गाडी चार पंचे-चाळीसला सुटायची होती. मधले दोन तास ठळकवाडीला माझ्या बहिणीच्या घरीं घालवायचे असं आधींच ठरलं होतं. व त्याप्रमाणें माझे मेहुणे श्री. नारायणराव संत हे आम्हांला उतरून घेण्यास स्टेशनवर आले होते. आम्हीं सामान क्लोकरूममध्यें ठेवलं आणि स्टेशनबाहेर पडलों. स्टेशनबाहेरच्या आवारांत बेळगांवच्या प्रसिद्ध धमण्या उभ्या होत्या. गेल्या पंधरा वर्षांत बेळगांव खूपच सुधारलं आहे. नवीन सुंदर प्रशस्त रस्ते, नवीन इमारती, नवीन आधुनिक तऱ्हेचीं हॉटेलं व नवीन थिएटरं यांमुळं बेळगांव शहर अधिक सुधारलेलं दिसलं. परंतु जुन्या बेळगांवची एक खूण—ह्या धमण्या किंवा बैलगाड्या अजून टिकलेल्या पाहून मला मौज वाटली. आम्ही एका टांग्यांत बसलों आणि ठळकवाडीकडे निघालों.

टांगा पॉवरहाऊसच्या टुमदार इमारतीवरून वळला आणि ग्रेन्रोर्न-रोडमध्यें शिरला तेव्हां माझ्या मनांत अनेक स्मृति जागृत झाल्या. याच रस्त्यानं मी व माझ्या मैत्रिणी सायकलवरून रमतरमत शाळा कॉलेजला जात असूं. त्या काळीं हा रस्ता खडीचा होता आणि आतां डाव्या बाजूनं जिथं मिलिटरी बराकी आहेत, तिथं भरघोस पिकांचीं शेतं होतीं. ज्या कॉंग्रेसच्या विहिरींत आम्हीं रोज सकाळीं पोहायला जात असूं ती विहीर ओलांडून टांगा ठळकवाडीच्या वसाहतींत शिरला. वेळ दुपारची होती; परंतु दोन्ही बाजूंनीं बागबगीचे आणि झाडांमुळं ठळकवाडीचे गुलाबी रस्ते मुळींच रखरखीत वाटत नव्हते. ठळकवाडी ही वसाहत सौंदर्याच्या, स्वच्छतेच्या आणि आरोग्याच्या दृष्टीनें मोठी नमुनेदार संस्था आहे यांत शंका नाहीं. थंड, आल्हाददायक हवा आणि नयनरम्य हिरवीगार सृष्टि-शोभा यांमुळें ठळकवाडीला कर्नाटकाचं माथेरान असं म्हणतात. आक्काच्या बंगल्यावर गेलों तेव्हां प्रवासाचा उरलासुरला शीणहि नाहींसा झाला. स्नान, जेवण आटोपून आम्ही पान खाण्यासाठीं बाहेरच्या खोलींत येऊन बसलों. मीं पानाचा डबा उघडला तों त्याखालीं चिं. वि. जोश्यांचं 'संचार' हें पुस्तक मला आढळलं. त्यांत एक प्रकरण त्रिवेंद्रमवर दिसलं. परंतु तें चाळून पाहण्याचा मोह आवरून मीं पुस्तक परत टेबलावर ठेवलं. खुनी कोण याचा उलगडा आधींच झाला तर खुनाच्या रहस्यकथेंत मजा ती काय राहिली ? प्रवासाचीदेखील तीच गंमत आहे. आम्ही ज्या प्रवासाला निघालों, त्या प्रवासांतला अनपेक्षितपणा, नाविन्य, ताजेपणा, जोश्यांचं वर्णन वाचून खचित नाहींसा झाला असता.

साडेचार वाजतां आक्काचा, नारायणरावांचा निरोप घेऊन आम्ही ठळकवाडी सोडली; स्टेशनवर आलों आणि गाडींत सामान चढवलं. बरोबर चार पंचेचाळीसला गाडी बेळगांव स्टेशनाबाहेर पडली.· साडेचार वाजून गेले तरी उन्हाची तीव्रता कमी झाली नव्हती. बासुंदी-पुरीचं जेवण झाल्यामुळं डोळ्यांत झोंप भरली होती. डब्यांत जे लोक होते ते बहुतेक कानडी बोलणारे होते. आतां हुबळीपर्यंतचा प्रवास कंटाळवाणा होणार

अशी भीति वाटूं लागली. परंतु आमच्याजवळचा विनोदी गोष्टींचा व घटनांचा सांठा या वेळीं उपयोगी पडला व एरवीं जो प्रवास रडतखडत करण्याची पाळी आली असती, तो प्रवास आम्हीं हंसतखेळत केला. बेळगांवनंतर देसूर, गुंजी, खानापूर हीं छोटीं स्टेशनं सोडून गाडी पुढं जाऊं लागली तसं कर्नाटकाचं निराळं वातावरण दिसूं लागलं. पुढेंपुढें मराठी भाषा ऐकूं येईनाशी झाली. देवरायी, नागरगाळी तावरगट्टी, अळणावर या स्टेशनांवर तर महाराष्ट्रीयांचा अगर मराठीचा मागमूसहि दिसला नाहीं. कानडी बोलणारीं, व्यापारी गबाळा पेहराव केलेलीं कर्नाटकी माणसंच प्लॅटफॉर्मवर दिसत.

गाडी हुबळी स्टेशनांत थांबली तेव्हां नऊ वाजले होते. गुंटकलकडे जाणारी गाडी दहा वाजतां सुटायची होती. म्हणजे एक तास अवकाश होता. परंतु गुंटकलच्या गाडीवर गर्दी फार असल्याचं दिसतांच आम्हीं प्रथम आमच्या जागा ताब्यांत घेतल्या आणि बर्थवर बिछाने पसरून ठेवले. आतां जेवण्याइतकी भूक नव्हती, म्हणून आम्हीं कॉफी घेतली आणि जागेसाठीं धांवपळ, धडपड आणि प्रसंगीं तोंडातोंडी करणाऱ्या उतारूंच्या जमावाकडे पाहात राहिलों. आतां एवढे उतारू या गाडींत मावणार तरी कसे हा प्रश्न मला पडला होता! त्रासिक, रागीट चेहरा करून, एकदोन गृहस्थ आमच्या डब्यावरील रिझर्वेशनच्या नांवावर हातांतील टॉर्चचा प्रकाश पाडीत आणि आपलं नांव त्यावर नसलेलं पाहून कानडींत चडफडत. त्यांच्यामागें त्यांचीं बायकामुलं आणि त्याहीपेक्षां डोक्यावर ट्रंका घेऊन तिष्ठत असलेले हमालहि चिंताग्रस्त दिसत होते. अखेर गाडी सुटली आणि पार हुबळी स्टेशनाबाहेर गेली तेव्हां आतां आपल्या जागेला कोणता धोका नाहीं अशा विचारानं माझी भीति दूर झाली. मीं उशागतीची खिडकी बंद केली आणि निजण्यापूर्वीं आम्हीं एकमेकाला बजावलं, "उद्यां पहाटे उठायचं हं." आणि मग कोल्हापूरची आठवण होऊन आम्हांला भयंकर हसूं लोटलं.

मी जागी झालें तेव्हां गाडी कुठल्याशा स्टेशनांत थांबली होती. हें

गुंटकल तर नसेल, या विचारानं मी खडबडून उठलें आणि खिडकी खालीं सरकविली. खिडकीबाहेर किती विचित्र दृश्य मला दिसलं! एका रात्रींत किती वेगळया वातावरणांत आम्ही आलों होतों! प्लॅटफॉर्मवर उभ्या असणाऱ्या स्त्रीपुरुषांचे पोषाख माझ्या महाराष्ट्रीय दृष्टीला किती विचित्र वाटत होते! पुरुषांच्या त्या लुंग्या, उपरण्याऐवजीं खांद्यावर टाकलेले तांबड्यानिळया किनारीचे टर्किश टॉवेल्स, मस्तकावरचे लांब शेंड्यांचे बुचडे, ना धड सकच्छ, ना विकच्छ अशा चमत्कारिक पद्धतीनं साड्या गुंडाळलेल्या, कानांत खड्यांचीं फुलं आणि नाकांत चमकी घातलेल्या स्त्रिया सारंच कांहीं मला विचित्र वाटलं. मीं खिडकीबाहेर वांकलें आणि दूर प्लॅटफॉर्मच्या टोकाशीं स्टेशनच्या नांवाची इंग्रजी पाटी होती ती वाचली तों त्यावर लिहिलं होतं—'गुंटकल.'

गुंटकल स्टेशनवर आम्हांला गाडी बदलायची होती. दोन तास अवकाश होता. आम्ही सामान गाडींखालीं उतरवून घेतलं आणि हमालाच्या ताब्यांत दिलं. आणि स्टेशनवरील वेटिंग रूमकडे गेलों. थंड पाण्यानं हातपाय, तोंड धुतांच आम्हांला एकदम हुशारी वाटली. वेटिंग रूममधील वाटोळया टेबलावर आम्ही समोरासमोर बसलों. आप्पा दाढी करूं लागले आणि मी माझं मेक-अपचं सामान काढलं. आधीं कुणाचं आटोपतं याची आम्हां दोघांत शर्यतच लागली होती. पण अखेर 'मॅच' ड्रॉन झाली! आठ वाजले होते. आणखी एक तास अवकाश होता व तेवढ्यांत आम्हांला चहा आटोपायचा होता. लिपस्टिक, पॉवडर, क्रीम वगैरे वस्तु मीं झटकन् बॅगमध्यें भरल्या आणि आम्ही रिफ्रेशमेंटरूममध्यें गेलों. एग्ज, टोस्ट, चहाची न्याहारी करून आम्ही परत प्लॅटफॉर्मवर आलों. आता सकाळचीं कोवळीं उन्हं पडलीं होतीं आणि स्टेशच्या त्या दगडी इमारतींत, दगडी प्लॅटफॉर्मवर एक तऱ्हेचीप्रसन्नता भरली होती. आमच्या भोंवतालचा प्रदेश नवखा होता, आजूबाजूला हिंडणारे स्त्रीपुरुष नवखे होते, त्यांची भाषा नवखी होती आणि या नवखेपणामुळंच प्लॅटफॉर्मवर इकडून तिकडे हिंडण्यांत आम्हांला मौज वाटत होती. विशेषत: त्या स्टेशनवरील रेल्वे पोलिसांच्या

त्या प्रचंड पगड्या पाहून आम्हांला हसूं लोटलं. एरवी पोलिसाला पाहा-तांच जो दरारा वाटला पाहिजे तो या त्यांच्या विचित्र टोप्यांमुळें अजिबात वाटत नव्हता. स्टेशनवरल्या स्त्रीपुरुषांच्या पेहरावाकडे आम्ही जितक्या जिज्ञासेनें पाहात होतों, तेवढ्याच कुतूहलानं ते लोकदेखील आमच्याकडे पाहात होते. जसजसं महाराष्ट्रापासून आमचं अंतर वाढत गेलं, तसतसं या नव्या प्रांताच्या आणि आमच्या सौंदर्यविषयक कल्पनांतील अंतर कळून येऊं लागलं व महाराष्ट्रापासून दूर आल्याची जाणीव होऊं लागली.

नऊ वाजतां गुंटकल स्टेशन सोडून आमची गाडी निघाली. आमच्या डब्यांत फारशी गर्दी नव्हतीच. मद्रासचे एक ॲडव्होकेट गुप्ता, रजेवर घरीं चाललेले तिघे सैन्यांतले तरुण व आम्ही दोघं एवढीच मंडळी आमच्या डब्यांत होती. गुंटकलवर ताजीं वर्तमानपत्रं घेतलीं होतीं तीं वाचण्यांत प्रथम थोडा वेळ गेला व मग मीं माझी दृष्टि खिडकीबाहेर वळवली. गाडीच्या दोन्ही बाजूंना सपाट मैदानं होतीं आणि अधूनमधून शेती जमिनीचे चौकोनी तुकडे दिसत आणि विशेष म्हणजे आपल्या महा-राष्ट्रांत सहसा न आढळणाऱ्या तांबड्या रंगाच्या शेळयांचे कळप चरतांना दिसले. ताडपत्रीं हें लहानसं स्टेशन मागें टाकून गाडी कोंडापुरम् स्टेश-नांत उभी राहिली तेव्हा सव्वाअकरा वाजले होते. आप्पांचीं वर्तमानपत्रं वाचून झालीं होतीं. कोंडापुरम् सारख्या लहानशा स्टेशनवर करमणूक होण्यासारखं कांहीं न आढळल्यामुळें मीं फराळाचा डबा उघडला होता. इतक्यांत “ काय फडकेसाहेब ” अशी अगदीं पुणेरी मराठींत कोणीं हांक मारलेली ऐकूं आली. आम्हीं वळून पाहिलं, तों डोकीवर शुभ्र रुमाल, खांद्यावर उपरणं आणि लांब कोट घातलेले एक गृहस्थ खिडकीशीं उभे राहून हसत होते. अप्पांनीं त्यांना डब्यांत बोलावलं आणि त्यांची माझी ओळख करून दिली. फर्ग्युसन कॉलेजचे फिलॉसफीचे प्रोफेसर दामले ते हेच असं आप्पांनीं सांगतांच मी त्यांना नमस्कार केला; फर्ग्युसन कॉलेजचे फिलॉसफीचे प्रोफेसर हें ऐकून आधींच माझं मन दडपलं होतं. त्यांतून प्रोफेसरसाहेबांच्या पोषाखावरून ते अगदीं बेताब बात, अबोल आणि

कडक असावेत असा संशय मला आल्यामुळं मीं नमस्काराबरच आवरतं घेतलं. परंतु पुष्कळदा प्रथमदर्शनीं बनविलेलीं मतं चुकीचीं ठरतात. कोंडापुरम् ते येरागुंटला स्टेशनपर्यंत जवळजवळ पाऊण तास त्यांनीं आमच्याशीं मन मोकळ्या गोष्टी केल्या आणि माझं मत चुकीचं ठरवलं. प्रो. दामलेहि आमच्याप्रमाणंच त्रिवेंद्रमच्या कॉंग्रेसला निघाले होते ही गोष्ट आम्हांला फार आनंदाची वाटली.

येरागुंटला स्टेशनवर गाडी थांबली तशी दामले आपल्या डब्यांत गेले. परंतु डब्यांतल्या गप्पा कांहीं थांबल्या नाहींत. मद्रास इथं नुकत्याच झालेल्या क्रिकेट मॅचचा विषय निघाला. क्रिकेट हा खेळ चान्सचा खेळ आहे म्हणून ॲडव्होकेट गुप्तांना नापसंत होता. स्वतः आप्पांचं क्रिकेटचं प्रेम अमर्याद असल्यामुळं ते गुप्तांशीं वाद करूं लागले. क्रिकेटची मॅच चालू असावी त्याप्रमाणं त्यांचं शाब्दिक बोलिंग आणि बॅटिंग चाललेलं ऐकून आम्हांला मौज वाटली. अर्थात् वेळ संपला म्हणून ही मॅच ड्रॉन झाली हें सांगायला नकोच ! त्या तिघां सैनिकांपैकीं एकानं फोनोग्राफची पेटी आणली होती ती उघडली आणि रेकॉर्ड लावण्यास सुरवात केली. त्यांपैकीं एक रेकॉर्ड ते पुनः पुन्हा लावीत. तें त्यांच्या आवडत्या गायिकेचं एम्. एस्. चं रेकॉर्ड होतं. या एम्. एस्. कोण असं आम्हीं विचारलं तेव्हां एम्. एस्. म्हणजेच प्रख्यात गायिका सुबु लक्ष्मी असं त्यांनीं सांगितलं. सकाळीं वर्तमानपत्रांत मद्रासेंत सर्व प्रसिद्ध गायकांचा संगीत जलसा होणार असल्याची बातमी आम्हीं वाचली होती. संधि मिळाली तर एम्. एस्. च्या जलशाला जायचं आम्ही ठरवून टाकलं.

गाडी एका लहानशा स्टेशनांत थांबली तशी मीं खिडकीबाहेर पाहिलं. या स्टेशनाचं नांव होतं.–'कमलापुरम्.' स्टेशनला माझं नांव दिलं असेल असं समजणं भलत्याच धाडसाचं होतं; परंतु मला तो मोह आवरेना व आप्पांच्याकडे मी किंचित् गर्वानं पाहिलं. परंतु या युद्धकालीन परिस्थितींतहि माझ्या गर्वाला घर तावडतोब खालीं करावं लागलं! पाऊण वाजतां

गाडी पुन्हा एका स्टेशनांत थांबली. स्टेशनवरील पाटीवर ठळक इंग्रजी अक्षरांत लिहिलं होतं–'कुडाप्पा'!

कुडाप्पा स्टेशन चांगलं मोठं आहे. स्टेशनच्या इमारतीपलीकडे दूरवर पांढऱ्या दगडाच्या टेकड्या दिसल्या. पांढऱ्या दगडाविषयीं कुडाप्पा फार प्रसिद्ध आहे म्हणे. परंतु एका बाबतींत मात्र कुडाप्पा कुप्रसिद्ध असल्याचा आम्हांला अनुभव आला. बेळगांव सोडल्यापासून आम्ही आमची भूक ब्रेड बटर ऑमलेटवर भागविली होती. कुडाप्पा स्टेशनवर चांगलं ब्राह्मणी पद्धतीचं जेवण मिळतं असं कळल्यावरून या स्टेशनवर दोन थाळ्यांची आम्हीं तारेनं ऑर्डर दिली होती. गाडी थांबतांच जेवणाचे दोन डबे घेऊन हॉटेलचा मनुष्य आला. कमरेइतके उंच दोन जेवणाचे डबे पाहू-नच मला आश्चर्य वाटलं. आणि कुतूहलहि. मीं भीतभीतच एक डबा उघडला तों आंत जेवणाचा थाट कांहीं अपूर्व होता. शेरभर ताक, चार कढीलिंबांचीं पानं, वर तरंगत असलेलं साराचं शेरभर तांबडंलाल पाणी, कच्च्या केळ्यांची सुकी भाजी आणि दहा माणसांना पुरेल येवढा भाताचा ढीग! कोणच्याहि परिस्थितींत डगमगायचं नाहीं या वचनाची आठवण केली, इतर पदार्थ वाईट असले तरी ताक किती मधुर, असं म्हणत आम्हीं जेवणाची भूक ताकावर भागवली!

कुडाप्पा स्टेशन मागं टाकून चारदोन मैल गाडी गेल्यावर आमची उरलीसुरली तहानभूक हरपावी अशीच सृष्टिशोभा दिसूं लागली. आतां-पर्यंत डोंगरमाथे अस्पष्ट दिसत होते ते जवळ आले आणि जवळूनहि ती प्रचंड पर्वतांची रांग आम्हांला साजरी दिसली. मध्यान्ह थोडी कलली होती. सूर्याचीं तिरकीं किरणं पडून, पर्वतांचे त्रिकोनी माथे व उतरणी उजळ दिसत होत्या, आणि दऱ्यांचा गडद निळा रंग अधिक उठून दिसत होता. सूर्य जसजसा कलूं लागला तशी घाटांवरची निळयापांढऱ्या छाया-प्रकाशाची हालचाल अधिक विलोभनीय दिसूं लागली.

नंदलूर, रझमपेटा, कोडूरू–एकामागून एक स्टेशनं मागं टाकून गाडी धांवत होती. आतां डब्यांत ऊष्मा वाढला होता. बहुतेक सारी मंडळी

डोळे मिटून पडली होती. मीं मात्र माझे डोळे चक्क उघडे ठेवले होते. हा प्रदेश मी प्रथम आणि कदाचित् अखेरचा पाहात होतें आणि माझ्या दृष्टींतून त्याचा कोणताहि भाग सुटूं नये अशी माझी इच्छा होती. बाहेर उन्हाच्या झळा उसळत होत्या; परंतु सृष्टिशोभेवर माझी नजर लुब्ध होऊन खिळून राहिली होती. कोड्डूरू स्टेशन सोडल्यावर दूरवर तिरूपतीच्या टेकड्या दिसल्या. दक्षिणेंत तिरूपतीचं देवस्थान फार मोठं समजलं जातं. इथें दसऱ्याला मोठा ब्रम्होत्सव साजरा करतात आणि सबंध हिंदुस्थानांतून असंख्य स्त्रीपुरुष यात्रेसाठीं जमतात. साडेतीन वाजतां गाडी रेणीगुंठा स्टेशनमध्यें थांबली. इथून बालाजीचं आणि कालहस्तीचं देवालय दिसलं. तिरूपती, बालाजी, कालहस्ती ही देवालयं अवश्य पाहा असा आमच्या सैनिक मित्रांनीं सल्ला दिला. आम्हींहि होय म्हटलं रेणीगुंठानंतर तोड्डकू, तिरुतम, आर्कोनम हीं स्टेशनं लागोपाठ गेलीं. त्रिवेलोर स्टेशनांत गाडी थांबली तेव्हां सहा वाजले होते. हवा मोठी आल्हाददायक पडली आणि मद्रासला पोंचण्यास अवघा एक तास उरला होता.

बरोबर सात वाजतां आम्ही मद्रास स्टेशनवर आलों. गुप्तांचा व त्या तिघां सैनिकांचा आम्हीं निरोप घेतला आणि प्लॅटफॉर्मवर उतरलों. मद्रास स्टेशन मला खूप मोठं आणि प्रशस्त वाटलं. आतां गाडींतून शेंकडों उतारू खालीं उतरले होते तरी गर्दी वाटत नव्हती. आमचे स्नेही आणि आंध्र पत्रिकेचे माजी संपादक श्री. शेषय्या आम्हांला भेटणार होते. ते कोठें दिसतात का पाहावं म्हणून प्लॅटफॉर्मच्या दोन्ही टोकांना लांबवर आम्ही पाहूं लागलों. तों एकदम शेषय्या आमच्यासमोरच उभे राहिले आणि आनंदभरानं आप्पांचे दोन्ही हात त्यांनीं आपल्या हातांत धरले. महाराष्ट्र समाजाचे जोशी व मानेगांवकरहि आले होते.

परंतु भेटीचा आनंद अधिक लांबवणं शक्य नव्हतं. मद्रास शहरच्या दुसऱ्या भागांत एगमोर स्टेशन आहे; तिथून त्रिवेंद्रमची गाडी बरोबर साडेसातला सुटते; टॅक्सी मिळाली तरच ही गाडी मिळूं शकते म्हणून शेषय्यांनी टॅक्सीची व्यवस्था केली होती. टॅक्सी प्लॅटफॉर्मसमोर स्टेशनच्या

इमारतींत येऊन उभी राहिली होती. प्लॅटफॉर्मवर मोटारींची ये—जा मी प्रथमच पाहात होतें. आम्हीं गाडींत बसणार इतक्यांत आमचं सामान ताब्यांत घेणारा हमाल सामानासह कुठं बेपत्ता झाल्याचं आमच्या लक्षांत आलं. त्याला धुंडण्यासाठीं शेषय्या गेले, त्यांच्या मागोमाग जोशी मानेगांवकरहि नाहींसे झाले व आम्ही हतबद्ध होऊन लोखंडी खांबाला टांगलेल्या भल्या-मोठ्या घड्याळ्यांतील धांवत्या मिनिट-कांट्याकडे पाहात उभे राहिलों. इतक्यांत हमालाला घेऊन शेषय्या धांवत आले आणि आम्हीं एगमोर स्टेशन गाठलं.

त्रिवेंद्रमच्या गाडींतील आमचा डबा अगदीं लहान चार बर्थचा होता. आमच्याबरोबर मुंबईचे एक दक्षिणी ॲडव्होकेट व प्रो. बटलर हे दोघे होते. प्रोफेसर बटलर यांची व आप्पांची पूर्वींचीच ओळख होती. आणि माझी नुकतीच झाली होती तरी बटलर अगदी जुनी ओळख असल्याप्रमाणं आमच्याशीं मनमोकळेपणानं बोलत होते. बटलरसाहेबांनीं आम्हांला त्रिवेंद्रमूवर लिहिलेलं एक इंग्रजी पुस्तक दाखविलं आणि त्रावणकोरचा नकाशा दाखविला. कुणाला ऑटोग्राफ जमविण्याचं तर कुणाला जुनीं नाणीं किंवा तिकिटं सांठविण्याचं वेड असतं. तर बटलरना नकाशे जमविण्याचं वेड होतं. असा कांहीं संग्रह करण्याचा नाद असणारीं माणसं फाजील व्यवस्थित असतात. त्रिवेंद्रम्च्या कॉंग्रेसचा विषय निघतांच बटलरसाहेबांनीं आपल्या बॅगमधून एक भली मोठी फाईल काढली. त्यांनीं स्वतः लिहिलेल्या प्रबंधापासून तों "तुमची उतरण्याची सोय त्रिवेंद्रम् येथील मॅस्कट हॉटेलमध्यें केली आहे," अशा सेक्रेटरीच्या पत्रापर्यंत सर्व बारीकसारीक शंकाकुशंका फेडणारा पत्रव्यवहार या फाइलमध्यें त्यांनीं तारीखवार टाचून ठेवला होता. आम्हीं कांहीं शंका प्रगट केली की चट्कन् ते फाईल उघडून हवं तें पत्र शोधून काढीत व आमच्या शंकेचं निरसन करीत. एकंदरींत बटलरसाहेब मोठे गमतीदार मिशनरी वाटले. मिशनरी गोऱ्या लोकांत दोन प्रकार असतात, शहाणे व अतिशहाणे. या दुसऱ्या प्रकारांत बटलरची गणना करतां आली असती. बटलरसाहेबांचा खाकी पोषाख,

पोरसवदा बोलणं चालणं आणि चेहऱ्यावरचा मिशनरी भाबडेपणा पाहून ते एखाद्या कॉलेजांत तत्त्वज्ञान शिकवीत असतील ही गोष्ट खरी वाटली नसती.

बटलरपेक्षांहि ॲडव्होकेटसाहेबांशीं जें आमचं संभाषण झालं, तें अधिक मनोरंजक आणि उद्बोधक होतं. मागं एकदा मुंबईच्या रस्त्यांत आप्पांना त्यांचा बालपणीचा एक मित्र भेटला व त्यांनं आप्पांना विचारलं, "काय आप्पा, तूं बी. ए. वगैरे झालास की नाहीं? कुठं असतोस? कसली नोकरी करतोस?" आप्पांच्या या मित्राला मुंबईच्या ॲडव्होकेटसाहेबांनीं मागं सारलं होतं. मुंबईच्या हायकोर्टांत प्रॅक्टिस करीत असूनहि आप्पांच्या 'शाकुंतल' कादंबरीवर हायकोर्टांत चाललेला खटला त्यांच्या गांवीं नव्हता! आमचं 'काळेगोरे' नाटक मुंबईस एवढं गाजलं, पण त्याचा ॲडव्होकेटसाहेबांना पत्ता नव्हता! मुंबई म्हणजे साहित्यिकांच्या दंगलीचा आखाडा. परंतु ॲडव्होकेटसाहेब त्यापासून अगदी अलिप्त दिसले! किंबहुना 'स्त्री', 'किर्लोस्कर' आणि 'मनोहर' ही महाराष्ट्राबाहेरहि निकट परिचित असलेली मासिकं त्यांच्या पाहाण्यांत आलीं नव्हतीं! या वेळीं आमचे स्नेही श्री. शंकरराव किर्लोस्कर असते, तर केवढी मौज उडाली असती हें मनांत येऊन आमची खूपच करमणूक झाली! ॲडव्होकेटसाहेबांच्या साहित्यविषयक अज्ञानासंबंधीं आम्हीं आश्चर्य व्यक्त करतांच ते म्हणाले, "एक तर आम्ही ताजमहाल हॉटेलच्या बाजूस राहात असल्यामुळें मुंबईत चाललेल्या घडामोडीचा मला पत्ता असत नाहीं. आणि दुसरं, असं की टाअिम्सशिवाय मी इतर कांहींच वाचत नाहीं!"

"पण आतां तुम्हीं वाचलं पाहिजे." असं आम्हीं त्यांच्याकडून वचन घेतलं.

या वादविवादांत गाडीनं तीनचार स्टेशनं मागं टाकलीं होतीं. मीं खिडकीबाहेर पाहिलं तों अंधार पडला होता आणि रात्रीच्या वाऱ्याचे गार झोत खिडकीवाटे आत येत होते. आम्हीं थोडा फराळ केला आणि झोंपी गेलों. आजचा दिवस किती मजेंत गेला होता आणि उद्यां तर

मदुरेंत मुक्काम करून मीनाक्षीचं मंदिर आम्हीं पाहाणार होतों. या विचारांतच आम्हांला झोप लागली.

मी पहाटे जागी झालें तेव्हां गाडी एका स्टेशनांत थांबली होती. पहाटेचे चार वाजले होते. खांदे आखडून कुडकुडत प्लॅटफार्मवरील स्त्रीपुरुष इकडून तिकडे लगबगा हिंडत होते. आमच्या डब्यांतहि ऐक तरुण स्त्री व पुरुष आलीं व कशीबशी जागा करून बसलीं. मीं खिडकींतून वांकून स्टेशनच्या पाटीवर पाहिलं तों इंग्रजींत त्रिचनापल्ली असं लिहिलं होतं. आमच्या रेडिओवर त्रिचीचे कार्यक्रम नेहमीं चांगले असतात, एवढीच मला या शहराची ओळख होती. मीं खिडकी खालीं ओढली आणि आणि पुन्हां साखरझोपेंत शिरलें ती साडेसहा वाजेपर्यंत!

साडेसहा वाजतां गाडी थांबलेली पाहून मीं खिडकी उघडली. बाहेर कुंद गार हवा पडली होती आणि स्टेशनपलीकडील व आजूबाजूच्या भागांत नारळी पोफळींचीं दाट बनं दिसत होतीं. सारं वातावरण अगदीं कोकणपट्टीसारखं वाटत होतं. या स्टेशनचं नांव दिंडीगल. प्रोफेसर बटलरनीं आम्हां सर्वांसाठीं चहा मागवला होता; पण आप्पा उठेपर्यंत तो निवून गेला. दुसरा चहा मागविण्याइतका वेळ नव्हता.

आठ वाजून दहा मिनिटांनीं आमची गाडी मदुरेच्या स्टेशनांत उभी राहिली. नुकताच पाऊस पडून गेल्यामुळं हवेंतला ओलसरपणा मोठा सुखदायक वाटत होता. प्लॅटफॉर्मची फरशी ओली झाली होती आणि स्टेशनाबाहेरच्या आवारांत ठिकठिकाणीं लहान लहान डबकीं सांचली होतीं. स्टेशनची इमारत लहानसरच पण मोठी टुमदार आणि सोईस्कर आहे. टूरिस्ट उतारूंसाठीं इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर रिटायरिंग रूम्सहि आहेत. या खोलींत उतरण्याचा आमचा बेत होता. पण खोल्यांची व्यवस्था पाहाणाऱ्या अँग्लो–इंडियन मेट्रन बाईनं एकहि खोली रिकामी नसल्याचं सांगतांच आम्हांला बेत बदलावा लागला. आम्हीं जो हमाल ठरवला होता त्याला आमची भाषा कळत नव्हती. एखाद्या चांगल्या हॉटेलमध्यें आम्हाला घेऊन चल असं आम्हीं त्याला सांगितलं आणि

२८१७ / २४३१

त्याच्यामागोमाग स्टेशनाबाहेर पडलों. स्टेशनाबाहेर आल्यावर मदुरा शहराचं जें प्रथम दर्शन आम्हांला झालं तें अतिशय सुंदर होतं. स्टेशनच्या आवारापलीकडे खूप मोठा चौक असून त्या चौकांतून चारी बाजूंनीं मदुरा शहरांत रस्ते गेले आहेत. ते खूप प्रशस्त आणि सिमेंट कॉंक्रीटचे आहेत. रस्त्यांच्या बाजूंनीं व वळणांवर मोठ्या इमारती व त्यांभोंवतीं बागबगीचे असल्यामुळें या रस्त्यांची शोभा अधिकच वाढली आहे. या पहिल्यापहिल्या दर्शनांतच मदुरेनं आम्हांला जिंकून टाकलं!

हमालामागोमाग आम्ही चाललों होतों, परंतु हा आपल्याला नेणार तरी कुठं ही चिंता आम्ही करीतच होतों. इतक्यांत नेहरू शर्ट व गांधी टोपी घातलेला एक मनुष्य मोडक्यातोडक्या इंग्रजींत आप्पांना कांहीं सांगूं लागला. त्यानं आपल्या खिशांतून एक बिल्ला काढला. त्यावर लिहिलं होतं–'सर्टिफाइड गाइड.' आम्हांला निदान हॉटेलपर्यंत तरी एखादा मार्गदर्शक हवा होताच. आम्हीं त्याला ठरवून टाकला. मार्गदर्शकानं दाखविलेल्या मणी हॉटेलमध्यें आम्ही सामान टाकलं. स्टेशनपासून जवळ असल्यामुळं हें हॉटेल आम्हांला सोयीचं होतं. हॉटेलची इमारत तीनमजली होती. दुसऱ्या मजल्यावर रस्त्याकडील बाजूची खोली ठरवली. खोलीला निराळी बाथरूम होती. आम्हीं तोंड धुऊन बाहेर आलों तोंपर्यंत आमच्या मार्गदर्शकानं हॉटेलच्या नोकराला सांगून चहा–दोशा मागवला होता. आम्हीं चहा घेतला आणि लगेच मीनाक्षीचं मंदिर पाहण्यासाठीं बाहेर पडलों. आम्ही खाली रस्त्यांत आलों. रस्त्यांतून मीनाक्षीच्या देवालयाचं प्रचंड मनोहर गोपुर दिसत होतं आणि पाय तिकडे ओढ घेत होते. परंतु वाटेंत एक फारच मनोरंजक गोष्ट घडली आणि त्यामुळं मीनाक्षीचं दर्शन थोडं लांबणीवर पडलं!

★

# २

मणी हॉटेलपासून दोन फर्लांग गेल्यावर उजव्या बाजूच्या लहानशा रस्त्यांत आम्ही शिरलों. या रस्त्यानं दहावीस पावलं जातों न जातों तोंच एका लहानशा घरावरच्या " महाराष्ट्र मंडळी, मदुरा " अशा मराठींत लिहिलेल्या पाटीकडे आमचं लक्ष गेलं व नकळतच आमचे पाय त्या घरापुढं थबकले. त्या घराच्या दाराच्या दोन्ही बाजूंनीं केळीचे खांब उभारले होते आणि कसल्यातरी समारंभाला जमावी तशी गर्दी पुढं ओटीवर जमली होती. आम्हांला पाहून त्या मंडळींपैकीं एक वृद्ध गृहस्थ लगबगीनं बाहेर आले आणि त्यांनीं आम्हांला आग्रहानं आंत बोलावलं. आम्ही महाराष्ट्रीय आहों हें त्यांनीं ओळखलं हें उघडच होतं. खोलींत उजव्या बाजूला विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्ती एका प्रशस्त देव्हारेवजा मखरांत

उभ्या होत्या. डाव्या बाजूला बैठकीवर वीस-बावीस मंडळी वर्तुळाकार बसली होती. आम्ही बैठकीवर बसतांच जो तो उत्सुकतेनं पुढं सरकला. आम्ही कोण, कुठचे, इथं मदुरेला कां आलों, किती दिवस राहणार, पुढं कुठं जाणार, याची जिज्ञासा त्या सर्वांना लागली होती. अनोळखी-पणामुळं वाटणारा संकोच आणि भाषेची अडचण नसती तर त्या सर्व मंडळींनीं प्रश्न विचारून आम्हांला भंडावून सोडलं असतं. त्यांपैकीं एक-दोघांनीं व विशेषतः त्या वृद्ध गृहस्थांनीं आमची माहिती विचारतांच आम्हीं जरूर ती सर्व माहिती दिली आणि ती ऐकून एकदम ओळख पटल्याप्रमाणं त्या सर्वांचे चेहरे प्रफुल्लित झाले आणि अत्यानंदानं हसत ती मंडळी एकमेकांना सांगू लागली, "अरे, फडके नांव ऐकल्याबरोबर मीं ताडलं, हेच ते कादंबरीकार फडके!" "आपल्या वाचनालयाच्या कपा-टांत युगांतर नाटक आहे तें यांचंच कीं." "ना. सी. फडके ते हेच." "आज दुधांत साखर पडली." "आमचं भाग्य म्हणून असे मोठे साहित्यिक आज आमच्याकडे आले." "पहिला मुहूर्त तरी उत्कृष्ट साधला."

त्यांच्या ह्या भाषेनं आम्ही बुचकळ्यांत पडलों. परंतु त्या वृद्ध गृह-स्थांनीं पुढं होऊन मंडळींची गडबड शांत केली आणि अर्धवट व्याख्यान दिल्यासारखं आणि अर्धवट आम्हांला उद्देशून ते आपल्या तेलगूबजा मराठींत...म्हणाले, परंतु ते काय म्हणाले हें त्यांच्या भाषेंत सांगणं कठीण आहे. शिवाय त्यांच्या भाषणांत त्यांनीं अप्पांची म्हणून पर्यायानं माझी जी स्तुति व जें स्वागत केलं तें ऐकून तर आम्हाला संकोचल्यासारखं झालं. त्या सर्वांचा तो आनंद व तें प्रेम पाहून आम्ही गहिंवरून गेलों. त्या दिवशींचा तो समारंभ मदुरेच्या "महाराष्ट्र मंडळी" या संस्थेच्या उद्‌घाटनाचा होता. महाराष्ट्रापासून दूर राहिलेल्या महाराष्ट्रियांमध्यें एकोपा असावा व आपल्या मायभाषेची सेवा करावी या हेतूनं ही संस्था जन्मास आली होती. "तुमच्यासारखे पाहुणे आमच्या संस्थेच्या उद्‌घाटनप्रसंगीं लाभले हें आमचं केवढं भाग्य!" असे उद्‌गार

ती मंडळी वरचेवर काढीत; परंतु या संस्थेच्या जन्मदिनीं तिला शुभाशिर्वाद देण्याचा मान प्रथम आम्हांला मिळाला हेंसुद्धां आमचं भाग्यच म्हणायचं. महाराष्ट्र मंडळीच्या व्हिजिटर्स बुकावर पहिला संदेश लिहितांना वहीवरचा ‘ व्हिजिटर्स बुक ’ हा इंग्रजी मथळा खोडून अप्पांनीं लिहिल, “ पाहुण्यांची नोंद-वही.” ‘ वंदे मातरम् ’ या राष्ट्रगीताबरोबर संस्थेच्या सभासदांनीं ‘ प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ’ हें गीतहि म्हणावं अशी आम्हीं सूचना केली; त्याबरोबर ते वृद्ध गृहस्थ मला म्हणाले, “ आपण आम्हांला हें गाणं म्हणून दाखवतां का ? ” आणि मग माझ्या उत्तराची वाट न पाहतांच त्यांनीं आंतल्या बाजूस भजनी पेटी आणावयास कुणालासं पिटाळलं. अशा वेळीं संगीतकलेकडे आपलं दुर्लक्ष झालं याचा मला फार पश्चात्ताप होतो व लगेच आतां पहिली गोष्ट करायची ती संगीताचं शिक्षण घ्यायचं असा निश्चयहि मी करून टाकतें. आतांहि एकीकडे “ मला गातां येत नाहीं ” असं त्यांना सांगतांना घरीं परतल्याबरोबर गाण्याची शिकवणी ठेवायची असा मनांतल्या मनांत मीं निश्चय केला. नंतर चहा, पानसुपारी आणि त्याहीपेक्षां गप्पागोष्टींत आम्हीं इतकें गुरफटून गेलों कीं त्या प्रेमळ मंडळींचा निरोप घेणंहि अवघड होऊन बसलं. अखेर आम्ही उठलोंच. खोलीच्या मागच्या बाजूच्या लहानशा अंगणांत उभारलेल्या भगव्या ध्वजाला वंदन केलं. तंजोरच्या महाराष्ट्र मंडळाचे कांहीं लोक मुद्दाम या समारंभाला आले होते. त्यांना तंजोरला आम्ही एक दिवस मुक्काम करूं असं वचन दिलं आणि बाहेर पडलों. विरहानं पतिपत्नीमधलं प्रेम वाढतं असं म्हणतात. असेल कदाचित् परंतु महाराष्ट्रापासून दूर गेलेल्या लोकांचं महाराष्ट्राबद्दलचं प्रेम विरहामुळं फार वाढलं आहे यांत शंका नाहीं.

“ महाराष्ट्र मंडळी ”च्या निवास्थानावरून गेलेला तो लहानसा रस्ता ओलांडून आम्ही एका मोठ्या रस्त्यांत शिरलों. हा रस्ता मीनाक्षीच्या दक्षिण गोपुराला वळसा घालून गेला असल्यामुळं. रस्त्यांत शिरतांच आम्हांला मीनाक्षीचं गोपुर आतां स्पष्ट दिसूं लागलं. तें जवळून पाहण्याची

आमची अधीरतां इतकी वाढली होती, की रहदारीकडे आमचं दुर्लक्ष होत होतं. पायीं चालणारांनीं फूटपाथवरूनच चाललं पाहिजे असा मदुरेला कडक कायदा आहे. या कायद्याचा भंग केल्याबद्दल बाळकृष्णाला एकदोनदा दंडही झाला होता व म्हणून तो आम्हांला "फूटपाथवरून चला" असं वरचेवर बजावत होता. परंतु आमचे पाय जमिनीवर होते कुठें ? मीनाक्षींच्या गोपुरासमोर आलों आणि आम्ही रस्त्यांतच थबकलो. गोपुराची ती प्रचंड शोभा डोळे भरून पाहून घेतल्याशिवाय आमचं पाऊल पुढं पडेना.

माथ्यावर आलेला चंद्र पाहण्यांस मान जितकी उंच करावी लागेल तितकीच उंच मान या गोपुराचं शिखर पाहतांना करावी लागते. गोपुराच्या पायथ्याचा घेरच एकाद्या मोठ्या देवालयाएवढा आहे. या प्रचंड पायावर एकाहून एक निमुळते होत गेलेले नऊ मजले मोठ्या डौलदार बांधणीनं आकाशांत चढले आहेत व प्रत्येक. मजल्यावर देवादिकांच्या जवळजवळ मनुष्याएवढ्या दिसणाऱ्या मूर्ति कोरल्या आहे. कौरव, पांडव, दशमुखी रावण, सहस्रार्जुन, गणपति, मारूती, लक्ष्मी, पार्वती वगैरे अनेक देवदेवता, अनेक आकर्षक पवित्र्यांत घडविल्या आहेत. पुरूषांच्या शरिराचा बांधेसूदपणा आणि स्त्रीदेहाचं सौष्ठव दुरूनहि त्या मूर्तींत आम्हांला दिसत होतं. एखाददुसरी मूर्ति कोरणं मनुष्याच्या आवाक्यांतील वाटतं. परंतु नऊ मजले चारी बाजूंनीं, एकहि फूट साधी जागा न सोडतां, अत्यंत सुंदर कलाकृतीनं कोरून बांधून काढणं ही कल्पनाच आम्हां मानवांना अशक्य कोटींतील वाटते ! परंतु सत्य कित्येकदां कल्पनेला मार्ग सारतं म्हणतात, तें या गोपुराकडे पाहून खरं वाटलं. ज्या कलवंतांनीं तें सत्य आपल्या अमर शिल्पकृतीन या गोपुराच्या प्रचंड मनोहर स्वरूपांत प्रकट केलं ते. आमचे पूर्वज, ह्यावर माझा विश्वास बसेना. ते कलावंत कोणी दैवी, अतिमानव पुरुष असले पाहिजेत. एकाहून एक–प्रत्येक मजल्यावरच्या त्या सुंदर शिल्पकृति पाहतां पाहतां माझी दृष्टी नवव्या मजल्यावर, गोपुराच्या शिखरावर स्थिर झाली. कमळच्या पाकळ्यांमध्ये पन्नगाचा जबडा वासलेला असा मुखवटा दिसला. आकाशाच्या निळ्या

पार्श्वभूमीवर चंद्राच्या कोरेप्रमाणं वर उचललेल्या त्या पाकळ्या आणि तो अक्राळविक्राळ पन्नगाचा मुखवटा फारच सुंदर दिसला. त्या नऊ मजली गोपुराकडे पाहून "अहाहा ! कितीभव्य ! किती मनोहर !" एवढेंच उद्गार आमच्या तोंडून निघाले. वेरूळ अजिंठ्याची लेणीं पाहून आम्ही चकित झालों होतों; परंतु या गोपुराच्या शिल्पसौंदर्याकडे पाहतांना आम्ही देहभानहि विसरलों.

बाळकृष्णाच्या हाका ऐकून आम्हांला आजूबाजूची जाणीव झाली. आम्ही रस्त्याच्या अगदीं मधोमध उभे होतों आणि आमच्याभोंवतीं लोकहि गोळा झाले होते हें आमच्या लक्षांत आलं. 'फूटपाथवर या, नाहींतर दंड होईल,' असा तगादा बाळकृष्णानं लावला होता. आम्ही चटकन् फूटपाथवर आलों. या फूटपाथच्या बाजूनंच मीनाक्षीच्या मंदिराच्या आवाराभोंवतालची पुरुष उंचीची तटबंदी भिंत गेली आहे. या भिंतीपलीकडे देवळासभोंवती बाग असावी. ओळीनें लावलेल्या झाडांच्या पिंवळ्या कण्र्यासारख्या फुलांनीं बहरलेल्या फांद्या भिंतीआड दिसत होत्या. ह्या फुलांचं नांव 'तंग अरळी' असं बाळकृष्णानं सांगितलं. आम्ही या रस्त्याच्या कोपऱ्यावर वळलों आणि चौकांत आलों. तटबंदीची भिंत इथं संपली होती आणि मीनाक्षीच्या मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारापुढं आम्ही उभे होतों.

प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना गणपति व कार्तिकस्वामी यांच्या भव्य मूर्ति कोरल्या आहेत. गणपति उंदरावर आणि कार्तिकस्वामी मोरावर बसलेला होता. प्रवेशद्वारावरील अर्धवर्तुळाकार कमानीमध्यें मीनाक्षीच्या पाणिग्रहणाचा अतिसुंदर प्रसंग कोरला आहे. लाजून खालीं मान घातलेली मीनाक्षी, तिचा उजवा हात सुंदरेश्वराच्या हातीं देणारा विष्णु आणि तिचा हात हातीं धरून सस्मित उभा असलेला सुंदरेश्वर, साऱ्याच मूर्ति भावपूर्ण वाटल्या.

या प्रवेशद्वारांतून आंत गेल्यावर, मंदिराभोंवतालचं आवार पाहून मंदिराच्या प्रशस्तपणाची कल्पना आली. मंदिराच्या आवारांतच सुंदरेश्वराचं देवालय, हजार खांबांचा हॉल, सुवर्णपुष्करिणी वगैरे प्रेक्षणीय स्थळं

आहेत. प्रवेशद्वारांतून आंत शिरल्यावर जवळच हजार खांबांचा हॉल आहे तिकडे आम्ही वळलों.

या हॉलमध्यें एक हजार खांब आहेत एवढी एकच गोष्ट त्याच्या भव्यतेची कल्पना येण्यास पुरेशी आहे. रांगोळीच्या ठिपक्यांप्रमाणं समांतर रेषेंतले हे हजारों खांब पाहून वेरूळ-अजिंठयाच्या लेण्यांतील खांबांची आठवण झाली. वेरूळ-अजिंठयाच्या लेण्यांतील प्रत्येक स्तंभ शिल्पकलेचं कौशल्य व नावीन्य या दृष्टींनं नमुनेदार वाटण्यासारखा आहे. परंतु हजार खांबांच्या या हॉलमध्यें फक्त प्रवेशद्वारापुढची एक ओळ व प्रवेशद्वारापासून गाभाऱ्यांतील सुंदरेश्वरापर्यंत जाणाऱ्या वाटेच्या दोन्ही बाजूंच्या दोन ओळी एवढेच खांब विशेष कलाकुसरीनं नटलेले आहेत. या प्रत्येक खांबालगत देवादिकांच्या पुरुष दीड पुरुष उंचीच्या मूर्ति आहेत. हॉलमध्यें प्रवेश केल्याबरोबर प्रथम लक्ष जातं तें सरस्वतीच्या भव्य मूर्तीकडे ! नृत्याच्या एका अवघड पवित्र्यांतला तिच्या देहाचा तो डौल, वीणेच्या तारावरची तिची नाजुक लांबसडक बोटं, कोपरापासून मनगटापर्यंतचा रेखीव स्नायू, अतिशय मोहक सिंहकटि, तीवरील मेखलेंतून अस्पष्ट दिसणारं उटिपोट, केळीच्या स्तंभासारख्या मांड्या, भरदार वक्षस्थलं, इसरी नाजुक जिवणि, लंबवर्तुळ मुद्रेला प्रसन्नता देणारे ते मोठमोठे डोळे, या सर्व सौंदर्यांनीं त्या शिलेच्या मूर्तीतहि चैतन्य उत्पन्न झालं होतं. पाहणाऱ्या चित्ताला मोह पडावा असं उन्मादक सौंदर्य त्या स्त्रीदेहांत खचित होतं. सैरंध्रीच्या वेषांतील द्रौपदी, हंस पक्ष्यावर विराजमान झालेली देवता रतिदेवी आणि गाभाऱ्यांत नटराजाच्या डाव्या बाजूस उभी असलेली शिवकाम सुंदरी या साऱ्या मूर्ति म्हणजे उन्मादक स्त्रीसौंदर्याचं कलावंतानं केलेलं निर्भीड आविष्करणच होय.

या ठिकाणच्या मूर्तींतलं स्त्रीसौंदर्याचं इतकं उघडं आविष्करण पाहून कांहीं वर्षांपूर्वी "ओलेती"च्या चित्राबद्दल उडालेला गहजब आठवला आणि तो गहजब ज्यांनीं उडविला त्यांच्या रसिकपणाची कींव आल्यावांचून राहिली नाहीं. हजार खांबांच्या हॉलमधील स्त्रियांचे ते सुंदर पुतळे पाहून

कदाचित् मन विकारवश होऊं शकेल; परंतु त्यांतच ज्यांनीं ते पुतळे घडविले त्या कलावंतांचा आणि त्यांच्या कलेचा विजय आहे. इतर अनेक रसांप्रमाणं शृंगार हाहि रस मानला तर तो रस ज्या कलाकृतींच्या दर्शनामुळं उचंबळूं लागेल ती कलाकृति अश्लील मानणं चुकीचं ठरेल. शृंगाराचा आपण एक बागुलबोवा माजविला आहे. त्याविषयींच्या आकुंचित कल्पनांमुळं, निष्कारण भीतीमुळं आणि भोंदूपणामुळं आपल्या मनांत श्लील वादचं भलतंच काहूर निर्माण झालं आहे व या काहूराचं दडपण आणि बंधन आपण आपल्या कलावंतांवर घालूं पाहात असतों. आमच्या पूर्वजांचा दृष्टीकोन अशा आंधळ्या संकुचित विचारांनीं जखडलेला नव्हता. " गुणाः पूजास्थानं गुणिषु, नच लिंगं नच वयः, " असं एक सुभाषित आहे, त्याप्रमाणं कलेचा विषय कोणताहि असो, तिला पूज्य मानण्याचा व तिच्या सौंदर्याचं आविष्करण व रसग्रहण करण्याचा व उदार, शुद्ध नवमतवाद आमच्या पूर्वजांच्या ठिकाणीं असला पाहिजे.

आमच्या पूर्वजांच्या या नवमतवादानं नुसता शृंगारच काय, परंतु ज्या कामशास्त्रासंबंधींची चर्चा व माहितीदेखील आमच्या संस्कृतीला विघातक आहे असं कांहीं सनातनी मानतात, तें कामशास्त्रदेखील अगदीं सहज पचवलेलं दिसलं. बाळकृष्ण हळूच अप्पांच्या कानांत पुटपुटला, " या हॉलमध्ये 'तसली' चित्रं आहेत. परंतु ती बायकांनीं पाहण्यासारखी नाहींत तुम्ही येत असाल तर चला दाखवितो. " परंतु अमुक गोष्ट पुरुषांनीं पाहिली तर चालते नि स्त्रियांनीं पाहिली तर चालत नाहीं ही विनयाची खोटी कल्पना आम्हांला कधींच न पटल्यामुळं आताहि बाळकृष्णाच्या सूचनेकडे आम्ही दुर्लक्ष केलं व बाळकृष्णाच्या मागोमाग ती चित्रं पाहण्यासाठीं गेलों.

चित्रं पाहून आम्हांला मोठी मौज वाटली. न पाहण्यासारखं त्या चित्रांत कांहीं नव्हतं. आणि जें होतं तें अगदीं लाजिरवाणं होतं असंहि नाहीं. स्त्री-पुरुषांच्या संभोगाचीं तीं चित्रं होतीं. आणि प्रत्येक चित्रामागं कांहींतरी काव्यमय किंवा विनोद प्रसंग होता. एका चित्रांत एक स्त्री नदीकाठीं पाणी भरत होती, दुसऱ्या एका चित्रांतला प्रसंग मोठा विनोदी

वाटला. एका लहान पण महावात्रट मुलाला भात वाढीत असतांना त्या स्त्रींच्या कमरेचं वस्त्र खाली गळून पडलं आहे. तो मुलगा हळूच मान वळवून तिच्या विवस्त्र शरीराकडे पाहात असतांना त्याच्या डोक्यांत मारण्यासाठीं म्हणून तिनं उगारलेली ती पळी. एक हात मारण्यांत गुंतलेला, दुसऱ्या हातांत भातचं तपेलं आणि इकडे कमरेचं वस्त्र घसरलेलं, अशा विचित्र प्रसंगांत सांपडलेल्या त्या स्त्रीची धांदल मोठी गमतीदार वाटली. परंतु ही चित्रं पाहात असतांना देवालयासारख्या ठिकाणीं अशीं चित्रं पाहून थोडं आश्चर्य वाटलं! वेरूळ येथील 'कैलास' नांवाच्या प्रचंड लेण्यामधेदेखील अशा तऱ्हेचीं चित्रं आम्ही पाहिलीं होतीं आणि आतां मीनाक्षींच्या या जगप्रसिद्ध मंदिरांत केवळ उन्मादक स्त्री सौंदर्याचं नव्हे तर ज्या गोष्टी आपण अश्लील मानतों त्याचं मनमोकळं प्रदर्शन आम्ही पाहात होतों. आणि आम्हांला आश्चर्य वाटलं याचाच अर्थ असा, की आमच्यापेक्षां आमचे पूर्वज निराळे होते. त्यांच्या कलेनं आणि साहित्यानं कामशास्त्रावर बहिष्कार घातला नव्हता. लैंगिक विषयाबद्दलची भीति, लज्जा, ढोंग त्या काळीं माजलेलं नव्हतं. एखाद्या नग्न चित्रानं भंगू जाण्याइतकी यांची संस्कृति तकलुपी नव्हती.

हजार खांबांच्या हॉलमध्यें स्त्रियांप्रमाणंच पुरुषांच्या मूर्तीदेखील अत्यंत रेखीव आहेत. प्रवेशद्वारांतून आंत गेल्यावर समोरच योद्धयाच्या अवतारांतील शिवाची मूर्ति दृष्टीस पडली. शिवाच्या हातांतील धनुष्याची वेताच्या छडीसारखी वाकलेली कमान आणि कमरेंतील मेखलेची नाजुक कलाकुसर पाहून वज्रतुल्य शीलेला आपल्या शीलेला आपल्या कल्पनेप्रमाणं वाकविणाऱ्या त्या कलावंतांची धन्य वाटली. मन्मथ, द्रौपदीसाठीं पारिजातकाचं फूल आणण्यासाठीं निघालेला हा गदाधारी भीम, त्याच्या समोर लढाईच्या पवित्र्यांत उभा राहिलेला पुरुषामृत वगैरे मूर्ती फारच प्रेक्षणीय वाटल्या. विशेषतः गाभाऱ्यांतील नटराजाची मूर्ति पाहतांना आमची दृष्टि मोहून गेली. डाव्या पावलावरचा शरिराचा तोल उजवें पाऊल डाव्या गुडघ्यावर धरण्याची ती ऐट, दोन्ही हातांच्या आकर्षक

मुद्रा आणि मस्तकाचा तो डौल पाहून भारत नाट्यशास्त्रांतील सर्वांत सुंदर पोझ ती हीच अशी खात्री पटली.

नटराजाची मूर्ति डोळे भरून पाहून आम्ही मागं फिरलों. परंतु वाटेंतच एका मूर्तीकडे बोट दाखवून बाळकृष्णानें मोठं वक्तव्य सुरू केलं. चित्रहि मोठं गमतीदार होतं एक स्त्री एका पुरुषाच्या डोक्यावर बसली होती. त्या चित्राकडे तुच्छतेनं पाहून बाळकृष्ण म्हणाला, 'हें पाहा. ह्या पुरुषाचं नांव कलिपुरुष आहे. या कलिपुरुषानं आपल्यां बायकोला डोक्यावर बसविली आहे. कलियुगांत बायका पुरुषांच्या डोक्यावर बसूं लागतील म्हणजे समान हक्कासाठीं भांडूं लागतील, हें भविष्य कित्येक वर्षांपूर्वी आमच्या पूर्वजांनीं वर्तवून ठेवलं आहे आणि तें आतां खरं ठरलं आहे कीं नाहीं तुम्हीच सांगा?"

बाळकृष्णाचं बोलणं ऐकून मला मौज वाटली. मी त्याला म्हटलं, "अरे बायका पुरुषांच्या पायांतील वाहणा बनतील किंवा त्यांच्या डोक्यावर बसतील. तो त्यांचा खाजगी पराक्रमाचा भाग आहे. आणि समान हक्काविषयीं म्हणशील तर माझ्या मतानं स्त्रियांनीं स्त्रियांच्या हक्कासाठीं झगडावं. प्रत्येक बाबतींत पुरुषांशीं चढाओढ आणि तुलना करीत बसूं नये."

आम्ही हजार खांबांच्या हॉलमधून बाहेर पडलों आणि सुंदरेश्वराच्या देवालयांत शिरलों. सुंदरेश्वराच्या सभामंडपांत शिरण्यापूर्वी एक प्रचंड दरवाजा लागतो. या दरवाजावर असंख्य पितळेच्या पणत्या आहेत. आणि रात्रीं आरतीच्या वेळीं या सर्व पणत्यांतून दिवे लागले म्हणजे या महाद्वाराची शोभा कांहीं अपूर्व दिसतें म्हणतात. या दरवाजांतून आम्ही आंत गेलों. प्रथमच दोन्ही बाजूंस वीरभद्राच्या रुद्रमूर्ती आम्हाला दिसल्या दक्षयज्ञामध्यें जेव्हां असुर विघ्नं आणूं लागले तेव्हां त्यांचं निवारण करण्यासाठीं वीरभद्राचा अवतार शिवानं घेतला अशी कांहींशी कथा बाळकृष्णानं सांगितली. सुंदरेश्वराच्या मंदिराच्या आवारांत विशेष प्रेक्षणीय अशा गोष्टी म्हणजे एकाच शिलेंत कोरलेली नंदीची छत्री, अर्धनारीनटेश्वराची मूर्ति आणि सरस्वतीची अगदीं साधीसुधी मूर्ति–ह्या मूर्ती पाहून आम्ही

मुख्य देवालयांत प्रवेश केला. सुंदरेश्वराच्या देवाळांतलं वातावरण कांहीं फारसं प्रसन्न नव्हतं. गाभाऱ्यांत समया जळत होत्या. त्याच्या मंद प्रकाशांत सुंदरेश्वराची मूर्ति आपल्या आवडत्या पोझमध्यें उभी होती. बाकी सर्व देवळांत तिन्हीसांजा पडतो तसा अंधार पडला होता. आम्ही गाभाऱ्यांत गेल्यावर पुजारी एकदम जागे झाल्याप्रमाणें उठले. हॉटेलमध्यें चहा आणि देवळांत प्रसाद मागणं ओघानंच येतं. पुजाऱ्यानं पुढं आरती केली तेव्हां आम्ही त्यांत एक रुपया टाकला. आणि चिमूटभर अंगारा आणि फूल, हळद कुंकू एवढा प्रसाद घेऊन आम्ही मीनाक्षीच्या मंदिराकडे वळलों.

परंतु मीनाक्षीचं दर्शन झालं नाहीं. तिच्या गाभाऱ्याचा दरवाचा बंद होता. कारण तिचं स्नान चालू होतं. दार केव्हां उघडेल आणि दर्शन केव्हा घडेल अशी उत्सुकतेनं वाट पाहणाऱ्या भक्तांनीं देऊळ गजबजलं होतं. धूप, दीप, कापूर, उदबत्त्या, चुरगळलेलीं फुलं, सोमट-तेलकट पाणी वगैरेच्या उग्रदर्पानं हवा जड झाली होती आणि समयांच्या उष्णतेमुळं त्या कोंदट हवेंत अधिकच गदगदूं लागलं होतं. मीनाक्षीचं स्नान आटो-पण्याची इथं वाट न पाहतां मंदिराच्या आजूबाजूची शोभा पाहून यावं अशा विचारानं आम्ही मंदिराबाहेर आलों.

देवालयाच्या बाहेर लगतच एक मोठा प्रशस्त पोपटांचा हॉल आहे. तिन्ही बाजूंनीं जाळी लावून हॉलएवढा प्रचंड पिंजराच बनवलेला आहे. या पिंजऱ्यांत शेकडों छोटेमोठे, रंगीबेरंगी, पंचरंगी पोपट उडत-बागडत असलेले दिसले. हे पोपट सिलोनी आहेत असे बाळकृष्ण म्हणाला.

या पंचरंगी हॉलसमोरच सुवर्णपुष्करिणी नांवाचं मोठं तीर्थ आहे. आणि या पुष्करिणीचं–तीर्थाचं–पाणी त्या पोपटांच्या रंगाला मागं सारील इतकं गडद हिरवं आहे. या पुष्करिणीच्या चारी बाजूंनीं व्हराडे-वजा देवळाचा भाग आहे. इथं साधु संन्यासी घुटमुळत असतात. इथंच ऐक दुकान आहे. त्या दुकानांत पुष्करिणीच्या भयंकर घाणेरड्या पाण्याचे सीलबंद पितळी चंबू विकत मिळतात. या चंबूतल्या तीर्थप्राशनानं

मोक्ष खचितच मिळेल: या पुष्करिणीच्या बाजूला उभं राहिलं असतां दोन भव्य सुवर्ण घुमट दिसतात. एक सुंदरेश्वराच्या मंदिराचा आणि दुसरा मीनाक्षीचा. आम्हीं हे घुमट पाहिले तेव्हां सूर्याच्या प्रकाशांत ते तळपत होते.

पुष्करिणीभोवती फेरी घालून आम्ही परतलो तेव्हां साडेअकरा वाजले होते आणि मीनाक्षीचं स्नान आटोपलं होतं. घंटानाद चालू होता आणि दोन पुजारी भल्यामोठ्या आरत्यांनीं मीनाक्षीला ओवाळीत होते. त्या शेकडों दीपांच्या मंद तेजाळ प्रकाशांत मीनाक्षीची स्नान मूर्ति आतां तेजःपुंज दिसत होती. तिच्या एका हातांत ठशीसारखा एक अलंकार होता. गळ्यांत ताजे पुष्पहार होते. आणि तिची सावळी हसतमुख मुद्रा मोठी प्रसन्न दिसत होती. तिचं हें शुभदर्शन घेण्यासाठीं दाटीनं उभे राहिलेले स्त्रीपुरुष माना उंचावून डोकावून पाहात होते. घंटानाद चालू होता. परंतु पाण्यांत बुडी मारूनहि कोरडं राहावं तसं माझं अंतःकरण, आजूबाजूला भाविकांची गर्दी असून, समोर मीनाक्षी दिसूनहि कोरडंच राहिलं! आमच्यासमोर आरती आली तेव्हां आम्हीं त्यांत एक रुपया टाकला आणि पुजाऱ्यानं हातावर घातलेलं कढत मचूळ तीर्थ कसंबसं पिऊन टाकलं. मीनाक्षीच्या गळ्यांतील पुष्पमालेचीं चार फुलं आणि प्रसाद घेऊन आम्ही मंदिराबाहेर पडलों.

बारा वाजले होते. सूर्य माथ्यावर तळपूं लागला होता आणि भूकहि लागली होती. मीनाक्षीच्या आवारांतील प्रमुख स्थळं व मंदिरं आम्ही पाहिलीं होतीं. तेव्हां "आम्हांला मणी हॉटेलकडे घेऊन चल" असं आम्ही बाळकृष्णाला सांगितलं. परंतु "जवळच वसंत मंडप आहे तो पाहून टाकूं" असं बाळकृष्ण म्हणाला. आम्हीं मीनाक्षीच्या मंदिराबाहेर आलों आणि रस्ता ओलांडून पलीकडेच असलेल्या वसंत मंडपांत शिरलों.

वसंत मंडपाला 'पुदुमंडप' असंहि दुसरं एक नांव आहे. सतराव्या शतकांतील तिरूमल नाईक या राजाची ही छत्री आहे असें म्हणतात. याच मंडपांत मीनाक्षीच्या विवाहाचा उत्सव दर पौर्णिमेस साजरा केला

जातो. शिवाय रोज रात्रीं मीनाक्षीची उत्सवमूर्ति तैलस्नानासह इथं वाजत-गाजत आणतात. हजार खांबांच्या हॉलप्रमाणं हा वसंत मंडप चांगला लांबरुंद व प्रशस्त आहे. या मंडपांतील खांबहि चांगले भव्य वाटले व प्रत्येक खांबावर, मागच्या दोन पायांवर उभ्या राहिलेल्या रागीट घोड्या-सारखें दिसणारे ड्रॅगॉन्स आहेत. हें असले ड्रॅगॉन्स मीनाक्षीच्या मंदिरांतहि आम्हांला आढळले. हे ड्रॅगॉन्स म्हणजे पौर्वात्य शिल्पकलेवर पडलेली इजिप्शिअन छाप असं समजलं जातं. वसंत मंडपांत मीनाक्षीच्या पाणि-ग्रहणाचं चित्र पुन्हा दिसलं. विशेष सुंदर मूर्ति म्हणजे शिवाची. वसंत मंडपांतील शिवाची पोझ नेहमींप्रमाणें नटराजासारखी नव्हती हीं पोझ एखाद्या इंग्लिश बॅले नृत्यांतल्यासारखी आम्हांला वाटली. या पोझमधें शिवानं उजवं पाऊल अगदीं मस्तकापर्यंत उचलून धरलं होतं, डावा पाय सरळ खालीं टेकला होता आणि त्याच सरळ रेषेंत उजवा पाय मस्तकावर धरला होता. या अवघड पोझमध्यें शिवाच्या शरिराचा डौल असा कांहीं साधला होता कीं जणू कुणी नर्तकच नृत्यांत रममाण होऊन समोर उभा आहे असं वाटे.

शिवाच्या या मूर्तिसमोरच मंडपाच्या दुसऱ्या टोकाला मीनाक्षीची मूर्ति आहे. या मूर्तीला तीन स्तन आहेत. या तीन स्तनांच्या मूर्तिकडे पाहून आम्हांला आश्चर्य वाटलं. आणि या स्तनांमागचा म्हणजे मीनाक्षीच्या अवताराचा इतिहास बाळकृष्णाच्या तोंडून ऐकून तर आमची मति कुंठित झाली! ती कथा जितकी अद्भुतरम्य तितकीच विनोदी आहे.

विद्यावती नांवाची एक गंधर्व स्त्री पोटीं अपत्य नसल्यामुळं दुःखी होती. विद्यावती उत्तम गाणारी होती. त्यामुळं एका पायावर उभं राहणं किंवा झाडाभोवतीं प्रदक्षिणा घालणं असं कांहीं करण्याऐवजी आपलं गाणं ऐकवून देवी पार्वतीला खूष करावयाची व पुत्रप्राप्तीचा वर मागून घ्यावयाचा अशा निश्चयानं तिनं साग्रसंगीत तपश्चर्या चालवली. तिचं संगीत ऐकून पार्वती खूष झाली. परंतु विद्यावतीनं पुत्रप्राप्तीचा वर मागतांच ती म्हणाली, “ विद्यावती, या जन्मीं तुझ्या पोटीं अपत्ययोग

नाहीं. पुढील जन्मीं तूं पांडी राजाशीं लग्न कर. पांडी राजा एक महायाग करील. त्या यागाच्या होमकुंडांतून मी स्वतः तुझ्या कन्येच्या रूपानं अवतार घेईन. ही कन्या तूं सभाळ."

विद्यावतीनं पुढचा जन्म घेतला. पांडी राजशीं लग्न केलं. त्या राजानं यागहि केला आणि खरोखरच त्या यागाच्या होमकुंडांतून एक कन्या उत्पन्न झाली. इथपर्यंत ठीक झालं. परंतु नवीन एक भानगड उपस्थित झाली. ती या मुलीला तीन स्तनं होतीं. आणि या मुलीचं लग्न कसं व्हायचं हा मोठा प्रश्न विद्यावतीला आणि पांडी राजाला पडला! परंतु आम्ही मानव ज्या प्रश्नावर वादविवादाचीं रणं माजवितो ते प्रश्न आमच्या देवांना कसे चटसारे सुटतात. नियोजित वर भेटतांच मीनाक्षीचं तिसरं स्तन गळून पडेल अशी व्यवस्था देवांनीं करून ठेवली होती. शिवाला पाहतांच पहिल्या झटक्यांत प्रेम बसावं ना, तसं मीनाक्षीचं मधलं स्तन गळून पडलं आणि "हाच तो माझा नियोजित वर" अशी खात्री पटून मीनाक्षीनं शिवाला वरलं.

आम्ही वसंत मंडपांतून बाहेर पडलों आणि रस्त्यावर आलों. रस्त्यावर फारशीं रहदारी नव्हतीच. दूर कोपऱ्यावर एक विचित्र वाहन रेंगाळत चाललं होतं तिकडे खुणा करून बाळकृष्ण ओरडला, "ए पंडी, ए झटका."

झटका आमच्यासमोर येऊन उभा राहिला तेव्हां आम्हांला आश्चर्याचा झटकाच बसला! फक्त दोनच माणसं बसूं शकतील एवढी या झटक्यात जागा होती. आम्ही दोघं आत चढलों. आणि जेवायला बसावं तसं मांडी घालून बसलों बाळकृष्ण पंडीशेजारीं बसला. आणि मघा रेंगाळणारा झटका आतां अंगांत वारं शिरल्याप्रमाणं खुळखुळ करीत भरधाव सुटला.

बाळकृष्णानं पंडीला कोणता पत्ता सांगितला कुणाला ठाऊक. आमचा झटका मणी हॉटेलपुढं न थांबता एका प्रचंड इमारतीपुढं थांबला. बाळकृष्णानं खाली उडी टाकली आणि तो म्हणाला, "चला, उतरा खालीं. आपण मदुरेच्या राजाचा राजवाडा पाहूं या."

आम्ही पायऱ्या चढून भव्य प्रवेशद्वारातून राजवाड्यांत गेलों. परंतु राजवाडा कुठंच दिसेना ! इमारतीच्या मधोमध मोठा चौक आहे आणि त्यामध्यें उंच कारंजहि आहे. या चौकांत उभं राहून चारी बाजूंना दृष्टि फिरविली कीं राजवाड्याच्या वरच्या मजल्यापर्यंत पोचलेले वर्तुळकार खांब प्रथम डोळ्यांत भरतात. परंतु खाजगी दालनं कुठंच दिसली नाहींत. इथं कधींकाळीं राजघराणं नांदत असेल हें खरंहि वाटत नाहीं. कदाचित् आतां या सबंध इमारतींत कोर्टकचेऱ्या भरत असल्यामुळं तिचं पहिलं रूप पालटलं असावं. एनाक्षी रामराव या सिनेमा नटीनं आपल्या चित्रपटांतलं कांहीं शूटिंग या राजवाड्यांत केलं अशी माहिती बाळकृष्णानं दिली. ती ऐकतांऐकतां राजवाड्याबाहेर पडतांना मी अप्पांना म्हटलं, " आपण कधीं काळीं राजवाडा बांधला तर त्यांत कोर्टकचेऱ्या, बसण्याची व सिनेमाचं शूटिंग करण्याची सक्त बंदी करावयाची, बरं का ! "

आम्ही झटक्यांत बसलों तेव्हां एक वाजून गेला होता. उडुपी हॉटेलांची जेवण्याची वेळ टळून गेली होती. तेव्हां सरळ स्टेशनवर जाऊन तिथं डायनिंग रूममध्यें जेवण्याचं ठरविलं स्टेशनवर डायनिंग रूममध्यें शुकशुकाटच होता. अखेर आम्ही मुस्लिम रिफ्रेशमेंट रूममध्यें गेलों आणि भरपूर खाना मागवला. इथला मुसलमान वेटर त्याच्या प्रेमळपणामुळं आदबशीर वागण्यानं व अगत्यानं आम्हांला फारच आवडला. आम्ही त्याच्या जेवणावर इतकीं खूष झालों की पुन्हां रात्रीच्या डिनरचींहि ऑर्डर त्याला दिली आणि स्टेशनबाहेर पडून मणी हॉटेलकडे घेऊन चल असं पंडीला बजावलं.

मणी हॉटेलमधे पोंचलो. तेव्हां दोन वाजले होते. आता चार वाजेपर्यंत विश्रांतीच घ्यावयाची होती. परंतु झोप कशी ती लागेना ! सकाळपासून जें अलौकिक शिल्पसौंदर्य पाहिलं त्यामुळं मन मोहून गेलं होतं. बुद्धि स्तिमित झाली होती. मी डोळे मिटले होते; परंतु एकाहून एक सुंदर दृश्यं एखाद्या फिल्मप्रमाणं माझ्या दृष्टीसमोर सारखी फिरत होती.

ठरल्याप्रमाणं चार वाजतां बाळकृष्ण आला आणि मदुरा शहराचा

फेरफटका करण्यासाठीं म्हणून आम्ही बाहेर पडलों. टॅक्सी मिळाली नाहीं म्हणून अखेर आम्ही एक झटकाच ठरवला. त्या दिवशीं मदुरेच्या बाजारपेठा बंद होत्या. त्यामुळं सर्व प्रख्यात मदुरेच्या साड्या पाहतां आल्या नाहींत. ऊन प्रखर असल्यामुळं सर्व मोठ्या दुकानांवर खाकी पडदे सोडलेले दिसले. आम्ही बाजारपेठांतून हिंडलों. लहान गल्ल्यांतून आडवाटेनेंहि गेलों. या सर्व फेरफटक्यांत मदुरा शहराचं जें ओझरतं दर्शन आम्हांला घडलं त्यामुळं मनाला एक सुंदर शहर पाहून व्हावा तसा आनंद झाला. सिमेंट कांक्रीटचे ते स्वच्छ व नीटनेटके रस्ते, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं मंगलोरी कौलांच्या अभावीं आमच्या दृष्टीला थिटीं वाटणारीं पण सुबक चुनेगची घरं, मोठमोठे चौक, बागबगीचे, सरकारी इमारती वगैरे गोष्टींमुळं मदुरा शहर आधुनिक वाटलं. मदुरेविषयींची माझी कल्पना वेगळी होती. मीनाक्षीच्या देवालयामुळं प्रसिद्धीस आलेलं एक कोंदट, घाणेरडं क्षेत्र असेल असा माझा तर्क होता. पण तो आतां चुकीचा ठरला होता; आणि राहावं तर अशा नीटनेटक्या सुंदर शहरांत राहावं असा विचार आमच्या मनांत यावा इतकी छाप मदुरेनं आमच्यावर टाकली होती.

मदुरा शहरांतून फेरफटका करून आम्ही पुन्हा मीनाक्षीच्या मंदिराकडे आलों. सकाळीं सूर्यप्रकाशांत आम्हीं गोपुरांची शोभा पाहिली होती. आतां चंद्रप्रकाशांत ती पुन्हा पाहण्यासाठीं आम्ही आलों होतों. आकाशांत चांदण्याची कोवळी प्रभा फाकूं लागली होती. त्या सतेज उजळ निळ्या पार्श्वभूमीवर चारी गोपुरं अधिकच भव्य दिसत होतीं. चंद्रप्रकाशांत मीनाक्षीच्या प्रचंड मंदिराची शोभा स्वर्गीय वाटली. एक प्रचंड कलास्वप्न पुढं उभं असल्याचा भ्रम नेत्रांना झाला. मीनाक्षीच्या मंदिराभोवतीं चारी गोपुरांना सलग अशीं मोठीं खुलीं पटांगणं आहेत, त्यावरून हिंडतांना मोठी मौज वाटत होती. फिरतांफिरतां अप्पा मधेच थांबले आणि त्यांनीं बाळकृष्णाला विचारलं, " अरे, आम्हांला ते संगीत खांब कुठं आहेत ते दाखव की. "

बाळकृष्णाच्या मागोमाग आम्ही उत्तर गोपुराकडे गेलों. इथं प्रवेशद्वा-



त्रावणकोर दरबारांतील सुप्रसिद्ध नर्तिका-मिसेस गोपीनाथ

राच्या दोन्ही बाजूंना काठ्यांचा जुडगा करावा तसे खांबांच्या जुडग्यांचे चार झुरके होते. या जुडग्यांतला प्रत्येक खांब, घरगुती उपमा द्यावयाची झाली तर एखाद्या मुसळाएवढा जाड वाटला. आम्ही खांबांच्या प्रत्येक जुडग्याजवळ जाऊन हातांत एक दगड घेऊन पेटीचे सूर दाबावे त्याप्रमाणं प्रत्येक खांब ओळीनं ठोकून पाहिला. आणि काय आश्चर्य ! जलतरंगाप्रमाणं कमीअधिक उंचीचे मंजुळ स्वर त्या दगडी खांबांतून निघाले ! दगडांतूनहि संगीताचा ध्वनि निघावा अशी कोणती युक्ति शिल्पकारानं योजली असावी याचा तर्क आम्हीं केलाच; परंतु त्या शास्त्रांतल्या तज्ञांनींहि या बाबतींत खूपच संशोधन केलं होतं आणि त्यांनाहि अजून तें कोडं सुटलं नव्हतं. १४८५ मध्यें हें गोपुर बांधलं होतं. आमच्या पूर्वजांनीं शास्त्रीय विज्ञानांतदेखील त्या काळीं केवढी प्रगति केली होती तें लक्षांत घेऊन त्यांचं कौतुक करावं तेवढं थोडंच वाटलं.

मीनाक्षीचं अखेरचं दर्शन घेऊन आम्ही बाहेर रस्त्यावर आलों. दुतर्फा दुकानांतून दिवे झगमगत होते आणि स्त्रीपुरुषांची रहदारी वाढली होती. आम्हीं एक झटका ठरवला आणि बसण्यापूर्वी बाळकृष्णाचा निरोप घेतला. आम्हांला निरोप देताना त्याला अगदीं गहिंवरून आलं. आम्ही प्रवासी, तो एक धंदेवाईक मार्गदर्शक ! परंतु या औपचारिक संबंधांतसुद्धां एका दिवसाच्या सहवासानं जिव्हाळा उत्पन्न झाला होता. त्यानं मान बाजूला फिरवली. आम्हीहि झटकन गाडींत बसलों. ज्या सुंदर शहरांत आपण एक दिवस आनंदांत घालविला त्याचा निरोप आतां लवकरच घ्यावा लागणार हा विचार मनांत येऊन वाईट वाटलं. आम्ही स्टेशनवर पोचलों तेव्हां साडेआठ वाजले होते. आमचं जेवण तयार होतं. जेवण आटोपून आम्ही स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर आलों तेव्हां टिपूर चांदणं पडलं होतं. त्यानं स्टेशनचा फरसबंद प्लॅटफॉर्म न्हाऊन निघाला होता आणि त्या मधुचंद्राचं नाजुक बिंब पूर्व क्षितिजाकडे खूप वर आलं होतं.

मणी हॉटेलमध्यें मदुरेंतील ती पहिली आणि शेवटची रात्र आम्हीं घालविली. सकाळीं साडेआठच्या गाडीनं पुढं त्रिवेंद्रमला जायचं असल्यानं

आम्ही पहाटेच उठलों. सामान बांधून स्टेशनवर धाडून दिलं आणि मदुरेचा निरोप घेण्यासाठीं आम्हीं मणी हॉटेलच्या गच्चीवर येऊन उभे राहिलों. एखाद्या तरुणीचं सौंदर्य विरल वस्त्रामुळं अधिक मोहक दिसतं त्याप्रमाणं धुक्याच्या धवल वस्त्राखाली निद्रिस्त मदुरा किती सुंदर वाटली! मीनाक्षीच्या त्या सुंदर, प्रचंड, मनोहर गोपुराची शोभा आम्हीं डोळे भरून पाहून घेतली आणि जड अंतःकरणानं जिना उतरलों.

आम्ही स्टेशनवर पोचलों तेव्हां गाडी यावयास पंधरा मिनिटं अवकाश होता. परंतु स्टेशनवर गर्दी फार होती. गाडींत जागा मिळणं कठीण दिसत होतं. गाडी स्टेशनांत आली तेव्हां एकच गर्दी उसळली. गाडीला सेकंड क्लासाचे दोनच सलग डबे होते. त्यापैकीं एक पुरुषांचा व दुसरा बायकांचा. प्रवासांत प्रथमच आमची ताटातूट होणार असा रंग दिसूं लागला. मी कशीबशी बायकांच्या डब्यांत खिडकीशेजारीं जागा मिळवली आणि बाहेर पाहिलं तों पुरुषांच्या डब्याशीं कोण झुम्मड उडाली होती! त्या गर्दीत अप्पा कुठंच दिसेनात! सामान प्लॅटफॉर्मवरच पडलं होतं आणि हिरवी पगडी घातलेला गार्ड धावपळ करीत होता. शिटी वाजली, घंटा झाली तशी मी घाबरलें. इतक्यांत 'मॅडम, मॅडम' अशा हाका ऐकूं आल्या. मी पाहिलं तों बाळकृष्ण उभा! बिचारा आम्हांला भेटण्यासाठीं पुन्हां स्टेशनवर आला होता. त्यानं खिडकींतून सामान दिलं तें मीं डब्यांत घेतलं. आणि अप्पा कुठं दिसतात का म्हणून ट्रंकेवर चढून पुरुषांच्या डब्यांत पाहिलं, तो तिथं एकच मारामारी, दंगल उडालेली मला दिसली. एक दाढीवाले वृद्ध गृहस्थ आणि तुळतुळीत मस्तकाचा, भगवीं वस्त्रं पेहरलेला व काखेंत कुबड्या घेतलेला एक संन्यासी यांची खडाजंगी उडाली होती. त्यांच्याभोंवतीं सांपडेल तिथं लोक थांबले होते. वरच्या बर्थवरसुद्धां शरिराची कसरत करून लोक बसले होते. कांहीं दाढीवाल्याची बाजू घेत होते, तर सन्याशाची, तें भांडण आणि ती बाचाबाची पाहून मला मोठी मौज वाटली. त्रिवेंद्रमच्या तत्त्वज्ञानाच्या संमेलनासाठीं हजर राहणारे विद्वान साधुसंतदेखील, केवळ हातभर

जागेसाठीं सामान्य कारकुनाप्रमाणं भांडूं शकतात! मनुष्यस्वभावाची खरी पारख आगगाडीच्या डब्यांत होते यांत शंका नाहीं. या गर्दीत आतां आप्पांचा पत्ता लागणार तरी कसा, या पंचाईतींत मी पडलें. इतक्यांत "कमू, कमू!" अशा हांका मला ऐकूं आल्या आणि पाहतें तों आप्पा डब्याच्या दूरच्या टोंकाशीं उभे होते आणि आपला निळा रुमाल उंच हवेंत उडवून "मी ठीक आहे" अशा अर्थी हसत होते.

★

# ३

मदुरेच्या स्टेशनाबाहेर गाडी निघाली तेव्हां मी आपल्या जागेवर बसलें. माझ्या डब्यांत उतारू फार नसले तरी सामान खूपच होतं. शेजारच्या पुरुषांच्या डब्यांतल्या उतारूंनीं आमच्या डब्यांत आपलं सामान लोटून दिलं होतं. दोन डब्यांच्या मधल्या जागेंत कितीतरी जण खेचून उभे होते. एक गोरा रंगीत लठ्ठ मिशनरी तर आपल्या होल्डॉलसकट आमच्या डब्यांतच येऊन बसला होता! माझ्या डब्यांतल्या सातआठ जणी स्त्रिया सिलोनहून त्रिवेंद्रमच्या कॉन्फरन्ससाठीं निघालेल्या होत्या. त्यांपैकीं चौघी विद्यार्थिनी होत्या व तिघी सिलोन युनिव्हर्सिटीच्या प्रोफेसर होत्या. या सर्वांत माझं लक्ष ज्या स्त्रीकडे वरचेवर जात होतं तिचं नांव 'बेटी हायमन' आहे असं मला एका विद्यार्थिनीकडून कळलं. बेटी हायमन

जर्मन ज्यू आहे हें ऐकून मला तिच्याविषयीं अधिकच कुतूहल वाटलं. बेटी वयानं बरीच पोक्त असावी. आणि मिशनरी स्त्रियांत जो पोषाखाचा साधेपणा आणि स्वभावाचा लाघटपणा असतो तो तिच्या ठिकाणींहि मला आढळला. बेटीचा बॉब पुरुषासारखा होता. स्ट्रॉ-हॅटखालीं दोन्ही कानांवर अर्धवट पिकलेल्या केसांचीं झुलुपं ती वरचेवर हातानं चांचपून पाही; मध्येंच बॅगमधला छोटा आरसा काढून लांब धरून, माना तिरक्या करून त्यांत आपला चेहरा पाहून घेई आणि हसतांना इतके कांहीं खांदे उडवी आणि लचके, मुरडे कीं कांहीं विचारूं नका! बेटी सिलोन युनिव्हर्सिटींत संस्कृतची प्रोफेसर आहे या गोष्टीवर माझा बिलकूल विश्वास बसेना.

बेटीनं माझ्या चेहऱ्याकडे बराच वेळ टक लावून पाहिलं आणि मला विचारलं, "मीं तुमचा चेहरा पूर्वी कुठंतरी पाहिला आहे खास."

मीं विचारलं, "कुठं बरं?"

बेटी म्हणाली, "लंडनमध्यें तुला पाहिल्यासारखं वाटतं. तूं गेली होतीस लंडनला? चौदा वर्षांपूर्वी?"

"होय, मी गेलें होतें." असं सांगून टाकण्याचा मोह मला झाला. परंतु तेवढी थाप मारण्याचा धीर अंगीं नसल्यामुळं मी खरं तें बोलून गेलें. मीं "नाहीं" असं सांगतांच बेटीनं असे कांहीं खांदे उडविले आणि माना लचकवल्या कीं तें पाहून मला हसूंच लोटलं.

गाडी 'विरुधनगर' स्टेशनांत थांबली तेव्हां साडेनऊ वाजून गेले होते. पुरुषांच्या डब्यांत अजूनहि बाचाबाची चालूच होती—पण आतां जागेबद्दल नव्हे. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्वज्ञानासंबंधीं वादविवाद अगदीं रंगांत आला होता. इकडे माझ्या डब्यांत त्या तिन्ही जाड्या विद्वान् स्त्रिया सिलोन युनिव्हर्सिटीच्या कारभाराबद्दल सारखी टीका करीत होत्या. दोघी विद्यार्थिनी एकमेकींना तेलगू कविता ऐकवीत होत्या आणि तिसरी डोक्यावर ओला टॉवेल गुंडाळून एक भला मोठा ग्रंथ वाचीत बसली होती. बेटीनं त्या जाड्या मिशनऱ्याशीं दोस्ती केली होती आणि गप्पा मारण्याच्या रंगांत आपली जागा सोडून ती त्याच्या होल्डॉलवर जाऊन बसली होती.

गाडी थांबतांच बेटी खिडकीशीं उभी राहिली. आपल्याला कोणीतरी ओळखावं किंवा आपण कुणालातरी ओळखावं अशा उघड अपेक्षेनंच ती ऐटींत खिडकीशीं उभी राहिली होती. इतक्यांत म्हैसूरचे प्रोफेसर वाडिया डब्यावरून गेले. त्यांना पाहतांच बेटीनं आपलीं बोटं हालवून आपली ओळख दिली. वाडिया थोडेसे बुचकळ्यांत पडलेले, गोंधळलेले दिसले. परंतु एखाद्या स्त्रीनं ओळख दाखवावी नि आपण ती न जुमानतां पुढं जावं हें त्यांना जमेना. ते खिडकीशीं आले व त्यांनीं "आपण इकडे कुणीकडे?" असा एक सामान्य प्रश्न टाकला.

पण बेटी मोठी वस्ताद. तिनं स्पष्टच विचारलं, "मला ओळखलं नाहींत! चौदा वर्षांपूर्वी..."

वाडियांचा चेहरा एकदम हसरा झाला आणि ते म्हणाले, "हां हां! त्याच का तुम्ही?"

वाडियांना तिची ओळख पटली होती की नाहीं कुणास ठाऊक! पण त्यांनी विचारलेल्या प्रश्नानं बेटीचं मात्र समाधान झालं. पण तिनं वाडियांचं आणखीच सत्त्व पाह्यचं ठरवलं. त्यांना ती विचारूं लागली, "मी फारच बदललें, नाहीं? लठ्ठ काय झालें आहे... माझं रूप पार गेलं..."

यावर वाडिया प्लॅटफॉर्मच्या दुसऱ्या टोकाकडे पाहात एखाद्या तत्त्वज्ञान्याप्रमाणं म्हणाले, "वयोमानाप्रमाणं व्हावयाचंच तसं!"

वाडियांचं हें वाक्य बेटीच्या जिव्हारीं लागलं. तिचा निरोप घेऊन वाडिया निघून गेले तशी ती अतिशय खिन्न होऊन आपल्या जागेवर बसली आपल्याशींच म्हणाली, "गेले ते दिवस!" तिनं आपला छोटा आरसा काढला आणि त्यांत ती आपला चेहरा न्याहळून पाहूं लागली. वयोमानानं तिच्या चेहऱ्यावरचं सौंदर्य पुसलं गेलं होतं; परंतु त्या सौंदर्याच्या स्मृति मात्र तिच्या अंतःकरणांत ताज्या होत्या आणि म्हणून ती वरचेवर अशी बेचैन होत होती! बेटी हायमन संस्कृतची प्राध्यापक होती. परंतु प्रियकराची ताटातूट होतांना व्हाव्या तशा यातना आपल्या तारुण्याला निरोप देतांना तिला होत होत्या. मीं एक निःश्वास सोडला आणि खिडकीबाहेर पाहूं लागलें. मनुष्यस्वभा-

याचं कोडं उलगडतांना त्रासलेल्या माझ्या मनाला बाहेरची ती नवी अपरिचित मोकळी सृष्टिशोभा अधिक आल्हादकारक वाटूं लागली.

साडेदहा वाजतां 'शिवकाशी' स्टेशनांत गाडी थांबली. स्टेशन अगदीं लहान होतं आणि गांवाचा कुठंच पत्ता लागत नव्हता. अकरा वाजतां "श्रीवलवत्तूर" स्टेशन लागलं. हेंहि स्टेशन लहानच होतं. बारा वाजतां पुन्हां स्टेशनांत गाडी थांबली. मी खिडकीबाहेर वाकून स्टेशनचं नांव फळीवर वाचलं. 'करीवलमवंदनलूर !' अरे बापरे ! आमच्या आगगाडीइतकंच लांबलचक नांव होतं ! हीं लहानलहान स्टेशनं मागं टाकून गाडी पुढं जात होती तों तों भोंवतालचा प्रदेश अधिक अरण्यमय वाटत होता. दूरवर दिसत असलेली उंच पर्वतांची रांग आतां जवळजवळ येत चालली होती. आणि नारळी-पोफळींचीं गर्द बनं वाढत्या प्रमाणांत लागत होतीं. इतकंच काय, परंतु हवेंतसुद्धा फरक पडत चालला होता. 'शंकर नाम कोविल', 'शँडकोवीलशेंडी' हीं दोन लहान स्टेशनं घेऊन गाडी 'टेंकाशीं' या स्टेशनांत थांबली. तेव्हां तर आपण एका अरण्यांत उभे आहोंत असं वाटलं. गाडीच्या दोन्ही बाजूंनीं प्रचंड पर्वतांच्या रांगा आणि घनदाट वनश्री पसरली होती. दीड वाजतां गाडी 'शंगोटा' स्टेशनांत थांबली. या स्टेशनावर गाडींतले सारे उतारू भराभर उतरलेले पाहून मला आश्चर्य वाटलं. इतक्यांत आप्पा खिडकीशीं येऊन म्हणाले, " फक्त याच स्टेशनावर जेवण मिळू शकेल. तेव्हां चल जेवून घेऊं." आम्हीं दोघं स्टेशनावरील हिंदु रिफ्रेशमेंट रूमकडे गेलों तों ती सारी खोली स्त्री-पुरुषांनीं गच्च भरली होती. एका उंच प्लॅटफॉर्मवर एक उडपी उभा होता, त्याच्या हातांत केळीच्या पानाचे पुडे होते आणि ते पुडे घेण्यासाठीं शेकडों स्त्रीपुरुष झटत होते. या गर्दींत घुसून पुडा मिळवणं आम्हांला शक्यच नव्हतं. पण भूकहि लागली होती. इतक्यांत सध्यां धारवाड कॉलेजांत प्रोफेसर असलेले स्वामीदासन् आमच्या मदतीला आले. ते चांगले उंच असल्यामुळं त्यांनीं लवकरच दोन पुडे मिळवले. आम्हीं ते पुडे हातांत घेतले आणि सोडले. आंत कालवलेला ताकभात आणि केळयाचीं भजीं होतीं. स्वामीदासन्नी आम्हांला

दोन पेले कॉफीदेखील मिळवून दिली. जेवणाचा हा अपूर्व समारंभ घाई-घाईनं आटोपून आम्ही परत डब्याकडे धांवलों; कारण गाडी सुटण्याची शिटी झाली होती.

शंकोटा स्टेशन अगदीं गर्द अरण्यांत बांधलेलं आहे. तिथून मलबारची हद्द सुरू होते म्हणतात. आणि खरोखरच गरम हवेंतून एअर-कंडिशन्ड खोलींत प्रवेश केल्यावर जसा हवेंत बदल वाटतो तसांच बदल शंकोटा स्टेशनांत गाडी शिरतांच आम्हांला वाटला. आजूबाजूला घनदाट वृक्षराजीनं झांकलेले पर्वत आणि दऱ्याखोऱ्यांतून डोलणारीं नारळी-पोफळींचीं बनं यांमुळं हवा एकदम सर्द कुंद वाटतं होती. विरुधनगर सोडल्यापासून जीं लहान स्टेशनं लागलीं तिथली लोकवस्ती अगदीं तुरळक वाटली होती. शंकोटा स्टेशनवरहि शंकोटा गांवाचा पत्ता लागण्यासारखा नव्हता. किंबहुना आजूबाजूचं अरण्य पाहून इथं लोकवस्ती असवी हेंच मला खरं वाटत नव्हतं. शंकोटा स्टेशन सोडून गाडी मलबार प्रांतांत शिरली तशी दोन्ही बाजूंनीं दिसणाऱ्या वनश्रींची भव्यता वाढू लागली.

शंकोटानंतर भागवथीपुरम्, अरियंकव, टेनेमलाइ, एडमना हीं लहान-लहान स्टेशनं लागलीं. अरण्यांत मधेच एखादा मठ दिसावा तशीं हीं स्टेशनं दिसत. भागवथीपुरम् स्टेशन सोडल्यापासून टेनेमलाइपर्यंत चार मोठे बोगदे लागले. तारेवर कसरत करावी त्याप्रमाणं आमची गाडी हळू जपून तोल सांवरून चालली होती. उंच प्रचंड पर्वतशिखरांची रांग आमच्या गाडीवर डोकावून पाहात होती; आणि एखाद्या खोल भयंकर दरीला वळसा घालून गाडी जाऊं लागली कीं ती अगदीं दरींत कलंडत असल्याचा भास होई. मी भीतीनं एकदम खिडकीपासून दूर होऊन डब्याच्या मध्यभागीं उभी राहात असे! त्याबद्दल शेजारच्या विद्यार्थींनी माझी चेष्टाहि करीत होत्या. परंतु गाडी वळसा घेत असतांना इतकी दरींत कलल्यासारखी वाटे की मीं खिडकीशीं जाऊन खाली डोकावलें तर सबंधच्या सबंध गाडी दरींत कोसळल्याशिवाय राहणार नाहीं असा विचित्र धाक माझ्या मनानं घेतला होता. सृष्टीचं तें प्रचंड वैभव पाहून माझी

बुद्धि चकित झाली होती. आणि त्या सौंदर्याच्या विराट स्वरूपानं माझं मन भेदरल्यासारखं झालं होतं. गाडीनं टेनेमलाइ स्टेशन सोडलं तेव्हां साडेतीन झाले होते. टेनेमलाई स्टेशनावर झाडांचे हजारो ओंडके आडवेउभे रचलेले दिसले. टेनेमलाइ स्टेशन मागं टाकून गाडी निघाली ती एका मोठ्या बोगद्यांत शिरली. हा चौथा बोगदा. बोगद्यांतून बाहेर पडल्यानंतर लवकरच दोन पर्वतांच्या घळींतून एक लहानसा नदीचा प्रवाह दिसला आणि त्यावर बांधलेला झुलता पूलहि लांबून एखाद्या चित्रांतल्या सेटिंगप्रमाणं सुंदर वाटला. पुनलूर स्टेशनांत गाडी थांबली तेव्हां साडेचार वाजले होते. उन्हाची प्रखरता कमी झाली होती. सृष्टीचं उग्र स्वरूप पालटलं होतं. खेळकर किरणं आणि वनश्री यांचा छायाप्रकाशाचा मनोहर खेळ सुरू झाला होता. पंचरंगी झारीनं रंगाचा शिडकाव करावा त्याप्रमाणं त्या प्रचंड पर्वतांचे पायथे आणि उत्तुंग शिखरं रंगारंगानीं न्हाऊन गेलीं होतीं, आणि खोल दऱ्यांचा गडद हिरवा रंग उजळला होता !

पुनलूरनंतर एका तासांत अवनीश्वरम, कोटारकरा, कुंडारा हीं तीन स्टेशनं गाडीनं मागं टाकलीं. अवनीश्वरम् स्टेशनावर प्रथम मलबारी तऱ्हेचीं झोपडीवजा घरं मला दिसलीं. या घरांचीं अर्धी चंद्रकोरीप्रमाणं कमानदार असल्यामुळं घरं मोठीं मजेदार दिसतात. ‘कोइलॉन’ स्टेशनांत गाडी उभी राहिली तेव्हां सहा वाजले, होते. आतांपर्यंतच्या स्टेशनांत कोइलॉन स्टेशनंच मोठं वाटलं, आणि अतिरम्यहि वाटलं. कोइलॉन ते त्रिवेंद्रम् कालव्यांतून बोटीनं प्रवास करतां येतो. कालव्याच्या दोन्ही बाजूंनीं नारळी पोफळींचीं दाट बनं व रम्य वनश्री असल्यामुळं कोइलॉन ते त्रिवेंद्रमची नावेंतील सफर म्हणजे एक सृष्टिशोभेची मेजवानीच. विशेषतः चांदण्या रात्रीं तर ह्या सहलीचं सुख अवर्णनीय असलं पाहिजे.

कोइलॉन स्टेशनावर उतारूंची गर्दी होती आणी स्टेशनपासून जवळच शहरांत गेलेल्या, लाल मातीच्या आखीव रस्त्यावर कोइलॉनच्या स्त्री पुरुषांची तुरळक रहदारीहि दिसत होती. सात वाजतां गाडी वरंकलाई स्टेशनांत आली. वरंकलाई येथील डोंगरकडे व पोहण्याच्या जागा फार प्रेक्षणीय

आहेत म्हणतात. वरंकलाईनंतर चिरयंकील, कन्यापुरम् स्टेशनं गेलीं. त्रिवेंद्रमपेटा स्टेशनांत गाडी उभी राहिली तेव्हां आठ वाजून वीस मिनिटं झालीं होतीं. मी चटकन् उठले आणि करमणुकीसाठीं म्हणून बाहेर काढलेलीं मासिकं आणि फराळाचा डबा ट्रंकेंत घातला. बाकाखालीं सामानाखाली पडलेल्या वहाणा शोधून पायांत घातल्या. मनीबॅग उघडून पॉवडर, लिपस्टिक लावली. केस नीट केले. आणि सामान मोजून ठेवून मीं तयार झालें. माझी छाती अधीरतेनं, आनंदानं कोण धडधडत होती! त्रिवेंद्रम येणार या एकाच कल्पनेनं माझ्या मनाची इतकी त्रेधा उडाली होती, की बाकीच्या सान्या गोष्टी मी करूं तरी शकलें कशी याचं मला आश्चर्य वाटलं!

बरोबर साडेआठला आमची गाडी त्रिवेंद्रम स्टेशनांत उभी राहिली! आप्पा आणि मी हसतच त्रिवेंद्रमच्या त्या प्रशस्त प्लॅटफॉर्मवर उभे राहिलो. गाडींतले इतर सारे उतारूहि आमच्याप्रमाणेंच कुणाची तरी वाट पाहात उभे राहिले. हें दृश्य खरोखरीच मोठं गमतीदार वाटलं. अखेर कुणीच हालचाल करीत नाहीसं पाहून आप्पा प्लॅटफॉर्मवर हिंडून, चौकशी करून एका व्हालंटियरला पकडून घेऊन आले. डेलिगेट्सना उतरून घेऊन त्यांच्या निवासस्थानाकडे पोचविण्याची व्यवस्था करण्यासाठीं कॉंग्रेसनं स्वयंसेवक पाठविले होते; परंतु. ते येण्याची वाट न पाहतां आम्ही बाहेर पडलों व त्या व्हालंटियरनं दाखविलेल्या बसमध्यें जाऊन बसलों. आमच्यामागोमाग आणखीहि कांही डेलिगेट्स् आले. बस युनिव्हर्सिटी होस्टेलकडे निघाली. प्रथम बजबजलेल्या रस्त्यांतून आम्ही गेलों. नंतर बस एका शांत प्रशस्त रस्त्यांत शिरली आणि पांचदहा मिनिटांतच मोठ्या फाटकांतून एका इमारतीच्या आवारांत बागेंतून वळणें घेतघेत मुख्य दरवाजासमोर उभी राहिली. बस उभी राहतांच कॉंग्रेसचे सेक्रटरी, व्यवस्थापक यांनीं आमचं स्वागत केलं आणि नोकराकरवीं आमचं सामानसुमान होस्टेलकडे पाठवून दिलं. युनिव्हर्सिटीच्या प्रचंड इमारतीला वळसा घालून आम्ही दुसऱ्या लगतच्या बागेंत शिरलों. ही, बाग होस्टेलभोंवतालची होती.

होस्टेलची इमारत दुमजली होती आणि बागेंतूनच दुसऱ्या मजल्यावर गोल लोखंडी जिना गेला होता. आम्हीं दुसऱ्या मजल्यावर सर्वांत सुंदर खोली पसंत केली. नोकराला खोली दाखविण्यासाठीं आप्पा पुन्हा वसकडे गेले. मीं कोट काढला, पंखा सुरू केला आणि वळून पाहतें तों एक गुजराती गृहस्थ हातांत ट्रे घेऊन खोलींत आले होते. त्या ट्रेमध्यें दोन पेले कॉफी, खूप मेवामिठाई आणि फराळाचे पदार्थ होते. मला आदरानं सलाम करून ते गृहस्थ म्हणाले, "मी मेसमधे महाराजा आहे."

इतक्यांत आप्पा आले. टेबलावरचा तो ट्रे पाहून ते चकितच झाले! तो गुजराथी गृहस्थ कुणीं तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर आणि कॉंग्रेसचा डेलिगेट असावा अशा समजुतीनं त्याच्याशीं त्यांनीं शेकहँडहि केला! मीं मागून त्यांना खूप खुणा केल्या! पण...

नंतर चहाफराळ करतांना तो गुजराती महाराजा आहे असं मी सांगितलं तेव्हां ते खूप हसत सुटले. महाराजानं आमची व्यवस्था अगदीं महाराजासारखीच ठेवली. आमचं रात्रीचं जेवणहि तो वर घेऊन आला. आम्हीं जेवण आटोपून होस्टेलच्या गॅलरींत आलो. चांदणं पडलं होतं आणि खालीं पसरलेल्या बागेंत फिरण्याचा मोह आवरण्यासारखा नव्हता. आम्ही खालीं उतरलों. लहानलहान फुलझाडं व वनस्पतींचें रंगीबेरंगी वाफे ओलांडून आम्हीं होस्टेलमागच्या हिरवळींवर गेलो. या जागीं मोठमोठे वृक्ष होते आणि त्याखालीं बाक मांडले होते. यांपैकीं एका बाकावर आम्ही बसलो. ज्या वृक्षाखालीं आम्ही बसलों होतों त्याच्या फांद्या दूरवर पसरल्या होत्या आणि पानांची सळसळ, कुजबुज चालू होती. बगीच्यावरून वाहणाऱ्या वाऱ्याच्या झुळुका सुगंधी होत्या आणि चांदण्यामुळं अधिकच शीतल वाटत होत्या. त्या जागीं बसून गप्पा मारतां मारतां आम्हांला वेळेचं भान राहिलं नाहीं. दुसऱ्या दिवशीं तत्त्वज्ञानाची परिषद सुरू व्हायची होती, तिच्याबद्दल आम्ही पुनःपुन्हा बोलत होतों. त्या परिषदेंत त्रावणकोरचे महाराज, महाराणीसाहेब, सर सी. पी. रामस्वामी, परिषदेचे अध्यक्ष प्रो. शरीफ अशी बडीबडी मंडळी आम्हांला दिसणार होती,

त्यांचीं व्याख्यानं ऐकायला मिळणार होतीं, त्यांचीं कल्पनाचित्रं आम्ही काढीत होतों. बोलतां बोलतां माझं लक्ष एकदम चंद्राकडे गेलं. आतां चंद्र खूपच वर आला होता व सबंध बगीचा चांदण्यानं नाहत होता. माझ्या मनांत आलं, आपण आहोंत तरी कुठं! पृथ्वीवरच आहोंत कीं तत्त्वज्ञानाचं श्रवण करण्यासाठीं कुठल्यातरी दिव्य लोकांत आपल्याला कोणी आणून सोडलं आहे!

दारावर कोणीतरी टकटक केल्याचा भास होऊन मी जागी झालें आणि डोळे उघडले तों प्रथम गरगर फिरणारा विजेचा पंखा मला दिसला. आपण आहोंत तरी कुठें या गोंधळानं माझ्या मनानंही चारदोन गिरक्या खाल्ल्या. मग एकदम आठवलं कीं आपण त्रिवेंद्रममधे आहोंत. आज संध्याकाळीं चार वाजतां तत्त्वज्ञानाची कॉनफरन्स सुरू व्हायची होती पण त्या आधीं आता नऊ वाजता त्रिवेंद्रम शहरांतील सारीं प्रेक्षणीय स्थळं डेलिगेटसना दाखविण्यासाठीं म्हणून कॉन्फरन्सतर्फे तीन बसेस निघणार होत्या. नऊ वाजतां तयार रहा अशी सूचना आम्हांला सेक्रेटरीनं दिली होती. हें सारं आठवतांच माझी झोप पार उडाली. मी चटकन उठून पंखा बंद केला आणि दार उघडलं तों तेवढ्या पहाटे हातात कॉफीचा ट्रे घेऊन होस्टेलच्या मेसमधील नोकर दाराशीं उभा होता. मी कॉफी आंत घेतली आणि आप्पांना हाक मारली, ट्रेमध्ये कॉफीचा थाट मोठा अपूर्व होता. दोन लहान पातेल्यांत पितळेचे कॉफीनं भरलेले भंपर पालथे घतले होते. केटली कपबशी वगैरे कांहींच नव्हतं मी पातेली उलटी केली आणि भंपर सरळ धरून ओठाला लावला. दक्षिणेंतली प्रसिद्ध कॉफी अशी या कडू काढ्याची प्रसिद्धी व्हावी याचं मला आश्चर्य वाटलं. पहाटेच्या थंडीमुळें ती गरमगरम कॉफी कडू होती तरी आम्ही पिऊन टाकली. नेहमीप्रमाणें आप्पानीं माझ्यामागे तगादा सुरू केला, की बरोबर नऊ वाजता बसेस निघतील तेव्हां त्याच्या आंत, वेणी, स्नान, पोशाख आटोपून तयार रहा. परंतु असं मला बजावतांना ते स्वतः मात्र बूट कोट चढवूं लागले. 'तुम्ही कुठे निघालांत' असं मी विचारलं तेव्हां ते

म्हणाले:—, "आपलं परत प्रवासाचं रिझर्वेशन आताच केलं पाहिजे. मीं स्टेशनवर जाऊन रिझर्वेशनची व्यवस्था करून तासाभरांत परत येतो. परंतु तूं मात्र आटप." आम्ही गॅलरीत आलों. पुन्हां एकदां 'लवकर येतो' असं सांगून आप्पा जिना उतरले आणि बगीचांतील पाऊल-वाटेनं निघाले. गेटापाशीं थांबून मागं वळून पहात ते पुन्हा हसले तेव्हां त्यांना पाहून चुरशीनं धांवा काढण्यासाठीं निघालेल्या एकाद्या क्रिकेटरची मला आठवण झाली.

मीं खोलींत परतलें. तो अवघे सव्वासातच झाले होते. नऊ वाजतां बसेस निघणार होत्या. म्हणजे अजूनी चांगला दोन तास अवकाश होता. मी एक इंग्रजी मासिक उघडलं आणि प्रवासांत अर्धवटच राहिलेली गोष्ट पुढें वाचूं लागलें. वाचनाच्या ऐन रंगात यावं आणि कसलं तरी विघ्न येऊन वाचनाचा भंग व्हावा हा माझा अगदीं ठराविक अनुभव आहे. आतां माझी गोष्ट ऐन रंगात आली होती. तोंच दाराशीं कोणी कसल्या चमत्कारिक भाषेंत हांका मारीत होतं. मी अंक बाजूला सारला आणि दार उघडतें तो होस्टेलचा नोकर हातवारे करून मला कांहीं सांगत होता. त्यानं स्नानासाठीं गरम पाणी काढलं होतं. व शेजारीच बाथरूम आहे स्नान करून ध्या. असं तो मला सांगत होता. स्नान आटोपून मी परतलें. पोषाख वेणी वगैरे माझी तयारी झाली तेव्हां सांडे आठ वाजून गेले होते. आणि तासाभरांत येतो म्हणून बजावून गेलेल्या आप्पांचा अजूनी पत्ता नव्हता. पावणे नऊ वाजले तशी मी गॅलरीत येऊन उभी राहिले. हॉस्टेलच्या मुख्य इमारतीपुढे एक बस येऊन थांबल्याचा आवाज मी ऐकला. आमच्या उजव्या बाजूच्या खोलींत उतरलेल्या सिलोन युनि-व्हर्सिटीच्या प्रोफेसरीणबाई आणि त्यांच्या मागोमाग त्यांच्या दोन विद्या-र्थीनी बसकडे निघालेल्याही मी पाहिल्या. डेलिगेट्सना 'चला आटपा' असा तगादा देणारा बसचा पोंगाही दोनतीन वेळां ड्रायव्हरनं वाजविला. खालच्या मजल्यावर उतरलेले प्रो. जोग गरम सूट व फेल्ट हॅट अशा अस्सल साहेबी पोशाखांत लगबगा बसकडे चालूं लागले. त्यांच्या मागोमाग जरी-

काठी नऊवारी पातळ नेसलेल्या त्यांच्या पत्नीही निघाल्या. आमच्या डाव्या बाजूच्या खोलींत प्रो० कोटुरकर व त्यांच्या पत्नी उतरल्या होत्या. त्या खोलींत सामसूम होतं त्यावरून हें जोडपं आधींच पुढें गेलं असावं. आणखीही दोन बसेस लागोपाठ येऊन थांबल्याचा आवाज मीं ऐकला. आमच्या इमारतीमधून होस्टेलच्या मुख्य इमारतीकडे सेक्रेटरीची धांवपळ सुरू झाली. सर्व डेलिगेट्सना व्यवस्थित बसविण्यासाठीं बिचारा किती धरपडत होता. एखाद्या पोरीप्रमाणें तो आपली लांब शेंडी आणि खांद्यावरचं उपरणं वरचेवर सांवरीत होता. एका खेपेला त्यानं वर गॅलरीकडे पाहिलं तों मी उभी होतें. तो किंचित् गोंधळला. परंतु मी 'कमिंग' असं सांगतांच तो लगबगा पुढें निघून गेला. मी घड्याळांत पाहिलं तो नऊ वाजले होते. तिन्ही बसेस पोर्चमध्यें येऊन उभ्या राहिल्या होत्या. सर्व मंडळीही जाऊन बसलीं होती. आतां एकदोन मिनिटांत आप्पा आले तरच आम्हांला बस गाठणं शक्य होतं.

परंतु आप्पा आले नाहींत. तिन्ही बसेस एका मागून एक निघून गेल्या. होस्टेलच्या आवारांत मधेंच उसळलेलीं खळबळ वर्दळ संपली आणि पुन्हा जिकडे तिकडे शांत झालं. पण माझ्या मनांत मात्र निराशेचं आणि संतापाचं वादळ माजलं. केवळ आप्पानीं उशीर केल्यामुळें सकाळचा साराच कार्यक्रम फिसटकला होता. नेहमीं माझ्याकडून उशीर झाल्यामुळें गाडी चुकते, सिनेमा अर्धा जातो व्याख्यानाऐवजीं आभारभाषण ऐकावं लागतं, असें आरोप करणारे आप्पा आतां स्वतः उशीर करून चांगलेच माझ्या रागाच्या तावडीत सांपडले होते.

परंतु आप्पानीं खोलीत प्रवेश केला तोच मुळीं हास्याचं पांढरं निशाण लावून. तेव्हां आतां भांडणाचा प्रश्नच उरला नव्हता. प्रश्न उरला होता तो हा कीं आतां आपण बसेसमधून पुढें गेलेल्या पार्टीला गाठायचं कुठें व कसं ? आम्ही खोली बंद केली व खालच्या मजल्यावरील परिषदेचे मुख्य चिटणीस सुंदरराज नायडू याच्या ऑफिसांत जाऊन चौकशी केली. त्यांनीं सांगितलं कीं बसेस प्रथम विमानतळ, मत्स्यगृह वगैरे पाहून नंतर

' आर्ट गॅलरी ' पाहण्याकरितां रंगविलास पॅलेसवर येतील व तेथें तुम्हांला त्या मंडळींना गांठता येईल. नायडूंनीं आमच्याबरोबर एक स्वयंसेवकही दिला. आम्ही होस्टेलबाहेर पडलों. होस्टेलवरून गांवात जाणारा रस्ता मोठा प्रशस्त व सिमेंट कॉंक्रीटचा होता. आतां साडेनऊ झाले होते. परंतु रहदारीची वर्दळ सुरू झाली नव्हती. क्वचित् एखादी स्त्री, डोकीवर छत्री धरून, पाठीचा कणा ताठ धरून ऐटबाज पावलं टाकीत जाता येतांना दिसे तेवढीच. मधेच एक भलीमोठी मोटार मागून आली व पुढें निघून गेली. गाडीच्या मागच्या बाजूस ' त्रावणकोर ' अशा इंग्रजी अक्षरांची तांबडी पाटी होती. आंत कोल्हापुरी फेटा बांधून बसलेली व्यक्ति आम्हाला झर्रकन दिसली ते बहुतेक महराज असावे. या रस्त्यानें आम्ही दहाएक फर्लांग चालून गेल्यावर डाव्या बाजूला एका खूप मोठ्या प्रचंड चर्चची इमारत आम्हांला दिसली. चर्चच्या टॉवरवर क्रॉसवर टांगलेला येशू खिस्ताचा भव्य पुतळा होता. थोड्याच वेळांत आम्ही रस्त्याचा चौकांत आलो. या चौकांत आणखी तीन मोठे रस्ते निघाले होते. चबुतऱ्यावर एका गोंडस बालकाची मूर्ति बसविली होती. या चौकांतून आम्ही डाव्या बाजूच्या रस्त्यांत वळलों. रस्त्याच्या बाजूस फूटपाथ पलिकडील मोकळ्या जागेंत आपापल्या ' रिक्षा ' पुढें बसून राहिलेले काळे कूली आम्हांला पहाताक्षणीच धांवत आले व त्यांनीं आपल्या भाषेंत किलबिलाट सुरू केला. आप्पा रिक्षा ठरवूं लागले तेव्हां मी आप्पांना म्हटलं " मी रिक्षांत बसणार नाहीं. त्यापेक्षा आपण चालत जाऊं. " आप्पाना माझा हट्ट विचित्र वाटला असावा. रंगविलास पॅलेस दोन मैल दूर होता. शिवाय आम्हांला तेथें लवकर जाऊन बसेस मधील पार्टी गाठायची होती. " येथे सगळे लोक बसतात. मी सुद्धां सकाळीं रिक्षांतूनच स्टेशनवर जाऊन आलों. चल-उगीच भलतच वेड घेऊं नको—" अशी आप्पा माझी समजूत घालूं लागले. परंतु रिक्षांत बसण्यास माझं मन बिलकूल कबूल होईना. उलट आप्पांनीं रिक्षांत बसावं ही गोष्ट माझ्या मनाला लागली, व मला आश्चर्य वाटलं. मी त्यांना विचारलं, " खरंच तुम्ही रिक्षांत बसलांत ? आपण रिक्षांत बसावं आणि

आपल्याच एका बांधवानं गुरासारखी रिक्षा ओढावी याचा तुम्हांला कांहींच संकोच वाटत नाहीं!" यावर आप्पा म्हणाले, "त्यांत संकोच कसला? रिक्षा ओढणं हा एक मजुरीचा प्रकार आहे. तूं नाहीं कां धुणं भांडं झाडलोट मोलकरणीकडून करून घेत? आणि पैशाच्या मोबदल्यांत त्याहूनही घाणेरडीं कामं करणारीं माणसं आहेत ना! मग फक्त रिक्षांत बसण्यापुरतांच तुला संकोच कां वाटतो?"

आप्पांचा युक्तिवाद पटण्यासारखा होता तरी तो मला पटला नाहीं. मी उंच पोषाख करून रिक्षांत बसावं, आणि फाटकी तुटकी लुंगी नेसलेल्या कुलीनं धापा टाकीत माझा रिक्षा ओढत न्यावा हा विचार मला कदापि सहन होण्यासारखा नव्हता. मात्र आप्पांना या गोष्टीचं कांहींच वाटूं नये, किंबहुना त्यांनीं खुशाल रिक्षांत बसावं याची माझ्या मनाला चुटपुट लागून राहिली व जेव्हां कधीं संधी मिळेल तेव्हां त्यांचं मन या बाबतींत वळविण्याचा निश्चय मी करून टाकला.


'काय विचित्र मुलगी आहेस' असं आप्पा म्हणाले. रंगविलास पॅलेस-पर्यंत चालत जावं लागलं असतं तर ते आणखीही रागावले असते. परंतु तेव-ढ्यांत समोरून एक झटका आला. 'यांत तरी बसायचं कां' असं आप्पांनीं विचारतांच मला हसूं लोटलं. "अर्थात बसायचं" असं म्हणून मी झटक्यांत चढलें. स्वयंसेवकानं झटकावाल्याला रंगविलास पॅलेसचा पत्ता सांगितला व आमचा झटका दौडत निघाला.

रंगविलास पॅलेसवर आम्ही पोचलों तेव्हां अकरा वाजले होते. रंगवि-लास पॅलेसवरहि कोणाची चाहूल नव्हती. गेटापाशीं एक बावळट शिपाई तेवढा उभा होता. आम्ही सरळ गेटांतून आंतील आवारांत गेलों. नांव 'रंगविलास' परंतु इमारत होती ती अगदी बैठी व साधी. आम्ही पायऱ्या चढून वर गेलो तोंच आमची चाहूल ऐकून आंतील बाजूच्या एका खोलीं-तून गुडघ्यापर्यंत पांढरा कोट घातलेले एक गृहस्थ बाहेर आले. आम्ही त्यांना आमचीं नांवं सांगितलीं. आम्ही परिषदेसाठीं आलों असून आतां आर्ट गॅलरी पाहाण्यासाठीं म्हणून मुद्दाम आलों असं ऐकतांच त्या



मीनाक्षीच्या देवालयांतील एक हजार खांबांचा हॉल.

मीनाक्षी मंदिराच्या आंतील देवालयें व पुष्करिणी.



गृहस्थांना फार आनंद झाला व ते हसून म्हणाले, "अस्सं का! मग चला तर. मीच तुम्हांला गॅलरी दाखवतों कारण इथली सारी व्यवस्था माझ्याच ताब्यांत आहे. माझं नांव निलकंठ पिलाई." असं बोलत ते आम्हांला प्रथम एका मोठ्या हॉलमधें घेऊन गेले. जातांजातां ते म्हणाले, "ह्या रंगविलास पॅलेसमधें फार पूर्वी म्हणजे १८६० ते १८८० या कालांत आयिलियम थिरूनल नांवाचा त्रावणकोरचा राजा रहात असे. त्याच्या मृत्यूनंतर हा राजवाडा बरीच वर्षं रिकामा होता. त्याची थोडी-फार पडझडही झाली होती. नंतर १९३५ मधें सध्यांच्या महाराजांनीं मूळ इमारतींत सुधारणा करून ही 'आर्ट गॅलरी' स्थापना केली. या 'आर्ट गॅलरी' मधें त्रावणकोरच्या राजे महाराजांनीं संग्रहित केलेल्या व इतर देशांतून मुद्दाम आणविलेल्या मौल्यवान कलावस्तू ठेवल्या आहेत. आमच्या त्रावण-कोरचं भूषण अशा दोन कला–नृत्य–व हस्तीदंताचं कोरीव काम—यांचे उत्कृष्ट नमुने इथं पाह्यला सांपडतात"—नंतर त्या हॉलमधें गेल्यावर ते म्हणाले, "हा पहा कथाकली हॉल."

हॉलच्या तिन्ही भितीलगत दीड पुरुष उंचीच्या रंगीत लाकडी मूर्ती मांडल्या होत्या. कथाकली नृत्यप्रकारांतलीं हीं सारीं मुख्य पात्रं होतीं. त्रावणकोर कथाकली नृत्याचं माहेरघर समजलं जातं. सतराव्या शतकांत कोटारकराच्या राजानं हा नृत्यप्रकार शोधून काढला व अजूनहि कथाकली नर्तक आपली रंगभूषा व वेषभूषा त्या पूर्वापार पद्धतीला अनु-सरूनच करतात. त्या काळांतल्या 'मेकअपची,' व 'कॉस्टयूमची,' कल्पना अभ्यासू जिज्ञासू लोकांना देण्याकरितां-मेकअप व कॉस्टयूम केलेली अशीं बारा प्रमुख पात्रं हॉलमधे ठेवलीं होतीं. मला स्वतःला नृत्यकलेची फार आवड आहे. ज्यांच्याकडे मी नृत्य शिकत होतें ते शिक्षक श्री. नागभूषण कथकली नर्तक असल्यामुळें त्यांनीं या नृत्यप्रकाराची बरीचशी माहिती मला दिली होती. त्यामुळें हॉलमधील प्रत्येक मूर्ती समोर उभं राहून तो किंचित् चमत्कृतिपूर्ण मेकअप आणि ती भडक वेषभूषा बारकाईनं पाहण्यांत मीं गढून गेलें.

या बारा पात्रांत सुष्ट व दुष्ट असे प्रकार होते. सुष्ट किंवा सज्जन पात्रांच्या मुद्रा पांढऱ्या व हिरव्या रंगानं रंगविलीं होतीं. शिवाय त्यांच्या दुष्टपणाची खूण म्हणून त्यांच्या नाकावर एक गोटी ठेवली होती. नारदमुनी, दूत, गरूड, हनुमान, धनुर्धारी राम, किरात आणि कथानायक देवेंद्र हीं सारीं पात्रें नीलकंठ पिलाईच्या तेलगू भाषेंत "पच्चा" म्हणजे सज्जन होतीं. नारदमुनीच्या छातीवर पांढरी दाढी रुळत होती. दाढीवाले नारदमुनी प्रथमच पाहात होतें मीं! किराताची मुद्रा काळ्या रंगांत रंगविली होती. परंतु त्यांच्या नाकावर गोटी ऐवजी फूल असल्यामुळं किराताची गणना सज्जनांत करावी लागली होती. रावणाच्या नाकावर गोटी होतीं. या सर्व पात्रांच्या वेषभूषाहि अत्यंत भडक व कमरेखाली घेरदार अशी होतीं. हॉलच्या मध्यभागीं उभे राहून भोंवतालच्या त्या नर्तकांच्या मूर्ती पाहतांना माझ्या मनाला क्षणभर मोठा भ्रम पडला, व वाटलं जणूं हे सर्व नर्तक पडदा दूर सरण्याचीच वाट पाहात होते! नृत्यकलेचं माहेरघर अशा या त्रावण-कोर संस्थानांत कथाकली नृत्य पाहण्याचा योग आला तर किती बहार उडेल अशी एक नवीनच आशा माझ्या मनाला ओढूं लागली.

"तुझ्या पाठीमागं कोण आहे तें पाहा" असं अप्पा म्हणाले तेव्हां मी चमकून मागं वळून पाहिलं आणि विजेचा झटका बसावा तसा भीतीचा झटका मला बसला. मीं चटकन दूर होत म्हटलं, "बापरे!" पाहणाराच्या तोंडून असा आश्चर्याचा, भीतीचा उद्गार बाहेर पडावा इतका प्रचंड व उग्र असा तो हत्तीचा बस्ट पेंढा भरून ठेवलेला होता. किंचित् उघड्या अशा जबड्यांतून बाहेर पडलेले दोन सुळे मांडीएवढे जाड होते. ती प्रचंड सोंड, तें विशाल गंडस्थळ आणि सुपाएवढे कान पाहून मी चकितच झालें. "हा गजराज, राजघराण्यांतील सर्वांचा फार लाडका होता. याचं नांव चंद्रशेखर. उंची अकरा फूट सहा इंच. आणि अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं तब्बल नव्वद वर्षं संस्थानच्या दरबारी मिरवणुकीपुढं तो थाटानं मिरवत असे." पिलाई म्हणाले, की अत्यंत प्रेमळ व स्वामीनिष्ठ अशी या हत्तीची ख्याती होती. राजाची लहर फिरली की अंबारींतलीं माणसं

1983

धुळींला मिळतात. परंतु हत्तीची लहर फिरली की काय भयंकर प्रकार होतो तो आमच्या कोल्हापूरच्या 'रामप्यारी' हत्तीत नुकताच दाखविला होता. त्यामुळं नव्वद वर्षं आणि नंतरहि प्रेमळ व स्वामिनिष्ठ म्हणून ज्याची ख्याती कायम होती त्या चंद्रशेखरविषयीं मला फार कौतुक वाटलं व त्या भरांत मीं त्याच्या केसाळ खरबरीत सोंडेवरून हात फिरविला.

कथाकली हॉलमधून बाहेर पडल्यावर पिलाईनीं आम्हाला श्राइन रूम कडे नेलं. या खोलींत विजेच्या दिव्यांचा प्रकाश समईसारखा मंद होता. या खोलींत श्रीराम, हनुमंत, वगैरे देवांच्या लाकडांत कोरलेल्या सुंदर मूर्तीं व पद्मनाथ स्वामीचं सिंहासन, अनंत, गरूड वगैरे देवांची वाहनं आम्ही पाहिली. पद्मनाथ स्वामीचं सिंहासन लाकडांत कोरलेलं होतं व त्यावर अत्यंत सुंदर असं सोन्याचं काम केलं होतं. हें सिंहासन सतराव्या शतकात घडविलं असावं म्हणतात. कृष्णाचं, वाहन अनंतशयन—हे चांदींत घडविलं होतं व त्याचा काल पंधराव्या शतकाचा असावा असं पिलाई म्हणाले.

याच खोलींत दिव्यांचे दोन सुंदर नमुने आम्ही पाहिले. त्यापैकीं 'रोलिंग लॅंप' मला फारच गमतीदार वाटला. हा दिवा बोटीवर वापरण्यासाठींच त्याकाळचे लोक उपयोगात आणीत असत. दिव्याच्या बर्नर भोंवती पृथ्वीचा ग्लोब असावा तसं लोखंडी जाळीचं एक वर्तुळ होतं आणि रचना अशी खुबीदार होती कीं हे वर्तुळ कसंही आडवं उभं वाकडं तिकडं धरलं तरी आतील बर्नर व ज्योत सरळच रहाती. सांखळीच्या टांगत्या समयांचे तर हरतऱ्हेचे नमुने येथे होते. कांहीं समयांवर, मागच्या पायावर उभे असलेले घोडे होते, तर कांहींवर लक्ष्मीची मूर्ती होती.

येथून आम्ही 'सिरॅमिक्स हॉल' कडे गेलों. या हॉलमधे अतिपूर्वेकडील मातीचीं भांडीं, घडे वगैरे चिनी मातीच्या व पोर्सलेनच्या वस्तू आम्ही पाहिल्या. या हॉलमधून आर्मरीकडे—म्हणजे शस्त्रागाराकडे जातांना वाटेत कांहीं युरोपिअन चित्रकारांचीं चित्रं टांगलेलीं आम्हांला दिसलीं. या चित्रांत सिनेमा नटीदेविकाराणी हिच्या सासऱ्याचं, निकोलस रोरिक यांच,

हिमालयांत तपस्या करणाऱ्या एका साधूचं चित्र विशेष महत्त्वाचं समजलं जातं असं पिलाई म्हणाले. चित्राचं नांव 'फायरी थॉट्स' असं होतं. मला कांही हें चित्र आवडलं नाहीं. हिमालयांत तपस्या करणाऱ्या साधूंचे विचार पाखरांच्या रूपानं जगभर पसरलेले दाखविण्यांत विषयाचं नाविन्य किंवा रूपकाचं औचित्य मला कुठेंच आढळलं नाहीं.

शस्त्रागारांत त्रावणकोरचे संस्थापक महाराजा मार्तंड वर्मा व त्यांच्या मागून या गादीवर आलेले कांहीं राजे यांचीं आयुधं आम्ही पाहिलीं. या आयुधांना ऐतिहासिक महत्त्व होतंच. त्याचबरोबर कांहीं आयुधांच्या मुठीवरील हस्तीदंताच्या अप्रतिम कोरीव कामामुळे तीं संग्रहणीय ठरली होतीं. एका तरवारीची मूठ फारच सुंदर नक्षीदार होती. या खोलीच्या मध्यभागी एक मोठं—एकाद्या मध्यम ड्रेसिंग टेबलाएवढं हस्तिदंती सिंहासन होतं. या सिंहासनाचं नक्षीकाम अति नाजुक व अति सुंदर होतं. मार्तंड वर्मानंतर १७५८ ते १७९८ पर्यंत त्रावणकोरचा राज्यकारभार पाहणारे राजे धर्मराजा हें सिंहासन वापरीत असत. त्याच कालांत सबंध हस्तिदंतांत कोरलेलं लहानसं शेषासन आम्ही पाहिलं या शेषासनावर भूदेवी, श्रीदेवी, यांच्यासह बसलेल्या विष्णूचं सुंदर पंचायतन कोरलं होतं.

याच खोलींत, भिंतीला लागून उभ्या केलेल्या काचेच्या कपाटांत कांहीं वाद्यं आम्हांला दिसलीं. एकोणीसाव्या शतकांत त्रावणकोरच्या गादीव राजा स्वाथी थिरूनल नांवाचा राजा होऊन गेला. हा फार मोठा गवई होता. त्याचं 'स्वरजित' नांवाचं, सात तारांचं, व हस्तीदंती नक्षीकाम केलेलं आवडतं वाद्य पिलईनीं आम्हांला दाखविलं. येथे बिनचे, तंबोऱ्याचे, वीणेचे अनेक प्रकार आम्ही पाहिले. या तंतुवाद्यांपैकीं कांहींना दोन भोपळे होतें, तर कांहींना तीन भोपळे होते. या वाद्यासंबंधीचं माझं ज्ञान त्यांच्या भोपळ्याइतपत असल्यामुळें माझ्या दृष्टीनं त्यांना फक्त ऐतिहासिक महत्त्व होतं. विशेष गमतीदार वाद्य पाहिलं त्याचं नांव 'तट्टू वाद्य' असं होतं. हे दोन काठ्यांनीं वाजवावयाचं असतं असं पिलाई म्हणाले.

येथून आम्ही रंगविलासच्या दुसऱ्या मजल्यावरील 'पोर्ट्रेट' गॅलरी पाहण्या-

साठीं गेलों. या हॉलमधे राजघराण्यांतील सर्व स्त्रीपुरुषांची दरबारी पोषाखांत रंगविलेलीं तैलचित्रं आम्ही पाहिलीं. या हॉलच्या भींतीवर राजघरण्यातील सर्व स्त्रीपुरुषांची मोठमोठीं तैलचित्रं टांगलेलीं आम्ही पाहिली. दोनशें वर्षांपूर्वीचे त्रावणकोरचे संस्थापक महाराजा मार्तंडवर्मा पासून तो सध्याचे महाराज श्रीराम वर्मा यांचेपर्यंत सर्वांचीं चित्रं तेथें होतीं. दरबारी पोषाखांत कालमानाप्रमाणे होत गेलेला बदल मला मोठा गंमतीदार वाटला विशेषतः पूर्वींच्या महाराणीचा पोषाख व केशरचना आणि सध्यांच्या महाराणी—म्हणजे राजमाता सेतु पार्वतिबाई—यांचा पोषाख व भूषा यांत कमालीचं अंतर दिसलं. जुन्या काळीं राजस्त्रिया चोळया वापरीत नव्हत्या. त्यांच्या वक्षस्थलांवर भरजरी पैठणीवस्त्राचा पदर असे. केस नारदमुनीप्रमाणे डोक्यावर बांधून त्याभोवतीं फुलं गुंफण्याची चाल होती. दंड मनगटं, कान व गळा दागिन्यांनीं खचलेला असे. त्याच गादीवरील सध्याच्या राजमातेचा दरबारी पोषाख मुंबईच्या पाठारेप्रभू ज्ञातींतल्या फॅशनेबल बाईसारखा मला वाटला.

या हॉललगतच्या ‘तिबेटिअन रूम’कडें आम्ही गेलो. हिमालयापलिकडील प्रदेशांतून आणलेल्या लाकडी कोरीवकामाच्या अनेक वस्तू येथें मांडलेल्या होत्या. एका बांबूच्या बुंध्यावर तिबेटच्या एका मठाचं चित्र कोरलेलं पाहून आश्चर्य वाटलं. त्याचप्रमाणे धांतूचे नगारे पाहूनही मोठी मौज वाटली. नगाऱ्यांना चामड्याचा ताण असतो. परंतु ह्या नगाऱ्यांना मात्र धातूचा ताण होता. काठी घेऊन या ताणावर आघात करतांच अगदीं नगाऱ्याप्रमाणे या धातूच्या ताणांतून मृदू, गंभीर नाद निघाला.

पोर्ट्रेट रूमच्या वाटेंत निरनिराळया धातूंच्या मूर्तीं मांडलेल्या होत्या. त्या बहुतेक मूर्तीं देवादिकांच्या होत्या व त्यांत बरेचसे फॅमिली ग्रूप—किंवा पंचायतन होतीं. श्रीविष्णूचं अनंतशयनाचं एक लहानशा टाइपराटर एवढं पंचायतन दाखवून पिलाई म्हणाले “हें उचला पाहूं” आप्पा पुढें झाले व दोन्ही हातांनीं तें उचलूं लागले. एवढीशी वस्तू उचलण्यासाठीं ते इतका जोर लावूं लागलेले पाहून मला हसूंच लोटलं. अखेर मी

तें पंचायतन उचलूं लागले तों काय ! मला तें नुसतं हालवितां देखील येईना. पिलाई हसून म्हणाले, " जितकं धातूचं वजन अधिक तितकी ती मूर्ति पुरातन असा एक अडाखा आहे. "

याच ठिकाणीं आम्ही दिव्याचे आणखी कांहीं नमुने पाहिले. हजार वातींच्या समया, मिरवणुकीचे झुंबराचे दिवे, सांखळीचे दिवे अशा खूप तऱ्हा होत्या. विशेषतः ' सक्शन लॅंप ' या तऱ्हेच्या दिव्यांची कौशल्यपूर्ण रचना मला फार कौतुकास्पद वाटली. हातांत एक पक्षी घेऊन उभी राहिलेली स्त्री—हाच एका दिव्याचा आकार होता. स्त्रीच्या मस्तकांत तेल भरण्याची जागा होती व तेथून गुप्त मार्गानं तिनं धरलेल्या पक्ष्यांत —म्हणजे पणतींत—तें तेलवातीपर्यंत पोंचण्याची व्यवस्था होती. असेच आणखी दिवे पॅलेसच्या खालच्या मजल्यावरही होते. आम्ही जिना उतरून खालीं आलों, व ते नमुने पाहूं लागलों. इतक्यांत आमच्या शेजारी आणखी दोन व्यक्ति येऊन उभ्या राहिल्या. त्यांपैकीं टूथब्रशसारख्या मिशा उभट नाक व रूबाबदार चेहऱ्याचे प्रोफेसर वाडिया मी ओळखले, पण शेरवाणी व वसकी काळी टोपी घातलेले व जनाब जिनासारखे दिसणारे दुसरे गृहस्थ कोण असावे याचा तर्क चालेना! आप्पांनीं त्या दोघांशीहि हस्तांदोलन केलं व पिलाईच्या आग्रहाखातर म्हणून आम्ही 'आर्टगॅलरी'च्या व्हिजिटर्स बुकावर सह्या करण्याकरितां पार्टिशनपलिकडील त्यांच्या ऑफिसांत गेलों. सह्या केल्यावर मीं आप्पांना विचारलं, " प्रोफेसर वाडियांबरोबर जिनांसारखे दिसणारे ते गृहस्थ कोण ? " आप्पा म्हणाले, "आजच्या परिषदेचे अध्यक्ष—अलीगडचे प्रोफेसर शरीफ ते हेच."

आम्हीं नीलकंठ पिलाईचें आभार मानले आणि त्यांचा निरोप घेतला. डेलिगेट्सना घेऊन बसेस येथेच येणार होत्या. परंतु आतां आर्ट गॅलरी पाहून झाल्यावर येथे अधिक वेळ थांबणं कंटाळवाणं झालं असतं. तेव्हां पार्टीसाठीं न थांबतां गांवांत हिंडून यावयाचं आम्ही ठरविलं व रंगविलास पॅलेसबाहेर पडलों. इतक्यांत गेटापाशी पहिल्या बसमधून उतरलेली कांहीं मंडळी आम्हांला दिसलीच.

आर्ट गॅलरीवरून गांवांत जाणाऱ्या मोठ्या रस्त्यानं गेल्यावर तुम्हांला हस्तीदंताच्या वस्तूंचीं दुकानं आढळतील व कामेशम अय्यर यांच्या दुकनांत खात्रीचा हस्तीदंत मिळेल अशी माहिती पिलाईनीं आम्हांला दिली होतीच. त्याप्रमाणे पुढे पुढे रस्त्याच्या दोन्ही बाजूला सराफी दुकनां-प्रमाणे, ठेंगणी बसकी अशी हस्तीदंताच्या वस्तूंची दुकानं आम्हांला दिसूं लागली. आतां रस्त्यांतली रहदारी वाढली होती. परंतु या रहदारीचं दृश्य माझ्या महाराष्ट्राच्या सरावलेल्या डोळ्यांना किती चमत्कारिक आणि नाविन्यपूर्ण दिसत होतं! स्त्रीपुरुषांच्या अंगावर फक्त पांढरे कपडेच दिसत. कमरेभोवतीं घट्ट लपेटलेली लुंगी व खांद्यावर पदरासारखं घेतलेलं पांढरं उत्तरीय हा स्त्रियांचा पोषाख व लुंगी व शर्ट असा पुरुषांचा पोषाख सर्रास आढळत होता. मागून पाहणाराला पुढे चालणारी व्यक्ति स्त्री आहे कीं पुरुष आहे हे ओळखणं देखील कठीण वाटलं असतं. कमरेभोंवती लपेटलेल्या लुंगी-मुळे या स्त्री पुरुषांची चाल किती सरळ, तोकडी व ऐटबाज बनली होती. मी आप्पांना म्हटलं, "लोकांच्या पोषाखाची रीत व चालण्याची रीत यांच्या अन्योन्य संबंधावर तुलनात्मक निबंध कुणीच कसा लिहिला नाहीं!"

एका दुकानावर कामेशम अय्यर अशी इंग्रजी पाटी वाचून आम्ही त्या दुकानांत शिरलों. दुकानांतल्या भिंतीला लागून मोठमोठ्या काचेच्या कपाटांतून व मधे मांडलेल्या काचेच्या शो केस मधून हस्तीदंतांच्या अनेक तऱ्हेच्या वस्तू, मूर्ती, दागिने, ठेवले होते. आम्ही कांहीं ब्रूचेस घेतले व स्नेक चार्मरची एक सुंदर मूर्ति घेतली. आम्ही दुकानाबाहेर पडलो तेव्हां एक वाजला होता. बाहेर उन्हाची तिरीप वाढूं लागली होती, व आम्हांला भूकही लागली होती. चहा घ्यावा अशा हेतूनं आम्ही रस्त्यावर एखादे चांगले हॉटेल धुंडाळूं लागलो. अखेर 'गुजराथ लॉज' अशी पाटी वाचून आम्ही एका लहानशा हॉटेलांत गेलों. येथें खाण्याचे कांहींच पदार्थ अशा आडवेळीं मिळण्यासारखें नव्हते. आणि पोऱ्यानं पितळी पातेल्यांतून आणलेला त्या चहाचा एक घोटही आम्हांला गिळवेना. आम्ही तसेच हॉटेलबाहेर पडलों. भर दुपारची वेळ. होस्टेल दीड दोन

मैलावर, अनोळखी रस्ता व भाषेचे अज्ञान या साऱ्या गोष्टी लक्षांत घेतां होस्टेलवर लवकर पोंचण्याची आशाच नव्हती. परंतु अचानक कोपऱ्यावरून एक फोर्ड टॅक्सी वळली व नेमकी आमच्यासमोर येऊन उभी राहिली. आम्ही चटकन आंत बसलों आणि दहा मिनिटांत युनिव्हर्सिटी होस्टेलच्या पोर्चमधे दाखल झालो, व तसेच होस्टेलच्या मेसकडे वळलों.

मेसच्या इमारतींत, मुसलमानी, दक्षिण हिंदुस्थानी, व गुजराथी अशा तीन तऱ्हेच्या भोजनाची व्यवस्था होती. व त्यासाठीं तीन स्वतंत्र जेवणाच्या खोल्या होत्या. आम्ही गुजराथ टायपिंग रूमवर गेलो तों बहुतेक सारी टेबलं रिकामीच होतीं. आम्ही एका टेबलापाशीं बसतांच आचाऱ्यानं आमची पानं वाढलीं. पानांत तऱ्हेतऱ्हेच्या चटण्या, लोणची व भाज्या होत्या. चारपांच तऱ्हेचा हलवा व केशरी बर्फीचे एक दोन प्रकार अशी खूप मिठाईही होती. आमच्या पहिल्या भातावर त्या गुजराथी 'महाराजानं' वाटीभर साजूक तूप ओतलं, व आम्हांला आग्रहानं जेऊं घालण्यासाठीं— आणि गप्पा गोष्टी करण्यासाठीं स्वतःची हौस पुरविण्यासाठीं महाराज, व त्याचे दोन असिस्टंट आमच्या समोर उभे राहिले. आमचं जेवण होई-पर्यंत महाराजांची व आमची खूपच जानपछान झाली. अलेपी येथील त्यांच्या हॉटेलांत कधींतरी एकदोन दिवस राहयला येण्याचं आम्ही कबूल केलं. पानांतल्या एकूणएक हलव्याची व बर्फीची पाकक्रिया मला त्यांनीं सांगितली. कोल्हापूरला परतल्यावर माझं " हजार पाकक्रिया " हें पुस्तक त्यांना पाठविण्याचं मी वचनही दिलं. उलट टेबलावर ठेवलेली आप्पांची सिगारेट केस हळूहळू त्यांनीं रिकामी केली.

आम्ही जेवण करून आमच्या खोलीवर आलों तेव्हां दोन वाजले होते. चार वाजतां परिषद सुरू व्हावयाची होती. पावणेतीन वाजतां, डेलि गेट्सना परिषदेच्या हॉलकडे नेण्यासाठीं बसेस येणार होत्या. म्हणजे मधे अवघा पाऊण तास अवकाश होता. परिषदेला जाण्याच्या तयारीला तावड-तोब लागणं मला भाग होतं. आजचा पोषाख विशेष काळजीपूर्वक करावयाचा असं ठरवून मीं माझी बॅग पुढं ओढली. माझी सर्व तयारी झाल्या-

वर मी आप्पांचा ब्ल्यू ग्रे सूट, रेघांचा शर्ट, त्याला साजेसा टाय, मोजे, बूट वगैरे सर्व पोषाख बाहेर काढून ठेवला. स्वतःच्या पोषाखाच्या बाबतींत मात्र निष्काळजी असणाऱ्या आप्पांवर हा एक जुलूमच होता. आप्पा झोपले होते. मीं त्यांना उठवतांच पांचदहा मिनिटांत ते तयार झाले. इतक्यांत बस थांबल्याचा आवाजही आम्हांला ऐकू आला. आम्हीं खोलीचं दार लावलं व घाईघाईनं जिना उतरून बसकडे निघालों. कांहीं डेलिगेट्स बसमधे बसले होते. कांहीं घोळका करून बसपाशीं व होस्टेलच्या पायऱ्यांवर उभे होते. आज साऱ्याच मंडळींनीं थाटबाज पोषाख केले होते. होस्टेलच्या पायरीवर प्रो० दामले उभे होते. आप्पांच्या सुटाकडे पाहात ते म्हणाले, " वाः आप्पासाहेब. आहे बुवा ! " यावर आप्पाही हसून म्हणाले, " अहो, मग दाखवायचा केव्हां ? " बरोबर तिनाला दहा मिनिटं कमी असतांना आमच्या बसेस होस्टेल बाहेर पडल्या व पांचदहा मिनिटांत जेथें परिषद भरावयाची होती त्या 'असेंब्ली हॉल' च्या भव्य इमारतीच्या आवारांत शिरल्या. हॉलच्या गेटावर लाल कापडाची कमान उभारली होती व त्यावर सोनेरी अक्षरांत " फिलॉसॉफिकल कॉन्फरन्स " असं लिहिलं होतं. हॉलच्या पोर्चमधे व व्हरांड्यांत डेलिगेट्स् व शहरांतील प्रतिष्ठित आमंत्रित स्त्री पुरुष जमूं लागले होते. कांहीं स्वयंसेवक मंडळींना हॉलमधे नेऊन बसवीत होते. आम्हीहि एका स्वयंसेवकाबरोबर हॉलमधे प्रवेश केला.

असेंब्ली हॉल अतिशय भव्य व प्रशस्त वाटला. हॉलमधे तिन्ही बाजूंना प्रेक्षकांच्यासाठीं खुर्च्या ठेवल्या होत्या व चौथ्या बाजूला उंच भव्य स्टेजवर उंची गालिचा अंथरून किनखापाचीं तीन भरजरी सिंहासनं मांडलीं होतीं. तात्पुरतं तयार केलं नसून थिएटरमधे मुद्दाम बांधलेलं असतं तसं मूळ इमारतींतच होतं. स्टेजवर मात्र मोंगलाई पद्धतीचा गोलघुमट होता. व हॉलवर सुंदर कलाकुसरीचं छत होतं. स्टेजकडे तोंड करून हॉलच्या तिन्ही बाजूंनीं गॅलरीही बांधलेली होती. दरवाजापासून स्टेजपर्यंत खुर्च्यांच्या रांगेमधून उंची तांबडा गालिचा अंथरला होता. आम्ही या गालिच्यावरून स्टेजसमोर आलों आणि डाव्या बाजूच्या खुर्च्यांतील दुसऱ्या रांगेत बसलों.

ही बाजू डेलिगेट्स्साठीं राखलेली होती. स्टेजच्या उजव्या बाजूस मांडलेल्या खुर्च्या दरबारी अधिकाऱ्यांसाठीं होत्या. आमच्या उजव्या हाताला स्टेजकडे तोंड करून मांडलेल्या खुर्च्या व वरची सबंध गॅलरी प्रेक्षकासाठीं राखून ठेवलेली होती. हळूहळू सर्व खुर्च्या व गॅलरी प्रेक्षकांनीं भरूं लागली. खाकी पोषाख केलेले संस्थानचे लष्करी अधिकारी व पांढरी सुरवार, शेरवाणी व पांढरी मद्रासी पगडी घातलेले दरबारचे ऑफिसर्स यांनीं खुर्च्यांच्या रांगा भरल्या. अशा समारंभाच्या प्रसंगीं देखील पांढरी जरीकाठी लुंगी व पांढरं उत्तरीय असा साधा पोषाख केलेल्या स्त्रिया व पुरुष यांनीं आतां सर्व जागा भरली होती. साडेतीन झाले आणि आतां गर्दीमुळें उकाडा वाढणार कीं काय अशी भीति वाटूं लागली. इतक्यांत जादू करावी त्याप्रमाणें खुर्च्यांच्या रांगातून ठिकठिकाणीं उभे केलेले विजेचे पंखे, आवाज न करतां फिरूं लागले आणि लगेच सबंध हॉलभर विजेचे दिवे लागून लख्ख प्रकाश उधळला. हॉलमधल्या गंभीर वातावरणांत एकदम प्रसन्नता उत्पन्न झाली.

आतां महाराजांच्या आगमनाची सारेजणं अधीरतेनं वाट पाहात होतों. इतक्यांत सभागृहांतले सारे प्रेक्षक उठून उभे राहिले. आम्ही उठलो. समोर पाहतें तों महाराज आंत येत होते, त्यांच्या मागोमाग राजमाता महाराणी सेतु पार्वतीबाई व राजभगिनी कार्तिका थिरूनल या दोघीजणी आल्या. गालीचावरून येतांना महाराज मधूनमधून थबकत व मान खाली वाकवून प्रेक्षकांच्या अभिवादनाचा उलट नमस्कार करून स्वीकार करीत. महाराज स्टेजसमोर आले तेव्हां ते किंचित् थांबले व उजव्या, डाव्या बाजूला उभ्या असलेल्या डेलिगेट्स्च्या व ऑफिसर्सच्या अभिवादनाचा त्यांनीं मान वाकवून स्वीकार केला व मग ते स्टेजवरील सिंहासनावर जाऊन बसले. दिवाण सर. सी. पी. अय्यर, वाडिया, शरीफ ही मंडळीहि स्टेजवर बसली. महाराज येण्यपूर्वीं आमच्या संस्थानांत होते तशी ललकाऱ्यांची रडारड हुजऱ्याकडून झाली नाहीं याचं मला खूपच आश्चर्य वाटलं किंबहुना महाराजांबरोबर एकहि हुजऱ्या नव्हता. महाराज, महाराणी, युव-

राशी खालीं बसल्यावर सभा स्तब्ध झाली, व सर सी. पी. अय्यर आपलं भाषण करण्याकरितां उठले. एक अप्रतिम वक्ता अशी त्यांची ख्याती असल्यामुळं आम्ही त्यांचं भाषण लक्षपूर्वक ऐकूं लागलों. पौर्वात्य तत्त्वज्ञानाचं महत्त्व व त्याचा जगभर झालेला प्रसार वर्णन करतांना संस्कृत श्लोक ते अगदीं खणखणींत आवाजांत म्हणून दाखवीत. परंतु त्यांचं भाषण, फार लांब व कंटाळवाणं झालं आणि आमची निराशा झाली.

त्यांच्या भाषणानंतर महाराज आपलं स्वागताचं भाषण करण्यासाठीं उठले. महाराजांचे फोटो आम्हीं पाहिले होते आतां ते ज्या स्टेजवर उभे होते त्या मागे भिंतीवर टांगलेलं त्यांचं तैलचित्रहि आम्ही नुकतंच पाहिलं होतं. परंतु आतां त्यांना प्रत्यक्ष पाहिल्यावर फोटोपेक्षा ते अनेक पटींनी सुंदर दिसत होते. त्यांनीं चढाव, सुरवात, पांढरी शेरवाणी आणि फिक्या हिरव्या रंगाचा कोल्हापुरी फेटा असा पोषाख केला होता. अशा पोषाखाला शरीरबांधा धिप्पाड असावा म्हणतात. परंतु महाराज मध्यम उंचीचे, सडपातळ असूनहि त्यांना हा पोषाख फार शोभून दिसत होता. गौरवर्ण, तेजः पुंज कांती, बाकदार नाक, धीट पाणीदार डोळ्यांतील बुद्धिमत्तेची चमक वगैरे मुळं त्यांची सुसंस्कृत तरतरीत मुद्रा अधिकच आकर्षक दिसे. त्यांचं भाषण फार तर पांच मिनिटं झालं असेल. पण त्यांच्या भाषणांतील विचार अत्यंत समयोचित होते व त्यांचे इंग्रजी उच्चारहि जितके स्पष्ट तितकेच गोड होते.

महाराजांचं भाषण आटोपल्यावर परिषदेचे अध्यक्ष प्रोफेसर शरीफ आपलं अध्यक्षीय भाषण करण्यासाठीं उभे राहिले. त्यांच्या हातांत टांचणी लावलेल्या कागदांचा एक जुडगा होता त्यावरून ते आपलं भाषण वाचणार असं दिसलं वक्त्यांच्या व्याख्यानाचं निम्मं आकर्षण कमी झालं. शरीफनीं मुस्लिम तत्त्वज्ञानाची चर्चा सुरू करतांच माझं लक्ष ढळलं. एक तास मागं पडला तशी सभा अस्वस्थ झाली. प्रेक्षकांच्यामधे कुजबूज व डोळ्यांच्या खाणाखुणा सुरू झाल्या. शरीफनीं तत्त्वज्ञानाचं अगदीं 'पाकिस्तान' करून टाकलं असाच या खाणाखुणांमागं अभिप्राय होता. पुढंपुढं

तर स्वतः महाराज देखील शरीफनीं पान उलटलं की आणखी किती पानं त्यांच्या हातांत वाचायची शिल्लक आहेत तें पाहूं लागले. आणि माझं लक्षहि प्रेक्षकांकडे वळलं. माझ्या उजव्या हाताला रांगेतल्या शेवटच्या खुर्चीवर बेटी हायमन बसलेली मला दिसली. तिची माझी दृष्टादृष्ट होतांच तिनं एकदम भुवया वर चढवल्या व ओठांचा चंबू करून हसून मला ओळख दिली.

प्रो. शरीफचं लांबलचक भाषण संपल्यावर आडव्या पडलेल्या सभेला जणू आपल्या भाषणानं संजीवनी देण्याच्या आविर्भावांत प्रो. वाडिया आपलं आभाराचं भाषण करण्यासाठीं उठले. वाडियांच्या उभं राहण्यांत त्याचप्रमाणं त्यांच्या इंग्रजी उच्चारांत ऐट होती, व त्यांचं भाषणहि मोठं काव्यमय होतं. वाडियांचं भाषण संपलं. राष्ट्रगीताशिवायच सभा बरखास्त झाली, राजेसाहेब, महाराणी व युवराज्ञी उठून स्टेजखाली आल्या व प्रेक्षकांच्या अभिवादनाला उलट नमस्कार करीत हॉलबाहेर निघून गेल्या, व आम्ही, शाळा संपल्यावर सारी शिस्त झुगारून मुलांनीं गलका करावा तसं एकमेकांशीं हसूं बोलूं लागलों. गर्दीतून वाट काढीत आम्ही बाहेर व्हरांड्यांत आलों तों प्रो. दामले आम्हाला दिसले. आप्पांची व त्यांची दृष्टादृष्ट होताच दोघंहि खट्याळपणे हसले. त्या दृष्टींत व हंसण्यात " आपटली का परिषद " असा उघड उपरोध भरला होत. मी, आप्पा, व दामले बसमधे चढणार इतक्यांत प्रो. बटलर हसत सामोरे आले. ते मॅस्कट हॉटेलांत उतरले होते व आतां तिकडेच निघाले होते. ' एकदां आमचा चहा घेऊन तर पहा ' असाआम्ही आग्रह करताच ते मोठ्या खुषीत आमच्या बसमधे चढले व आमच्याबरोबर होस्टेलच्या मेसमधे आले. चहा फराळाचे तयार होतेच. चहा घेतां घेतां माझ्या पोषाखाकडे पहात प्रो. बटलर ह्मणाले, " मिसेस फडके, तुम्ही आपल्या नवऱ्याचे पैसे फार उधळता असं दिसतं " पोषाखाची स्तुती करण्याची प्रो. बटलरची ही एक पद्धत असावी. मी हसून विषय बदलण्यांसाठीं त्यांना विचारलं. " तुम्हांला सर सी. पी. अय्यरांचं ओपनिंगचं भाषण कसं काय वाटलं ? " यावर प्रो. बटलर हलक्या आवाजांत म्हणाले–' He blew

the conferance wide open.' प्रो. बटलरची ही कोटी आम्हांला फार आवडली.

चहा अर्धवट टाकून प्रो. बटलर उठले व आमचा निरोप घेऊं लागले कारण साडेआठ वाजतां व्हिक्टोरिया ज्युबिली हॉलमधे युनिव्हर्सिटीतर्फे करमणुकीचा कार्यक्रम व्हायचा होता व त्याला ते हजर राहणार होते. "तेथे आपण भेटूं" असं आम्ही म्हणतांच त्यांना एकदम आनंदाची लहर आली. टेबलामधल्या मोकळ्या जागेंत एखाद्या वरातीपुढच्या घोड्यानं ठुमकत नाचावं तसं ते पावलं टाकूं लागले व हात नाचवूं लागले आणि तोंडानं इंग्रजी बँडची शीळ घालीत खोलीबाहेर निघून गेले.

आम्हीही उठलों. शक्य तितक्या लवकर जाऊन पुढची खुर्ची मिळविण्यासाठीं आम्हांला घाई करणं भाग होतं. करमणुकीच्या कार्यक्रमांत एन्. एन्. लक्ष्मी आणि पार्टी यांचं नृत्य होतं. परंतु नेहमींप्रमाणे आम्ही ज्यूबिली हॉलवर उशीराच गेलो. पुढच्या सर्व खुर्च्या भरल्या होत्या. अखेर मागच्या बाजूस नृत्य करणाराची पावलं दिसावी म्हणून एका उंच बाकावर आम्ही बसलो. प्रोग्रॅमकार्ड काढून मी वाचलं. प्रथम लक्ष्मी व पार्टीचं नृत्य, नंतर एका हिंदी नाटकाचा प्रवेश व एक टॅब्लो इतके कार्यक्रम व्हायचे होते.

पडदा वर गेला स्टेजच्या मध्यभागीं एक पंधरा वर्षांची मुलगी झगमग पोषाख करून उभी होती. हीच एन. एन. लक्ष्मी अर्थात् हिला शोभेल अशीच तिची पार्टी होती. वुइगंच्या बाजूला भिगारीची मुलं बसावी त्याप्रमाणे पार्टीतलीं मुलं बसलीं होतीं. व शिट्टी वाजतांच 'बे एके बे, बे दुणे चार' च्या सुरावर टाळ्या वाजवून ताल धरीत त्यांनीं गावयास सुरवात केली व या साथीवर एन. एन. लक्ष्मी नाचूं लागली.

पुढचे सर्वच कार्यक्रम असे पोरकट झाले. आम्ही हॉलबाहेर पडलों तेव्हा रात्र बरीच झाली असावी. तीनचार तास कंटाळवाणे घालविल्यामुळें डोकं चढलं होतं. बाहेर गार वारा सुटला होता आणि चांदणं पडलं होतं. सुकलेल्या फुलांवर पाणी शिंपताच तीं व्हावी तशीं आमचीं मनं पुन्हां टवटवीत ताजी झाली. इतक्यांत प्रो. दामले भेटले. आमच्या आनंदांत

भरच पडली. होस्टेलवर जाण्यासाठीं बसेस होत्या. परंतु पुन्हा बसमध्ये शिरण्यापेक्षां चांदण्यांत सहल करीत घरीं परतावं असा बेत करून आम्ही होस्टेलकडे जाणाऱ्या रस्त्यानं चालूं लागलों. या अपरात्रीं रस्ता किती निर्मनुष्य होता. सगळीकडे अगदी शांत होतं. चांदण्याच्या प्रकाशांत रस्त्याच्या बाजूचे दिवे क्षीण दिसत होते. आणि आणि आमच्या हंसण्या-बोलण्याचा आवाज त्या शांत वातावरणांत लाऊड स्पीकर लावल्याप्रमाणें वाढला होता. चालता चालता रस्त्याच्या बाजूला एक लहानसं कॉफीचं दुकान लागलं. आप्पांना कॉफी प्यायची लहर आली व आम्ही त्या दुकानांत शिरलो. आमच्याकडे गोंधळून पहात राहिलेल्या मालकाला, जास्त दूध घातलेली व कमी उकळलेली कॉफी आणावयास सांगून आम्ही गप्पागोष्टी करीत बसलों. दुपारची कॉनफरन्स आणि नुकताच पाहिलेला भयंकर करमणुकीचा कार्यक्रम असे विषय व आप्पा आणि दामले यांसारखे मार्मिक विनोदप्रिय टीकाकार असल्यावर हास्यविनोदाला काय तोटा? प्रोफेसर वाडियांचं भाषण चांगलं झालं असं मी म्हणतांच प्रो. दामले म्हणाले, "अहो वाडियांचं टेक्निक आहे तें कांहींतरी 'हर्र हुस्स' करून ते इंप्रेशन मारतात." वाडियांच्या वक्तृत्वाचं "हर्र हुस्सं" करून या दोन गंमतीदार शब्दांत किती हुबेहूब प्रो. दामल्यांनी केलं होतं. आम्हांला खूपच हसूं लोटलं.

युनिव्हर्सिटी होस्टेलच्या आवारांतील मुख्य इमारतीसमोर प्रो. दामले आपल्या रूमकडे गेले व आम्ही आमच्या खोलीकडे वळलो. आतां मध्यरात्रीची वेळ होती तरी आमच्या इमारतीमधे विजेचे दिवे जळतच होते. बगीच्यांतल्या लोखंडी जिन्यानें आम्ही दुसऱ्या मजल्यावर गेलो. मी दिवा लावला, पंखाही सुरू केला. खोलींत कपडे अस्ताव्यस्त पडले होते, टेबलावर कागदही विसकटले होते. परंतु आता आवराआवर करण्याचा मला कंटाळा आला होता. मनाजोगं नृत्य पाहयला न मिळाल्यामुळे माझा साराच उत्साह नाहींसा झाला होता. परंतु केवळ आप्पांसाठीं म्हणून ज्या गोष्टी मी करीत असते त्यापैकीं मुख्य गोष्ट टापटीप ही असल्यामुळे मी उठलें आणि टेबलापाशीं जाऊन कागद नीट ठेवूं लागलें, तों त्या कागदांत

मला दोन जाड बंद लिफाफे आढळले ! आमच्या गैरहजेरीत नोकरानं हे लिफाफे टेबलावर ठेवले असावेत. आम्ही मोठ्या कुतूहलानं ते उघडले, तों काय आम्हां दोघांना आलेल्या मेजवानीच्या आमंत्रण पत्रिका राजेसाहेबा-कडून आल्या होत्या. एकवीस तारखेला म्हणजे शुक्रवारी संध्याकाळीं सव्वा पांच वाजतां ' कवडिआर, पॅलेसवरील ॲटहोमचं तें आमंत्रण होतं.

दुसरा गुरूवारचा दिवस-आम्ही त्रिवेंद्रम शहरांतील आणखी प्रेक्षणीय स्थळं पाहण्यांत घालविला खरा; परंतु माझं सर्व चित्त शुक्रवारच्या महा-राजांकडील ॲटहोमकडे लागलं होतं. राजेसाहेबांच्या आमंत्रणपत्रिकेंत दोन सूचनापत्रं होतीं. एकांत पाहुण्यानं आपल्या मोटारीचं लायसन्स, कारपास वगैरे आणण्याची सूचना होती व दुसऱ्या पत्रकांत पोषाखाबद्दल सूचना होत्या. युरोपियन पाहुण्यानीं काळा सूट ( सर्ज अगर ट्वीडचा ) फेल्ट हॅट किंवा टोपी, काळे बूट आणि कडकडीत कॉलर असा ड्रेस करावा. हिंदी पाहुण्यांनीं लांब पांढरा कोट, पांढरी विजार किंवा सुरवार आणि जरीचा रुमाल ( केस राखणारांना रुमालाची सक्ति नाहीं ) पांढरे मोजे आणि काळे बूट असा पोशाख करावा, अशी सूचना होती. त्यामुळं पुरुष पाहुण्यांचा प्रश्न परस्परच सोडविला गेला होता. स्त्रियांना त्या बाबतींत कांहींच सूचना नव्हत्या. त्यामुळं माझी मोठी पंचाईत पडली व पॅलेसवर निघण्याची वेळ होईपर्यंत कोणती साडी नेसावी व केस बांधावे याबद्दल माझा एकहि बेत कायम झाला नव्हता.

अखेर आम्ही पोषाख वगैरे सर्व आटोपून चार वाजून पंचेचाळीस मिनिटांनीं बाहेर पडलों. होस्टेलसमोर बसेस उभ्या राहिल्या होत्या. हळू-हळू सर्व डेलिगेट्स् मंडळी येऊं लागली. आम्ही पहिल्याच बसमधे जाऊन बसलों. आमच्या बाजूच्या खोलींत उतरलेली सिलोनी प्रोफेसरीण बाई व तिच्या दोन विद्यार्थिनी बसकडे येत होत्या. प्रोफेसरीणबाईंची मुद्रा नेहमीं कांहींतरी बिनसल्यासारखी दिसे. आम्हांला पाहतांच ती दुसऱ्या बसकडे वळली. परंतु तिची विद्यार्थिनी धर्मवती—जिला आम्ही ' सिंहलद्विपाची राजकन्या ' अशी पदवी बहाल केली होती. ती माझ्याकडे पाहून हसली.

धर्मवतीच्या मनांत माझ्या शेजारी बसायचं होतं. परंतु प्रोफेसरीणबाईच्या चेहऱ्याकडे पाहून व माझ्याकडे पाहून "पाहिलंस? माझा नाइलाज आहे" अशा अभिप्रायानं खांदे उडवून ती तिच्या मागोमाग बसकडे गेली. मी कोणीतरी सिनेमा नटी असावी असा मलाच संशय घेऊन तर मला ही प्रोफेसरीणताई टाळत नव्हती? माझा हा विचार आप्पांना बोलून दाखवितांच ते म्हणाले, "ती कां बिनसली आहे तें मला माहीत आहे. "सांगा असा आग्रह मी धरतांच, "श: इथं नको–मग" असं सांगून ते गप्प बसले. पण मला मात्र चुटपुट लागून राहिली.

पांचदहा मिनिटांतच आमच्या तिन्ही बसेस कवडियार पॅलेसकडे निघाल्या एखाद्या टेकडीवर गेल्याप्रमाणं रस्त्याला चढ होता, व वळणंहि होतीं. खरोखरच पॅलेस एका लहानशा टेकडीवजा उंचवट्यावर बांधलेला होता. टेकडीच्या पायथ्यापासून वर राजवाड्यापर्यंतचं आवार राजवाड्याचं असावं. पायथ्यापासून वरपर्यंत गेलेल्या रस्त्यांच्या दुतर्फा बगीचा व रेखीव कुंपण होतं. परंतु आमच्या बसेसना पायथ्याशीच थांबावं लागलं. कारण पुढं रस्त्यावर राजवाड्याकडे जाणाऱ्या लहान मोठ्या मोटारींची रांगच लागून राहिली होती. आम्ही सर्वजण राजवाड्याच्या पोर्चमधे जमलों. उजव्या बाजूला एका मोठ्या दगडी चवथऱ्यावर हवेंत दांडू हालवून एक गोरा कंडक्टर स्टेटबँड चालवीत होता. डाव्या बाजूला उतारावर कार पार्कची जागा होती व येणाऱ्या मोटारी तिथं पार्क करण्याची व्यवस्था पोलीस अधिकारी करीत होते. पोर्चमधे जमलेली सारी मंडळी आपापले पोषाख, केस चांचपण्यांत गुंतलेली होतीं व पाळीप्रमाणं राजवाड्यांतल्या पुढच्या हॉलमधे प्रवेश करीत होती.

राजवाड्याच्या दारापाशीं मला समजलं कीं महाराज व महाराणी प्रत्येकाचं स्वागत करीत आहेत. तें समजतांच माझी छाती धडधडूं लागली! वाटलं परत फिरावं आणि पळून जावं! पण आतां तें शक्य नव्हतं! गोष्टी भलत्याच थराला पोचल्या होत्या!

★

# ४

पुण्यास ‘ काळे-गोरे ’ नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या वेळीं रंगभूमीवर पहिलं पाऊल टाकतांना माझ्या मनाची जी अवस्था झाली, तशाच कांहींशा अवस्थेंत मीं राजवाड्याच्या हॉलमध्यें प्रवेश केला ! हातांतली पर्स उघडून माझ्या नांवाचं कार्ड शेजारींच उभ्या असलेल्या ऑफिसरकडे मीं दिलं आणि धीर करून वर पाहिलं तों महाराज आणि राजमाता सेतु पार्वतीबाई माझं स्वागत करण्यासाठीं किती प्रेमळपणें हसत उभ्या होत्या. त्यांचं तें मनमोकळं हास्य पाहून माझी भीति, माझा संकोच पार नाहींसा झाला व मीहि उलट हसलें. ऑफिसरनं माझं नांव वाचतांच त्या दोघांनीं मला नमस्कार केला. मीहि उलट नमस्कार केला आणि हॉल ओलांडून पलीकडे व्हरांड्यांत चालू असलेल्या पार्टींत मिसळलें. माझ्यामागोमाग आप्पाहि

आले. व्हरांड्यांत बागेकडील बाजूच्या भिंतीलगत टेबलांची एक रांग मांडली होती. तऱ्हेतऱ्हेचीं बिस्किटं, केक्स, शेव, चिवडा, इडली, उपमा यांसारखे मद्रासी पदार्थ आणि तऱ्हेतऱ्हेचीं थंड-ऊष्ण पेयं यांनीं टेबलं खचून भरलीं होतीं. वेटर्स पाहुण्यांची सरबराई मोठ्या तत्परतेनं करीत होते. एका ऑफिसरनं आम्हांला टेबलापाशीं नेलं व एका वेटरच्या ताब्यांत दिलं. मेजवानी अर्धाएक तास चालली. नंतरचा प्रोग्रॅम कुणालाच माहीत नसावा. व्हरांड्यांत व बाहेर बगीच्यांत मांडलेल्या खुर्च्यांवर बसून कांहीं मंडळी वेटर्सच्या ट्रेंतील पानसुपारी, सिगारेट घेत हलक्या आवाजांत गप्पागोष्टी करीत होती, तर कांहीं मंडळी राजवाड्याभोंवतालच्या बगीचांत हिंडतफिरत होती. आम्हीहि बगीचांत हिंडूं लागलों. राजवाडा लहानशा टेकडीवर असल्यामुळं आजूबाजूचा मैलन् मैल पसरलेला देखावा दृष्टीला खुला होता. राजवाड्याच्या समोरच्या बाजूस घनदाट नारळीपोफळींच्या वनांत त्रिवेंद्रम नगरी पसरलेली दिसत होती. राजवाड्याच्या मागच्या बाजूला बगीच्याच्या मध्यभागीं तुडुंब भरलेली एक पुष्करिणी होती. या पुष्करिणीच्या काठाशीं उभं राहून आम्हीं समोर नजर टाकली. दूरवर क्षितिजापर्यंत भिडलेलं तें हिरवं गर्द सृष्टिसौंदर्य आणि मोरपिसांच्या गालिचाप्रमाणं विविध फिक्या-गडद रंगांची ती मनोवेधक उधळपट्टी पाहून मन चकित होऊन गेलं. रंगभूमीवर झगमग पोशाख करून उभ्या असलेल्या रुक्मिणीवर वुइंगमधून हिरव्या, पिवळ्या, गुलाबी, निळ्या प्रकाशाचे झोत टाकावेत त्याप्रमाणं आतां पश्चिम क्षितिजांवर टेकलेल्या सूर्यबिंबांतून रंगीबेरंगी किरणांचें झोत या सृष्टिशोभेवर पडल्यामुळं तिचा थाट कांहीं अपूर्व वाटत होता.

आम्ही ही सृष्टिशोभा पाहण्यांत मग्न झालों होतों इतक्यांत एक ऑफिसर आमच्याजवळ येऊन म्हणाले, "आतां राजवाड्याच्या पुढच्या बाजूला चला. राजेसाहेब प्रत्येक पाहुण्याशीं चार शब्द बोलण्यासाठीं बगीचांत येणार आहेत." ते शब्द ऐकतांच आम्ही वळलों. पाहतों तों आतां बगीचांत हिंडणारी व खुर्च्यांतून बसलेली सारीच मंडळी उठली होती व

लगबगीनं पुढच्या बाजूस निघाली होती. आम्हीहि त्या टोळक्यांत मिसळलों व निघालों. राजेसाहेबांची वाट पाहात इतर मंडळींच्या घोळक्यांत उभं राहणं एरवी मला कंटाळवाणं वाटलं असतं; परंतु माझं लक्ष बेटी हायमनकडे गेलं व तिची एकंदर कुचंबणा पाहून माझी करमणूक झाली. युरोपियन स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनं समान हक्क गाजवितात; परंतु म्हणूनच पुरुषांशिवाय त्यांचं घडीघडी नडतं. नाटका-सिनेमाला जातांना, जेवतांना, नाचतांना त्यांना अनुरूप जोडीदार अवश्य लागतो. युरोपियन स्त्री रस्त्यानं चालूं लागली तरीदेखील कोणातरी पुरुषाच्या दंडाला लोंबकळून चालते. अशा स्त्री पुरुषांच्या खेळीमेळीच्या समाजांत जन्मलेल्या आणि वाढलेल्या बेटीला आमच्या हिंदु पुरुषांत स्त्री-दाक्षिण्याचा अभाव दिसला तर नवल कोणतं! आमच्या समजांत स्त्री-पुरुषांनीं मिळूनमिसळून वागण्याची पद्धत नाहीं; त्यामुळं बेटी जवळ आली कीं पुरुषांचें चेहरे गोरे मोरे होत आणि तिचं तें सलगीचं वागणं आणि लचकणं-मुरडणं पाहून स्त्रिया कुत्सितपणें हसत, कुजबुजत. परंतु बेटी मोठी चिकाटीची बाई यांत शंका नव्हती. आतां तर ती सरळ दिवाण सर सी. पी. अय्यर यांच्यापर्यंत जाऊन पोंचली होती व जवळजवळ त्यांच्या दंडाला लोंबकळून त्यांना कांहीं सांगत होती. परंतु सर सी. पी. अय्यर दुसऱ्याच कसल्यातरी विवंचनेंत गुंतले असावे. कारण बेटीची बडबड चालू होती तरी त्यांचे मोठेमोठे डोळे कसलातरी तांतडीचा विचार केल्याप्रमाणं मग्न दिसत होते.

थोड्याच वेळांत महाराज, राजमाता महाराणी सेतु पार्वतीबाई, राजभगिनी युवराज्ञी कार्तिका थिरूनल व त्यांची चारपांच वर्षांची मुलगी प्रिन्सेस पुयम थिरूनल राजवाड्याच्या पायऱ्या उतरून खाली आलीं. आतां बगीचांत चालतांनादेखील महाराणींच्या व युवराज्ञींच्या पायांत पादत्राणं नव्हतीं, त्यांच्या साड्याहि फार उंची नव्हत्या. मात्र दोघींच्या अंगावर माणकांचे लाल चमकदार दागिने होते. छोट्या पुयम्‌चे केस एखाद्या मुलाचं जावळ करावं तसे राखले होते व तिनं जरीचं परकर-पोलकं घातलं होतं. महाराजांनीं कोल्हापुरी थाटाचा पोषाख केला होता. महाराजांची व पाहुण्यांची मुलाखत सुरू झाली.

'क्यू' मधें उभं राहण्याच्या यातना मीं कधीं अनुभविल्या नव्हत्या; पण त्यांचा पुरता अनुभव आतां मला आला. जवळजवळ साडेचार वाजल्यापासून मी उभी होतें. आतां सात वाजून गेले होते आणि राजेसाहेबांची व दीडदोनशें पाहुण्यांची मुलाखत आटोपेपर्यंत मला असंच उभं राहावं लागणारा होतं! तेंसुद्धां उंच टाचेचे बूट घातल्यामुळं पायाच्या दहा बोटांवर! उभं राहूनराहून माझे पाय मनस्वी दुखूं लागले. शेवटीं एका पायावर उभं राहून आळीपाळीनं दुसऱ्या पायाला विश्रांति देण्याची युक्ति मीं योजली. इतक्यांत राजेसाहेब व युवाराज्ञी कार्तिका आमच्याकडे वळल्या. मीं चट्कन पाय जमिनीवर टेकला आणि पावलांना कळा येऊं लागल्या तरी तोंडावर हसूं ओढून आणलं. कार्तिका थिरूनल माझ्याजवळ आल्या आणि एकीकडे प्रिन्सेस पुयम्च्या हाताला हेलकावे देत, दुसरीकडे अत्यंत प्रेमळपणानं हसत मला विचारूं लागल्या, "तुमचा प्रवास चांगला झाला ना?" मीं म्हटलं, "होय. फार चांगला झाला." त्यांनीं विचारलं, "या बाजूला प्रथमच आलांत?" मीं "होय" म्हटलं. "मग प्रवासांत खूपच प्रेक्षणीय स्थळं पाहिलीं असतील ना तुम्हीं?" त्यांनीं विचारलं. मी उत्तर दिलं, "होय. मला आपला देश फार आवडला." यावर हसून त्यांनीं विचारलं, "इथं तुमची व्यवस्था चांगली आहे ना?" मीं म्हटलं, "फार चांगली आहे. आमचे इथले दिवस फार आनंदांत जात आहेत." "अस्सं फार आनंदाची गोष्ट." एवढं म्हणून त्या हसल्या. आम्ही एकमेकींना नमस्कार केला व त्या पुढं निघून गेल्या. परंतु महाराज अजून अप्पांशीं बोलत उभे होते. प्रश्न विचारतांना होणारी महाराजांची किंचित् वाकडी मान, चौकस डोळे आणि उत्तर ऐकल्यावर "अस्सं" अशा अर्थानं हनुवटी आंत घेऊन किंचित् हसण्याची लकब फार आकर्षक होती. महाराजांनीं अप्पांशीं शेकहँड केला व तेहि पुढं निघून गेले. मीं एक सुटकेचा निःश्वास टाकला. परंतु आतां उभं राहण्याची शिक्षा मला असह्य वाटूं लागली व दर पांच मिनिटांनीं "घरीं जाऊंया" असा तगादा मीं अप्पांच्या मागं सुरू केला. इतक्यांत एक गृहस्थ आम्हांला उद्देशून

म्हणाले, "आतां घरीं कशाला जातां! महाराजांचे दरबारी नर्तक आपल्या-साठीं नृत्य करून दाखविणार आहेत. ती पाहा सारी मंडळी निघाली."

शरिराचा व मनाचा संबंध नाहीं किंवा मगच नाहीं असं म्हणणारे लोक शहाणेच म्हटले पाहिजेत. कारण "दरबारचे नर्तक आतां नृत्य करणार आहेत" ही आनंदाची बातमी ऐकल्याबरोबर माझ्या कंटाळलेल्या शरिरांत एकदम नवचैतन्य उत्पन्न झालं आणि माझ्या पायाच्या कळाहि मी अजिबात विसरून गेलें. आम्ही दोघंहि पुढची जागा पटकावण्याच्या हेतूनं त्या गर्दींतून वाट काढीत आंतल्या हॉलकडे निघालों. या हॉलमध्यें आतां थिएटरप्रमाणं खुर्च्या मांडल्या होत्या व समोर स्टेजपुरती जागा रिकामी सोडली होती. आम्ही सर्व मंडळी व महाराज आपापल्या जागीं बसतों न बसतों इतक्यांत हॉलमध्यें एकदम विजेचें दिवे लागले व लख्ख प्रकाश उधळला. स्टेजच्या उजव्या वुइंगच्या बाजूला बसणाऱ्या ढोलक–वादकानं गंभीर लयबद्ध तालाचा ठेका सुरू केला. त्याच्या शेजारींच हातांत भला मोठा वीणा घेऊन बसलेल्या एका वयस्क स्त्रीनं सुरेल पण जरा कर्कश आवाजांत कथागायन सुरू केलं आणि आम्ही वुइंगकडे अत्यंत अधीर नेत्रांनीं पाहात राहिलों. तोंच अचानक एखाद्या वळवाच्या सरीप्रमाणं हलकीं नाचरीं पावलं टाकीत नृत्याचा सुंदर वेष केलेल्या स्त्रिया वुइंगमधून स्टेजवर आल्या आणि महाराजांना मुजरा करून त्यांनीं नृत्य सुरू केलं. समुद्राच्या लाटांवर नौकेनं हेलकावे खावे त्याप्रमाणं त्या लयबद्ध नृत्याच्या लहरीवर माझं मन हेलकावे खाऊं लागलं. नृत्य संपवून नर्तिका आंतल्या बाजूला गेल्या तेव्हां मीं हातांतलं प्रोग्रॅम कार्ड उघडलं. या नृत्याचं नांव 'रंगस्तुति' असं होतं. व त्यांतील मुख्य नर्तिकांचीं नांवं श्रीमति सुमति सेतुलक्ष्मी व लीला अशीं होतीं.

दुसऱ्या नृत्याचा विषय 'वामनावतार' असा होता व त्यांत शंकरकुटी हे मुख्य नर्तक होते. आतां ढोलकांतून प्रचंड तांडव स्वर निघूं लागले आणि बलिराजाच्या रुद्रावतारांत उन्मत्त पावलं टाकीत शंकरकुटी स्टेज-वर आले. शंकरकुटी नाकाडोळयानं अत्यंत रेखीव होते. आणि ते मूळचे

ठेंगणे असले तरी अभिनयचातुर्यामुळें बलीच्या अवतारांत भव्य वाटत होते. जिवणीच्या व भ्रुकुटींच्या अर्थपूर्ण हालचाली, खांदे, मान आणि नेत्र यांतून ओसंडणारा बलिराजाचा उन्माद आणि या सर्व अभिनयाला उचलून धरणारीं तीं पावलं, त्यांची ती झेप आणि आघात सारं कांहीं अवर्णनीय होतं. इतक्यांत संगीताचे स्वर ओघ ओसरावा तसे मंदावले. मीं चमकून सांथीदारांकडे पाहिलं आणि पुन्हा स्टेजवर पाहतें तों बलिराजा होता कुठं ? त्या ठिकाणीं एक अत्यंत ठेंगणी, लाचार मुद्रेची मूर्ति ठेक्यांत पावलं टाकीत पुढं येत होती. कुठं मघाचा बलिराजा आणि कुठं हा वामनावतार ! जवळजवळ उकिडवं बसावं इतपत पाय मोडून आणि तशा अवघड पवित्र्यांत नृत्य करायचं व पुन्हा अत्यंत सुंदर मुद्राभिनय वठवायचा हें तिहेरी दिव्य शंकरकुटी किती लीलेनं, कौशल्यानं करून दाखवीत होते ! बलिराजापाशीं याचना करणाऱ्या एका भित्र्या दरिद्री भिक्षूक बटूची भूमिका त्यांनीं इतकी आत्मसात् केली होती, कीं हें नाट्य नसून सत्यच आहे असा भास माझ्या नेत्रांना होत होता. पुन्हा भरती यावी तसे संगीताचे स्वर उसळले आणि याचक वामनाच्या जागीं वामनाकडे किंचित् तुच्छतेनं आणि “ काय वाटेल तें माग. अखिल जग जिंकणाऱ्या या बलिराजाला एका क्षुद्र याचकाची इच्छा तृप्त करणं कठीण आहे काय ? ” अशा उन्मत्त मदांधतेनं पाहणाऱ्या भव्य बलिराजाची मूर्ति दिसूं लागली, जादूगारानं बघतांबघतां निळ्या हातरुमालाचा तांबडा हातरुमाल केला कीं आपणाला आचंबा वाटतो; पण त्याहूनहि एका क्षणांत दुर्बल याचक असा ठेंगू वामन तर दुसऱ्याच क्षणीं मदांध जुलुमी बलिराजा अशी ही अभिनयाची अतिसुंदर व अत्यंत कठीण अशी आलटापालट पाहून माझे नेत्र तर चकित झालेच; पण बुद्धीहि स्तिमित झाली. ! याचक वामन म्हणाला, “ मला धनदौलत कांही नको. मला फक्त तीन पावलं जागा दे.” यावर बलिराजा तुच्छतेनं हसला व म्हणाला “ अरे, आणखी कांहीं माग. बलिराजा प्रसन्न झाला आहे. आणखी कांहीं माग. ” परंतु वामनाची एकच मागणी—“ मला फक्त तीन पावलं भूमि दे. ”

अखेर बलिराजानं वामनाला तीन पावलं भूमि दिली. आतां संगीतानं एकदम तांडवस्वरूप धारण केलं आणि आतांपर्यंत लाचार याचकाची भिम्मी पावलं टाकणारा वामन आनंदानं बेहोष होऊन नृत्य करूं लागला. वामनाचा आनंद काय साधा होता ? बलिराजाला पादाक्रांत करण्याचा आपला डाव पार पडणार हा आसुरी आनंद वामनाच्या त्या उंच उड्यांत लांब झेपांत व मुद्रेवरच्या क्रूर हास्यांत स्पष्ट दिसत होता. अखेर तीन पावलं भूमि व्यापण्यासाठीं वामनानं आपलं पहिलं पाऊल कमरेपर्यंत वर उचललं. वामनाच्या अंगीं प्रचंड शक्तीचा संचार झाला. नाकपुड्या विस्फरित झाल्या. डोळयांतून अंगार दिसूं लागला. दोन्ही बाहूंनीं तो जणूं गगन कवटाळूं लागला. आकाशांत मेघांचा प्रचंड गडगडाट व्हावा तसा ढोलकाचा गडगडाट झाला व वामनानं आपल्या पहिल्या पावलानं सबंध स्वर्लोक व्यापून टाकला ! नंतर कित्येक क्षण संगीताचा, वामनाच्या पावलाचा आणि आम्हां प्रेक्षकांच्या हृदयाचा थरकांप चालूच राहिला. वामनानं दुसऱ्या पावलानं सारी पृथ्वी व्यापून टाकली ! आणि आतां तिसरं पाऊल टाकण्याकरितां वामनानं आपला पाय वर उचलला. शंकरकुटींनीं पुन्हा बलिराजाची भूमिका घेतली. पण ती पूर्वीच्या मदांध बलिराजाहून किती वेगळी होती ! वामनानं दोन पावलांत दोन्ही लोक व्याप्त केलेले पाहून बलिराजा भीतीनं थरथरा कापूं लागला होता आणि वामनाच्या हातापायां पडून अत्यंत लाचारपणें जीवदान मागत होता. बलिराजाचं निर्दालन करण्यासाठींच वामनावतार घडला होता. बलिराजाच्या याचनेकडे तुच्छतेनं पाहून वामनानं आपलं पाऊल वर उचललं. पुन्हा एकदां मेघांचा व्हावा तसा संगीताचा गडगडाट झाला आणि वामनानं आपलं पाऊल बलीच्या मस्तकावर ठेवून त्याला पाताळांत ढकलून दिलं ! वादळ व्हावं तसं आतां संगीत शांत झालं. नृत्य संपलं होतं. शंकरकुटी टाळयांच्या कडकडाटांत—अभिवादन करीत करीत—नृत्य बुइंगमध्यें निघून गेले होते आणि नर्तिका सुमति आतां ‘ ऊर्वशी ’ नृत्य करूं लागली होती. परंतु वामनावताराच्या त्या अत्यंत प्रेक्षणीय

नृत्याच्या मोहिनींत गुंतलेल्या माझ्या मनाला आतां दुसरी कसलीच जाणीव उरली नव्हती.

'उर्वशीयम्' नृत्यानंतर पुन्हा शंकरकुटी 'भस्मासुर मोहिनी' या नृत्यांत भस्मासुराच्या भूमिकेंत स्टेजवर आले. भस्मासुराची उग्र तपस्या, "ज्याच्या मस्तकावर तूं हात ठेवशील तो भस्मसात् होईल" हें त्याला शिवानं प्रसन्न होऊन दिलेलं वरदान, या वरदानाच्या सामर्थ्यावर जगाला त्राहि भगवान् करून सोडण्याचा भस्मासुराचा संकल्प आणि अखेर स्वतः मोहिनीचं रूप घेऊन विष्णूनं कपट-कारस्थानानं केलेलं भस्मासुराचं निर्मूलन, एवढी सुंदर कथा या नृत्यांत गुंफली होती. विशेषतः भस्मासुर-मोहिनीचा प्रेमप्रसंग मला फार आवडला. एवढा पराक्रमी भस्मासुर मोहिनीच्या रूपावर कोण भाळून गेला! तिचं प्रेम जिंकण्यासाठीं अखेर तो नाचायलाहि तयार झाला. मोहिनीनं एखादा अवघड तोडा घ्यावा आणि खट्याळपणें प्रश्न करावा, "हें दाखवतोस का नाचून?" आणि मग भस्मासुरानं तो अवघड तोडा, चेहऱ्यावर नवशिकेपणाचा भाबडा अभिनय दाखवून परंतु तितक्याच कौशल्यानें नाचून मोठ्या अभिमानानं मोहिनीला भुवया उंचावून प्रश्न करावा, "पाहा. नाचलों ना? वाटेल तें सांग, मी करून दाखवीन." गवई व तबलजी या दोघांत उडालेली झटापट, चढाओढ आणि चीत जीत जितकी दिल थरारून सोडते, तितकाच आनंद भस्मासुर मोहिनीचं हें नृत्य पाहून होत होता.

आतां भस्मासुर नाचतांनाचतां देहभान हरपून गेला होता. मोहिनीनं भिंगरीसारखं एक वर्तुळ घेऊन समेवर येतांना आपला हात आपल्या मस्तकावर ठेवला. भस्मासुरानंहि तिच्याकडे मिस्किलपणानं पाहात एक वर्तुळ घेतलं आणि मोहिनीप्रमाणं आपला हात आपल्याच मस्तकावर ठेवला! सर्व जगाच्या मस्तकावर मृत्यूचा हात फिरवूं इच्छिणाऱ्या भस्मासुराला आपल्या हातानंच मरण आलं गति संपतांना भोंवरा हेल-पाटे खातो तसे खाऊन भस्मासुर जमिनीवर पडला! भस्मासुराची भूमिका करतांना शंकरकुटींनीं तपस्वी भस्मासुर, वरप्राप्तीनंतर खवळलेला

हिंसक भस्मासुर, मोहिनीच्या दर्शनानं प्रणयाकुल झालेला भस्मासुर या विविध छटा किती बेमालूम वठविल्या होत्या! अणि अशा विविध छटांमधे ते मधेंच विनोदहि निर्माण करीत तो मोठा गमतीचा होता.

भस्मासुर-मोहिनी नृत्यानंतर गोपींचा नाच झाला. त्यानंतर मोहिनी झालेली सेतुलक्ष्मी 'तिलाना' नृत्य करण्यासाठीं स्टेजच्या अगदीं पुढच्या बाजूला येऊन उभी राहिली. सेतुलक्ष्मीला देखणी म्हणतां आलं नसतं. परंतु तिचा सडपातळ चपलख बांधा पाहूनच मन मोहून गेलं असतं. उभं राहण्यांतली तिची ती ऐट, आत्मविश्वासानं प्रकट होणारी आणि प्रेक्षकांना कांहींसं आव्हान देणारी ही निर्भयता पाहून नृत्यकलेलाच ही आपल्या हाताच्या बोटावर नाचवीत असावी असा जो मी तर्क केला, तो तिचं तें अपूर्व नृत्य पाहून खरा ठरला. 'तिलाना' नृत्यांतील लांबलचक अवघड तोडे विजेप्रमाणं अत्यंत सफाईनं घेतांना पाहून आमच्या चित्तवृत्ति थरारून गेल्या.

सेतुलक्ष्मी नृत्य संपवून वुइंगमध्यें गेली आणि स्वत: शंकरकुटी श्रीशंकराच्या व सुमति पार्वतीच्या अवतारांत 'शंकर-पार्वती नृत्य' करण्यासाठीं स्टेजवर आलीं. पार्वती स्त्री म्हणून सुंदर असलीच पाहिजे, त्याप्रमाणं ठेंगणी, सुगोल बांध्याची मोहक चेहऱ्याची सुमति पार्वतीच्या भूमिकेंत सुंदर दिसत होती. पण व्याघ्रांबर पेहरलेल्या, भस्मचर्चित, जटाधारी शंकराच्या भूमिकेंत शंकरकुटींना पाहून मी चकितच झालें. शंकर या देवासंबंधीं माझी लहानपणींची कल्पना फार वेगळी होती. आमच्या घरीं शंकराचा एक फोटो होता त्यांत कपाळावर त्याला तिसरा डोळा होता व गळ्याभोंवतीं फडी काढलेला साप होता! फोटोतलं तें शंकराचं विद्रूप ध्यान पाहून त्या देवाविषयीं मला फक्त भय वाटत असे, परंतु आतां प्रवासांत या शंकरदेवाचं नवीन रूप पाहून माझं मत मी दुरुस्त केलं. शृंगारलीलांच्या बाबतींत कृष्णाहून कांकणभर सरस असूनहि शंकराची प्रसिद्धि फक्त 'भोळा सांब' अशी कां केली जाते मला कळत नाहीं! शंकराचं अर्धनारीनटेश्वराचं सोंग आणि कामुकतेचं उघड उघड प्रदर्शन मला कसंसंच वाटलं होतं. परंतु मदुरा येथील मीनाक्षीच्या मंदि-

रांतील नटराजाच्या अवतारांतील एकाहून एक नृत्याच्या सुंदर पोझेस पाहून या नर्तकांच्या कलावंत देवाला मी शंभर खूनहि माफ करायला तयार झालें होतें. शंकरकुटींना श्रीशंकराच्या अवतारांत पाहून मदुरेचा सुंदर नटराजच समोर उभा आहे असा भास मला झाला आणि स्तिमित नेत्रांनीं मी शंकर-पार्वतीचं तें द्वंद्वनृत्य पाहूं लागलें.

पार्वतीचं प्रियाराधन करतांकरतां शंकरकुटी अखेर नटराजाच्या त्या अति सुंदर पोझमधें उभे राहिले. ते उजव्या पावलावर उभे होते. डावा पाय त्यांनीं वर मोडून धरला होता आणि छातीसमोर बाहूंच्या मोठ्या आकर्षक मुद्रा केल्या होत्या. या अवघड पोझमधें ते अगदीं निश्चल उभे होते. मदुरेस मीं पाहिलेली सुंदरेश्वराच्या देवालयांतील नटराजाची ती शिलेची मूर्तीच जणूं आतां सजीव होऊन आमच्यापुढं अवतरली होती ! एका पायावरच शंकरकुटी वर्तुळ घेत होते. या पोझचं निरनिराळ्या अँगल-मधील सौंदर्य अत्यंत प्रेक्षणीय होतं. अखेर नृत्याचा समारोप करतांना एकमेकांच्या कमरेभोवतीं हातांचे विळखे घालून शंकर-पार्वती दोघांनीं मिळून जें नृत्य केलं तें पाहून तर आमची दृष्टि धन्य झाली !

त्या रात्रीं आम्ही राजवाड्यावरून परतलों. मेसमधें जेवण आटपून व चांदण्यांत दोनचार मैल फेरफटका मारून अखेर खोलीवर गेलों तेव्हां अकरा वाजून गेले होते. एरवी जी यातायात आणि दगदग मला असह्य आणि नकोशी वाटली असती ती केवळ मी आत्यंतिक आनंदाच्या नशेंत असल्यामुळं मला आतां जाणवतहि नव्हती. उलट दुसरे दिवशीं म्हणजे शनिवारीं संध्याकाळीं आम्हीं कन्याकुमारीला जाण्याचा बेत ठरविला होता त्यासंबंधीं गप्पागोष्टी करण्याची आम्हांला केवढी हौस वाटत होती. गेल्या तीन दिवसांत त्रिवेंद्रम शहरांतील बहुतेक सारीं प्रेक्षणीय स्थळं आम्हीं पाहिलीं होतीं आणि सर. सी. पी. अय्यर यांचं व्याख्यान पुन्हां एकदां ऐकण्याचा योगहि आम्हांला लाभला होता.

गुरुवारीं ता. २० डिसेंबर रोजीं सकाळीं आम्ही ॲक्वेरियम ( मत्स्यगृह ) पाहण्यासाठीं म्हणून बाहेर पडलों. आतां झटका ठरविण्यांत आम्ही अगदी

पटाईत झालों होतों. आमचा झटका त्रिवेंद्रमच्या बाजारपेठांतून व गजबजलेल्या वस्तींतून शहराबाहेर पडला आणि नारळी-पोफळींच्या दाट बनांतून जाणाऱ्या लहानशा रस्त्यानं चालूं लागला. वीसएक मिनिटांत आम्ही मत्स्यगृहापाशीं पोचलों. मत्स्यगृहाची बैठी, मध्यम आकाराची इमारत शंखमुखम् बीचजवळ होती व इमारतीपलीकडेच थोड्या अंतरावर विमानतळ दिसत होता. आदल्या दिवशींच इतर डेलिगेटस् हा विमानतळ पाहून गेले होते. विमानतळांत काय पाहण्यासारखं होतं कुणाला ठाऊक! खरी मजा विमानावरच. आतांहि वर आकाशांत एक विमान घिरट्या घालीत होतंच. आम्हीं झटका रस्त्यावरच उभा केला आणि मत्स्यगृहाकडे निघालों. पायऱ्या चढून आम्ही व्हरांड्यांत पोचलों तों समोरच भिंतीवर मत्स्यकन्येची भारी मोहक आकृति कोरलेली दिसली. पायरीवर एक नोकर बसला होता आणि उजव्या बाजूच्या खोलींत एक बाईहि टेबलापाशीं बसल्या होत्या. आम्ही मत्स्यगृह पाहण्यासाठीं आलों असं आम्हीं त्यांना इंग्रजी, हिंदी व अखेर मराठींतहि सांगून पाहिलं. अखेर खुणा केल्या. तेव्हा कुठं त्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला. तो नोकर दोन बोटं आमच्यापुढं नाचवीत म्हणाला, " चक्रम. " मला कळेना हा असा 'चक्रम' सारखं कां करतो आहे. परंतु आप्पांनीं त्याच्या हातावर दोन आणेल्या ठेवल्या तशी त्यानं चट्कन सलाम केला आणि मत्स्यगृहाचं दार उघडलं व आम्हीं आंत गेल्यावर चटकन लावूनहि टाकलं.

फोटोग्राफरच्या डार्करूममध्यें असावा तसा आंत अंधार होता! इतक्यांत त्यानं स्विच दाबला व जिकडेतिकडे उजेड झाला. आम्ही पाहतों तों आमच्या बाजूंना भिंतींत बसवलेले मोठमोठे हौद होते. मत्स्यगृहाचा आकार इंग्रजी 'यू' (U) सारखा होता. बाहेरच्या बाजूस पंधरा व आंतल्या बाजूस दहा असे रीइन्फोर्स्ड कॉंक्रीटचे, पुढच्या दर्शनी बाजूस काचेची प्लेट असलेले एकंदर पंचवीस हौद होते. या हौदांमध्ये 'इन्व्हिझिबल लायटिंग'ची व्यवस्था होती. बाहेरच्या पंधरा हौदांमध्यें समुद्राचं ताजं पाणी खेळविण्याची सोय होती. तर आंतल्या भिंतींतल्या दहा हौदांमध्यें साधं गोडं

पाणी व खदूळ पाणी भरलेलं होतं. कारण कांहीं मासे समुद्राच्या पाण्यांत राहतात तर कांहींना खदूळ पाणीच आवश्यक असतं म्हणतात. प्रत्येक हौदावर आंतील माशांची जात वगैरे माहिती काचेच्या फ्रेममध्यें घालून ठेवली असल्यामुळं आम्हांला माहितगार दर्शकाची जरूरच वाटली नाहीं. आम्ही एकएक हौद पाहण्यास सुरवात केली.

त्रावणकोर संस्थानांतील नदीनाल्यांतले मासे आम्ही प्रथम पाहिले. या माशांच्या अंगावर झेब्र्यासारखे काळे पट्टे होते. हवेंत श्वासोच्छ्वास करणारे 'व्हागामीन' जातीचे मासे, तीन-चार फूट लांबीचे 'सकर' मासे, तऱ्हेतऱ्हेचे जहरी-बिनजहरी पाणसाप निरनिराळ्या टॅंकमध्यें ठेवलेले होते. रॉक लॉबस्टर्स, म्यूरेना आणि पफर जातीचे मासे आम्हांला फार गमतीदार वाटले. रॉक लॉबस्टर आपल्या पोटाखालीं ऐंशी हजार अंडीं बाळगतात! तारेसारख्या टणक लांब मिशा, छत्रीच्या सांगाड्यासारखे हातपाय आणि कचकड्याचं तें शरीर पाहून हा प्राणी नसून एखादं यंत्रच असावं असा भास त्या खेकड्याकडे पाहून मला होत होता. आम्ही पाहात होतों तेव्हां दोन खेकड्याचं प्रियाराधन चाललं होतं! अशा विचित्र शरीरांतहि अलिंगनाची वासना असावी याचं मला फार नवल वाटलं! म्यूरेना जातीचे मासे चांगले सातआठ फूट लांबीचें होते. अजगरांसारखी वाटणारीं हीं वेटोळीं रबरी फुग्यांप्रमाणं हौदामधल्या पाण्यांत सारखीं सळसळत होतीं. पफर (ग्लोब) जातीचे मासे फारच मजेशीर वाटले. क्षणांत चिमुकले तर क्षणांत फुटबॉलप्रमाणें ते फुगत आणि पाण्यांत तरंगू लागत. अंगांत हवा भरून घेण्याचं या माशांच्याजवळ कांहींएक गुप्त साधन असतं म्हणे! 'लोटस लीप' जातीचे मासे आम्हांला फार आवडले. या माशांचा आकार अगदीं हुबेहुब कमळाच्या पानासारखा होता आणि त्यांच्या त्या कायेचं पोत तर एखाद्या उंची रेशमी वस्त्राप्रमाणं तलम होतं. रंगीत तलम पापुद्राच पाण्यांत हेलकावे खात आहे असं वाटे. बॅटफिश जातीचे मासे आम्हीं पाहिले तो त्यांना खरोखरीच वाघळांप्रमाणं पंखाचे पदर होते. याशिवाय कितीतरी रंगीबेरंगी, इंद्रधनुष्यासारखे सप्तरंगी मासे आणि लहान मोठीं

कासवंहि आम्हीं पाहिलीं. अखेर कॅटफिशच्या टँकसमोर आम्हीं उभे राहिलों. दीडदोन फूट लांबीचे आणि काळया रंगाचे हे मासे पाहण्यासारखे नव्हते. परंतु त्यांची कीर्ति मात्र फारच मजेशीर होती. या माशाचं दुसरं नांव 'स्कॅव्हेंजर' असं होतं. काशी, प्रयाग यांसारख्या क्षेत्राच्या ठिकाणीं यांचें थवे असतात. कुजकीं प्रेतं हेंच यांचं भक्ष्य असल्यानं हिंदु लोकांत हे मासे खात नाहींत.

आम्ही सर्व हौद पाहून बाहेर आलों तेव्हां माझ्या मनांत आलं, समुद्राच्या पोटांत किती चमत्कार भरला आहे पाहा! आम्हीं झटक्यांत बसलों व घराकडे निघालो तेव्हां अकरा वाजून गेले होते. झटका शहराच्या गजबजलेल्या वस्तींत शिरला तेव्हां समाजाच्या 'खालच्या थरा'चं आम्हांला दर्शन घडलं. एरवी कामकऱ्यांमध्यें आढळून येणारी अस्वच्छता मला या गरीब लोकांत दिसून आली नाहीं. उलट बायाबापड्यांचा अंगावरचे कपडे पांढरे स्वच्छ होते आणि त्यांच्या एकंदर वागणुकींत बराच नीटनेटकेपणा आढळला. मला वाटतं, हा मिशनरी लोकांच्या सहवासाचा परिणाम असावा. आम्ही होस्टेलसमोर झटका सोडून दिला; परंतु खोलीवर न जातां पलीकडच्याच कोपऱ्यावर असलेल्या 'प्राणिसंग्रहालया'च्या इमारतीकडे पायींच निघालों.

या इमारतीच्या आवारांत फाटकालगतच एक लहानसं दुकान होतं. तिथं मीं थोडीं केळीं विकत घेतलीं. ज्या घरांत लहान मुलं असतील तिथं जातांना मीं कांहींतरी खाऊ नेल्याशिवाय राहात नाहीं. आतां आम्ही प्राणिसंग्रहालाकडे निघालों होतों खरे; परंतु लहान मुलांइतकीच किंबहुना तीळभर अधिकच माया मला संग्रहालयांतील त्या बंदिस्त प्राण्याविषयीं वाटत होती व म्हणून मी त्यांच्यासाठीं खाऊ घेतला. आम्हीं रिवाजाप्रमाणं दोन चक्रम (आणेल्या) ऑफिसांत दिल्या, तिकीटं घेतलीं आणि प्रथम माकडांच्या पिंजऱ्याकडे गेलों. आम्हीं पिंजऱ्याजवळ जातांच सारीं माकडं एकदम उड्या मारीत आलीं. एक भला मोठा माकड एकदम पुढं आला व त्याला भिऊन इतर सारीं माकडं परत आपापल्या दांड्यांवर

जाऊन बसलीं. मी त्या माकडाला एक केळ दिलं. परंतु त्यानं तें पिंजऱ्याच्या मागच्या बाजूला भिरकावून दिलं व तो आपल्या भाषेंत कांहीं बोलूं लागला. आप्पानींहि त्याला केळीं देऊन पाहिलीं; पण जसं केळं द्यावं तसं तो भयंकर चिडूं लागला. त्याच्या रागाचं कारण मग आम्हांला समजलं. त्याला आप्पांच्या हातांतलं नारळाचं शहाळं पाहिजे होतं. आप्पा तर तें त्याला देण्यास कबूल होईनात ! अखेर आप्पांच्याकडे पाहून, वेडंवाकडं तोंड करून तो माकड भयंकर चीत्कार करूं लागला !

इथून आम्ही पक्षांच्या पिंजऱ्यांकडे गेलों. एका पिंजऱ्यांत पांढरे आणि रंगीत मोर होते. आम्ही पिंजऱ्याजवळ जातांच एका रंगीत मयूरानं आपला सुंदर पिसारा उभारला. त्याच्या पिसाऱ्याचं तें सौंदर्य पाहून मी थक्कच झालें. कलेचा कैवार घेऊन ' सरस्वति ' व्यासपीठार बसलेली नसून मयूरसिंहासनावर बसलेली आहे ' असं वारंवार आग्रहानं बजावणाऱ्या कादंबरीकाराचं स्वागतच जणूं कांहीं हा मयूर करीत होता ! इथून आम्ही हिप्पोपोटेमस, अस्वल, कोल्हे, मगरी, वनगायी, पांढरीं हरणं, झेब्रे वगैरे अनेक प्राणी पाहिले. चार नाकांचा बैलहि पाहिला ! परंतु मला सर्व प्राण्यांत झूमधले वाघ अणि सिंह फार आवडले. अशीं पुष्ट तेजस्वी जनावरं मीं प्रथमच पाहात होतें. या जनावरांचे पिंजरे उंचावर बांधले आहेत. या उंचवट्याखाली नैसर्गिक अरण्य राखलं असून पिंजऱ्यांतून या अरण्यांत उतरण्यासाठीं भुयारंहि बांधलीं आहेत. या जनावरांची सारी व्यवस्था ज्या ट्रेनरकडे होती तो स्वतःच आम्हांला जनावरं दाखवीत होता. जनावरांना शिकविण्याची त्याची हातोटी पाहून म्हैसूर दरबारनं त्याला ' टायगर गोविंदन् ' अशी पदवी बहाल केली होती. टायगर गोविंदन्नं आम्हांला ' शिवाजी ' नांवाचा पट्ट्या वाघ दाखविला. या वाघाचं सौंदर्य अपूर्व होतं. त्याचं तें सुवर्णवर्णाचं तेजःपुंज शरीर आणि लिंबाएवढे धगधगीत डोळे पाहून मी भयचकित होऊन गेलें. ' शिवाजी'ची जोडीदारीण ' पार्वती ' पिंजऱ्यांत हेलपाटे घालीत होती. टायगर गोविंदन् ' पार्वती ' असं ओरडला तेव्हां ती प्रचंड वाघीण एकाद्या कुलूंगी कुत्र्याप्रमाणं

पिंजऱ्याशीं आली आणि खुणेचा शब्द ऐकतांच आपला उजवा पंजा दोनतीनदां जमिनीवर आपटून तिनं प्रचंड गर्जना केली. अरण्यांत पार्वतीची गर्जना मैलन् मैल ऐकूं गेली असती आणि ती ऐकून कित्येक वन्य पशूंची गाळण उडाली असती. पार्वती पुनः पुन्हा गर्जना करूं लागली. या गर्जनेचं सामर्थ्य एवढं होतं, कीं पार्वतीची छाती एखाद्या मोठ्या भात्या-प्रमाणं खालीवर होत होती. दुसऱ्या एका पिंजऱ्यांत 'सुलताना' काळी वाघीण संतापानं फेऱ्या घालीत होती. पिंजऱ्याच्या मागच्या बाजूस एका अंधेऱ्या गुहेवजा कोनाड्यांत तिचीं दोन लहान बच्चीं बसलेलीं आम्हांला दिसलीं. हीं बच्चीं तिला शेजारच्याच पिंजऱ्यांतील पिवळ्या पट्ट्या वाघापासून झालीं असं टायगर गोविंदन् म्हणाला. राजा, राणी सुलतानाचा प्रियकर रूबी हीं तिन्ही जनावरं फारच मस्त आणि देखणी होतीं. शेवटल्या दोन पिंजऱ्यांत असेच आणखी दोन मोठाले वाघ होते. त्यांचीं नांवं टॉमी आणि सँडो. टॉमी ऊन खात पडला होता. टायगर गोविंदनूनीं आपल्या नोकराकडून एक भला मोठा मांसाचा तुकडा घेतला आणि त्यांनीं टॉमीला हांक मारून 'खालीं चल' असा हुकूम दिला. टॉमी चट्कन् उठला आणि मांजराप्रमाणं आळस देऊन पिंजऱ्यांतील भुयाराच्या वाटेनं खाली गेला. हा गुप्त जिना हिंस्र पशूंसाठीं राखलेल्या बंदिस्त अरण्यांत गेला होता. आम्ही पिंजऱ्याजवळून जाणारा रस्ता ओलांडून रस्त्याच्या कडेनं बांधलेल्या कठड्याशीं उभे राहिलों व चाळीस फूट सखलांत पसरलेल्या अरण्यांत पाहूं लागलों तोंच टॉमी एकदम झेप टाकीत आला आणि आपली डौलदार शेपटी दिमाखानं हालवीत ऊभा राहिला. झाडाझुडुपांत आणि उंच वाढलेल्या हिरव्या गवतांत उभा राहिलेला तो उमदा पुष्ट वनराज पाहून हें सौंदर्य तासन्तास पाहिलं तरी पुरेसं होणार नाहीं असं माझ्या मनांत आलं. टायगर गोविंदनूनीं मांसाचा तुकडा खाली फेंकतांच एका उडींत टॉमी त्याच्यावर तुटून पडला आणि दोन्ही पंजांत तो तुकडा पकडून चघळण्यांत मग्न झाला.

नंतर आम्ही पांढरा हत्ती पाहण्यासाठीं टायगर गोविंदन्बरोबर निघालों.

'झू'चं आवार खूपच मोठं होतं आणि चालून आतां आमचे पाय थकले होते. परंतु पांढरा हत्ती पाहण्याची जिज्ञासा आम्हांला पुढं ओढीत होती. ज्या लहानशा वाटेनं आम्ही चाललों होतों तिच्यां डाव्या बाजूस हिंस्त्र पशूंसाठीं राखलेलं नैसर्गिक जंगल होतं आणि उजव्या बाजूस जाळीच्या कंपौंडमध्यें राखलेल्या जंगलांत वनगायी, हरिणं शेळया वगैरे जनावरं मनमोकळीं हिंडतफिरत होतीं. जनावरांना संग्रहालयांतील आपलं निवासस्थान तुरुंगाप्रमाणं वाटूं नये म्हणून त्यांच्यासाठीं अलोट पैसा खर्चून नैसर्गिक अरण्याची खास व्यवस्था व त्यांच्या खाण्यापिण्याबाबत घेतली जाणारी काळजी पाहून मला फार समाधान वाटलं. आतां आमच्या पाऊलवाटेला चढण लागली आणि प्रत्येक पाऊल टाकण्याचं आम्हांला दिव्यच वाटत होतं. परंतु पांढऱ्या हत्तीचा चमत्कार पाहण्यासाठीं आम्ही अधीर झालों होतों. अखेर आम्ही टेकडीच्या माथ्यावर पोंचलों आणि समोर झाडाच्या बुंध्याला साखळदंडानं बांधलेल्या त्या प्राण्याकडे पाहून गोविंदन्‌ला मीं म्हटलं, " पांढरा हत्ती—पांढरा हत्ती म्हणून गाजलेला हत्ती तें हेंच का पिल्लू ? " कारण भुऱ्या रंगाच्या म्हशीप्रमाणं हा हत्ती भुरा होता आकारानंहि तेवढाच होता ! माझ्या जिज्ञासेचा असा चक्काचूर क्वचितच झाला असेल !

'प्राणिसंग्रह' पाहून झाल्यावर आम्ही 'चित्रालय' ( गॅलरी ऑफ पेंटिंग्ज् ) पाहण्यासाठीं गेलों. प्राणिसंग्रहालयाच्या अत्यंत विस्तीर्ण अशा आवारांतच ही इमारत आहे. इमारत कांहीं फारशी भव्य नाहीं. आधुनिक पद्धतीच्या एखाद्या लहानशा शाळेएवढी ती आम्हांला वाटली. या चित्रालयावर मुख्य अधिकारी म्हणून श्री. मेनन नांवाचे गृहस्थ काम करतात. हे स्वत: एक नामांकित चित्रकार असून त्यांचीं दहा चित्रं या इमारतींतच आम्हांस पहावयास मिळालीं, आणि पुढें आम्ही कन्याकुमारीला गेलों. तेव्हां ज्या हॉटेलमध्यें आम्हीं उतरलों होतों तिथें त्यांची फारच सुंदर अशी दोन मोठालीं 'निसर्गचित्रं' टांगलेलीं आम्हांला दिसलीं. आम्ही चित्रालयांत गेलो. तेव्हां श्री. मेनन आलेले नव्हते. परंतु त्यांच्या मदतनिसांनीं

आमचं स्वागत करून आम्हांला सर्व प्रकारची माहिती सांगितली. आम्ही कॅटलॉग विकत घेतला आणि आपल्याला कोणतीं दालनं मुख्यत: पाह्यचीं तें ठरवूं लागलों. चित्रालयाच्या तळमजल्यावर एकंदर सात मोठालीं दालनं आहेत, आणि वरच्या मजल्यावर चार दालनं आहेत. एकंदर चित्रसंग्रहाचं कालक्रमाच्या दृष्टीनं आणि संप्रदायाच्या दृष्टीनं वर्गीकरण केलेलं असून वेगवेगळया वर्गांची मांडणी निरनिराळया दालनांतून केलेली आहे. 'इंडो युरोपियन पेंटिंग,' 'रजपूत,' 'मोंगल पेंटिंग,' यांच्या दालनांत आम्ही कांहीं फारसा वेळ घालविला नाही. विशेषत: इतिहासाच्या दृष्टीनंच या चित्रांना महत्व आहे, आणि आम्हांला त्यांत कांहीं फारशी गोडी नव्हती. जपानी, चिनी, बाली, सिंहली आणि तिबेटी या संप्रदायांचीं चित्रंही आम्हीं घाईघाईनंच पाहिलीं. चिनी चित्रकलेच्या नमुन्यांत रेशमानं भरलेलीं तीन चार चित्रं फारच चांगलीं वाटलीं; आणि जपानी चित्रांच्या संग्रहांत 'होकुसाई' या चित्रकाची 'नदीचा देखावा,' 'फूजियामा' आणि 'बगीचा' हीं चित्रं विशेष आल्हादकारक वाटलीं. चिनी आणि जपानी चित्रकलेच्या वैशिष्ट्य तंत्रांतील काय आहेत मला माहिती नाहींत. परंतु हीं चित्रं पाह्यल्याबरोबर हा संप्रदाय कांहींतरी निराळा आणि वैचित्र्यपूर्ण आहे एवढी खात्री पटते. भिंतीवरील चित्रांचेही ('म्यूरल पेंटिंग्ज्') भिन्न भिन्न संप्रदायानुसार विभाग केलेले आढळले. परंतु हीं चित्रंसुद्धां आम्ही घाईघाईनंच पाहिलीं. आम्ही अगदीं सावकाशीनं फक्त दोनच विभाग पाहिले. एक आधुनिक हिंदी चित्रकलेचा, आणि दुसरा राजा रविवर्मा यांच्या चित्रांचा. यापैकीं पहिल्या विभागानं तीन खोल्या व्यापल्या असून त्यांत एकंदर एकशें अकरा चित्रं आहेत. आधुनिक हिंदी चित्रकारांच्या दोन पिढया होऊन गेल्या, या कल्पनेनुसार पहिल्या पिढीतील नामांकित हिंदी चित्रकारांचीं एकतीस चित्रं एका दालनांत टांगलेलीं असून, या चित्रकारांच्या शिष्यांनीं अगर इतर उदयोन्मुख तरुण कलावंतांनीं काढलेलीं चित्रं दुसऱ्या दोन दालनांत ठेवलेलीं आहेत. अवनींद्रनाथ टागोर, गगनेंद्रनाथ टागोर, नंदलाल बोस, चौधरी, हलधर, जैमिनी रॉय, चुगताई, हीं मोठमोठीं नांवं पूर्वी अधून

मधून ऐकलीं होतीं. परंतु आतां त्यांच्या चित्रकलेशीं माझा परिचय होत होता. चित्रांच्या या प्रदर्शनांत रविंद्रनाथ टागोर यांचंही एक चित्र मला आढळलं, त्यावर 'पक्षी' असं नांव दिलेलं होतं म्हणूनच मी तें चित्र ओळखूं शकलें. चौधरी यांचीं चित्रं फारच मनोहर वाटलीं. त्यांच्या चार चित्रांपैकीं, 'मयूर' आणि 'पहाड' या चित्रांकडे कितीही पाहिलं तरी मनाचं पुरेसं समाधान होईना. प्रमोदकुमार चतर्जी यांचीं बहुतेक चित्रं पौराणिक विषयावरचीं आहेत. चुगताई यांचीं तीन्हीं चित्रं अतिशय सुंदर आहेत. हे चित्रकार जातीनं मुसलमान असून यांनीं राधाकृष्ण प्रेम या विषयाचें जें अतिशय हृद्य चित्रण 'प्रेमसागर' नांवाच्या चित्रांत केलेलं आहे तें विशेष उल्लेखनीय आहे. हे मागच्या पिढींतील मोठमोठे चित्रकार सोडून आम्ही जेव्हां तरुण चित्रकारांच्या कलाकृतींकडे वळलों तेव्हां किती-तरी नांवें आमच्यापुढें आलीं, आणि तीं पाहिल्यावर अगदीं आज घटकेला हिंदुस्थानांत निरनिराळया प्रांतांत इतके निष्णात कलावंत असल्याचं मनांत येऊन मला समाधान आणि अभिमान वाटला. या चित्रकारांत श्रीमती सुन्यानिदेवी, विजोली बालाजी, शकुंतला, वसुमति, सौदामिनी, बेगम शयदा हसन इत्यादि स्त्रिया आढळल्या तेव्हां मला आश्चर्याबरोबरच समाधानही झालं परंतु मनांत असाही विचार आला कीं या भव्य प्रदर्शनांत एकाही महाराष्ट्रीय चित्रकाराचं चित्र नसावं ही केवढी खेदाची गोष्ट म्हटली पाहिजे !

या दोन दालनांत मिळून जीं चित्रं मांडलेलीं आहेत त्यांत लक्ष विशेषें करून वेधून घेणारी पुष्कळच आहेत. चौधरी यांचे शिष्य श्री. नारायणराव यांनीं 'मंदिर प्रवेश' नांवाच्या चित्रांत महात्मा गांधींच्या आदेशानुसार त्रावणकोर संस्थानांत १९३६ सालीं अस्पृश्यता–निवारण कायदा सरकारनें केला आणि सर्व मंदिरं हरिजनांना खुलीं केलीं त्यावेळेस एका मंदिरांत हरिजन प्रवेश करीत आहेत असं दृश्य दाखविलेलं आहे. या चित्रांत –व्यपणा आणि उदात्तपणा तर आहेच. पण शिवाय मंदिर प्रवेश करणाऱ्या हरिजनांच्या तोंडावरील भावही कुशलतेनं दाखविलेले आहेत. मनीषि डे,

अर्धेंदु प्रसाद बॅनर्जी, सुधीर खस्तगीर यांचीं निसर्ग चित्रं मला फार मोहक वाटलीं. बेगम शयदा हसन यांचं 'भाजीवाली'चं चित्रही फार सुंदर वठलेलं आहे. परंतु आम्ही या दालनांतील ज्या चित्रापुढें पुन: पुन्हा उभे राहिलों तीं के. माधव मेनन आणि वीरेश्वर सेन यांचीं चित्रं होत. श्री, मेनन यांच्या चित्रांची एक विशिष्ट शैली आहे. अतिशय नाजुक अशा उभ्या आडव्या तिरप्या रेषांच्या साहाय्यानं हे आपलीं चित्रं सजवितात आणि निसर्गाचाच विषय ते बहुधा निवडतात. यांचीं जीं दहा चित्रं या ठिकाणीं आहेत त्यांत 'अड्यार' आणि 'वल्लभ' या दोन चित्रांत त्यांच्या कलेचा विशेष विलास झालेला दिसला. 'वल्लभ' या चित्रांत एका दाट जंगलांतील अरुंदशा कालव्यांतून छोट्या छोट्या नावांची एक रांगच्या रांग चाललेली दाखविली आहे. या चित्राकडे एकाग्रतेनं मी पाहूं लागलें, तेव्हां मला असा स्पष्ट भास झाला कीं त्या कालव्याच्या कांठावर मी स्वत: उभी असून माझ्या अगदीं पुढून त्या लहान लहान गवती छपरांच्या होड्या माझ्या अगदीं संथपणे पुढेंपुढें सरकत आहेत. मला वाटतं चित्रकलेची मौज कांहीं निराळीच आहे. यांची एकंदर आठ चित्रं या ठिकाणीं असून चार चारांचे गुच्छ करून ती टांगलेलीं आहेत. हीं सारीं आठीं चित्रं आकारानं अगदीं लहान आहेत. प्रत्येक चित्र एका पोष्टकार्डाच्या आकाराचं आहे. परंतु या एकेका चित्रांत निसर्गाचा केवढा तरी भव्य विस्तार दाखविलेला आहे. एका चित्रांत आपल्याला गंगानदीच्या किनाऱ्यावरचे घाट दिसतात, तर एकांत त्या पर्वतालगतची एक अत्यंत विशाल दरी दिसते! चित्राचा आकार आणि चित्रित विषयाचा भव्य विस्तार या दोहोंचे विचार केल्यावर हीं चित्रं ज्यांना प्रत्यक्ष पहावयास मिळालीं नाहींत त्यांच्या सुद्धां लक्षांत चित्रकारानं आपला कुंचला किती नाजुकपणानं चालविला असेल तें येईल. मला हीं आठही चित्रं अतिशय आवडलीं, आणि या दालनांतून बाहेर पडण्यापूर्वी मी तीं सारीं पुन्हा एकदा डोळेभरून पाहून घेतलीं.

या चित्रालयांत राजा रविवर्मा यांचीं चित्रं आहेत असं मी ऐकलं होतं.

पण तें ऐकून माझी कल्पना झाली होती कीं राजा रविवर्मा यांच्या हातचीं दहापांच चित्रं इथं असतील झालं. परंतु ' आधुनिक हिंदी चित्रकले 'च्या विभागाचीं तिन्हीं दालनं पाहून झाल्यावर आम्ही जेव्हां हातांतला कॅटलॉग पाहिला तेव्हां आम्हांला आढळून आलं कीं राजा रविवर्मा यांच्या चित्रांनीं अशीच तीन दालनं व्यापलेलीं आहेत, आणि त्यांत त्यांची एकंदर ६६ चित्रं आहेत ! या गोष्टीचा मला फार विस्मय वाटला. इकडे महाराष्ट्रांत राजा रविवर्मा यांचं नांव पुष्कळांना माहीत आहे. परंतु त्यांनीं पौराणिक विषयांवर आधारलेलीं जीं चित्रं काढलीं त्यांतलीं दहावीसच आम्हां महाराष्ट्रीय लोकांना माहीत आहेत, आणि राजा रविवर्मा यांची चित्रकला म्हणजे एवढींच चित्रं अशी महाराष्ट्रांतील सामान्य मनुष्याची समजूत आहे. मला वाटतं कीं चित्रकलेचा व्यासंग आणि धंदा करणाऱ्या महाराष्ट्रीय चित्रकारांचीदेखील एवढीच समजूत असावी. त्यामुळें राजा रविवर्मा यांचीं सहासष्ट चित्रं चित्रालयांत आहेत हें कळल्यावर मला बरंच आश्चर्य वाटलं, आणि आनंदही झाला.

राजा रविवर्मा यांनीं काढलेल्या चित्रांचे तैल रंगांतलीं चित्रं, जलरंगांतलीं चित्रं, स्केचेस, असे भाग या ठिकाणीं केलेले आहेत आणि कालवश होण्याच्या आधीं जीं चित्रं त्यांनीं करावयास घेतलीं होतीं व जीं अपुरीं राहिलीं त्यांचाही समावेश या ठिकाणीं केलेला आहे. राजा रविवर्मा यांचे बंधू राजवर्मा यांच्या हातची एक व त्यांच्या भगिनी मंगलाबाई यांच्या हातची एक अशा रविवर्म्यांच्या दोन प्रतिमा ( पोर्ट्रेट्स ) या संग्रहांत पहावयास मिळतात, आणि ' किलिमनूर ' या ठिकाणच्या आपल्या स्टुडिओंत काम करतांना राजा रविवर्मा जें लाकडी रंगपात्र ( ईसेल ) वापरीत असत तेंही मांडलेलं आहे. राजा रविवर्मा हे ज्या राजकुलांत जन्मले त्यांतील सर्वच स्त्रीपुरुष चित्रकलेचे उपासक होते, व या राजघराण्याची चित्रसंगितादि कलांच्या उपासनेची परंपरा आजतागायत चालू असलेली आपल्याला आढळते. सध्यांच्या महाराजांच्या मातोश्री महाराणी सेतु पार्वतीबाई या राजा रविवर्मा यांच्याच घराण्यांतील आहेत आणि संगीत

कलेंतील त्यांचं प्राविण्य चित्रकलेविषयींची त्यांची आस्था व अभिरुचि प्रख्यात आहेत. राजा रविवर्मा यांचा जन्म किलिमनूर या ठिकाणीं १८४८ सालीं झाला. त्यांचे चुलते राजा रविवर्मा यांच्याकडून चित्रकलेंतील पहिले धडे त्यांना मिळाले. पुढें थिओडोर जेनसेन या नांवाचे एक इंग्रज चित्रकार त्रावणकोरला आले तेव्हां त्यांच्या हाताखालीं रविवर्मा शिकले. १८७३ सालीं मद्रास येथील प्रदर्शनांत रविवर्मा यांच्या 'नायर स्त्रीची वेणीफणी' या चित्राला सुवर्णपदक मिळालं, आणि पुढें याच चित्राला व्हिएन्ना येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत बक्षीस मिळालं. राजा रविवर्मा यांची कीर्ति एकदम सगळीकडे पसरली ती या चित्रामुळें. यावेळेस ते अवघे पंचवीस वर्षांचे होते. यानंतर राजा रविवर्मा यांनीं खूपच कामं केलीं, आणि ठिकठिकाणच्या प्रदर्शनांत बक्षिस सन्मान चिन्हं मिळविलीं. राजा रविवर्मा १९०६ सालीं म्हणजे वयाच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी कालवश झाले. त्यांचा चित्रकलेचा उद्योग अगदीं अखेरच्या घटकेपर्यंत चालला होता. म्हैसूर दरबारच्या खास आमंत्रणावरून हत्तीच्या शिकारीचीं चित्रं तयार करण्याचं काम त्यांनीं पत्करलं होतं. या कामांत असतांनाच त्यांचा अंत झाला. हत्तीच्या शिकारीच्या विषयावरची ही चित्रमाला अपुरीच राहिली. या अपुऱ्या स्थितींतच ती त्रिवेंद्रमच्या या संग्रहांत पहावयास मिळते.

रविवर्म्यांच्या हातचीं एकंदर ६६ चित्रं या ठिकाणीं आहेत, असं कॅटलॉगमध्यें वाचल्यावर मला वाटलेला साश्चर्य आनंद तीं चित्रं प्रत्यक्ष पाहिल्यावर शतगुणित झाला. कारण संख्येप्रमाणेंच गुणांनी देखील हीं चित्रं फार मोठीं असल्याची साक्ष त्यांच्या प्रत्येक कृतीवर अगदीं स्पष्ट दिसत होती. एखाद्या लेखकानं नाटक, कादंबरी, काव्य, निबंध अशा प्रकारें वाङ्मयाचे सर्व प्रकार उत्तम प्रकारे हाताळलेले पाहिल्यावर त्याचा मोठेपणा पटावा त्याप्रमाणें रविवर्मा यांचं सव्यसाचित्व त्यांच्या या चित्रसंग्रहा वरून अगदीं पूर्णपणें पटतं. या संग्रहांत पौराणिक विषयावरचीं त्यांचीं चित्रं तर आहेतच, परंतु ज्यांना सामाजिक विषयावरचीं चित्रं म्हणतां येतील अशी देखील पुष्कळ चित्रं आहेत, आणि लॅंडस्केप्स आहेत,

पोर्ट्रेट्स आहेत! या सर्व विविध प्रकारांत आणि तैलरंग, जलरंग अशा भिन्न भिन्न माध्यमांत, राजा रविवर्मा यांची गति सारखीच होती असं दिसतं. 'वैरागी,' 'रजपूत सैनिक,' 'गौळण,' 'फुलवाली' अशा एकेकच आकृति दाखविणाऱ्या चित्रांत राजा रविवर्मा यांनीं जसं नैपुण्य दाखविलं आहे, त्याच प्रमाणें भव्य पार्श्वभूमीवर शेंकडों आकृतींचं चित्रण त्यांनीं अगदीं सहजतेनं आणि सफाईनं केलं आहे. 'उदेपूरचा दरबार,' 'द्रौपदी वस्त्रहरण,' 'राजा विराटांचा दरबार,' 'घोडे,' अशासारख्या त्यांच्या चित्रांकडे पहात उभं राहिलं कीं चित्राचा विषय जितका भव्य असेल तितकी त्यांची प्रतिभा आणि त्यांचं चित्रणकौशल्य उजळून गेलं असेल असं वाटतं. ही सारीं चित्रं पाहतांना माझ्या मनांत येत होतं, इतक्या मोठ्या योग्यतेच्या चित्रकाराचा महाराष्ट्रांतील आम्हां सामान्य लोकांना, इतकंच नव्हे तर खुद्द चित्रकारांनाही अगदीं त्रोटक परिचय असावा ही केवढी खेदाची गोष्ट! खरं म्हणजे राजा रविवर्मा यांच्या कला वैशिष्ट्यांचा परिचय करून देणारं चरित्र मराठींत लिहिलं गेलं पाहिजे, व महाराष्ट्रीय चित्रकारांनीं मुद्दाम इकडे त्रिवेंद्रमला येऊन राजा रविवर्मा यांचीं हीं चित्रं पाहिलीं पाहिजेत!

या चित्रालया सारख्या ठिकाणीं गेलं कीं तेथून परत वळणं मोठं कठीण असतं. कारण जीं चित्रं विशेष मनांत भरलेलीं असतात तीं कितीही पाहिलीं तरी मनाचं समाधान होत नाहीं. आतांही असंच झालं. चित्रं पुरेशीं पाहून झाली होती म्हणून नव्हे तर मध्यान्ह उलटून दुपारचा एक वाजला होता म्हणून आम्ही आपले पाय परत वळविले. या सुंदर चित्रालयाचा निरोप घेतांना माझ्या मनांत असा विचार आला कीं, आपल्या प्रजाजनांची कलाविषयक अभिरुचि वाढविण्यासाठीं जो सर्वांगीण प्रयत्न या त्रावणकोर संस्थानांत होत आहे तसा प्रयत्न सर्व संस्थानांत इतकंच नव्हे तर खालसा मुलुखांतही अवश्य व्हायला हवा. या चित्रालयांतील चित्रांची छापील पुस्तिका आम्ही विकत घेतली तिच्या पहिल्या पानावर एका प्रसिद्ध संस्कृत वचनाचं इंग्रजी भाषांतर छापलेलं आहे. तें असंः—

"The study of a good picture helps one to fulfil one's duty by becoming a better citizen, and to attain Liberation from the expensive and enslaving demands of the lower nature, through the cultivation of the higher nature"

चित्रालय पाहून आम्हीं होस्टेलवर पोंचलों. तेव्हा दुपारीं एक वाजून गेला होता. आम्ही मेसमध्यें गेलों तेव्हां जेवणघरांत शुकशुकाट होता. परंतु महाराज आमची वाटच पहात होते. उशीर झाला होता तरी त्यांनीं आम्हांला पदार्थ अगदीं गरम वाढले. मद्रासी मेसमधून मद्रासचं प्रसिद्ध सारही आणवून वाढलं. बदामी हलवा, माहिम हलवा, वगैरे गोड मिठाई आग्रहानं खाऊं घातली, आणि आपल्या अलेपी येथील हॉटेलच्या गंमतीही ऐकविल्या. महाराष्ट्रीय सैपाकाची माहिती ते मला विचारूं लागले, तेव्हां मोठीच पंचाईत झाली. परंतु कोल्हापुरास परतल्यावर माझ्याजवळचं "हजार पाकक्रियांचं" पुस्तक मी जरूर पाठवीन असं आश्वासन देऊन त्या परिक्षेतून मी निसटलें. जेवण आटोपून आम्ही वर आमच्या खोलींत गेलों तेव्हां दोन वाजून गेले होते. आतां आम्हांला विश्रांतीची फार जरूर वाटली. सकाळीं 'झू' 'चित्रालय' पाहून आम्ही खूपच दमलों होतों, आणि आतां रमत गमत जेवणही मजेत झालं होतं. शिवाय पुन्हां पांच वाजतां युनिव्हर्सिटीच्या स्वागत मंडळातर्फे आम्हा डेलिगेटस् मंडळीना चहापार्टी होती, व त्यानंतर लगेच दिवाणसाहेब सर सी. पी. अय्यर यांचं व्याख्यान होतं. परिषदेचं उद्घाटन करतांना सर साहेबांनीं जें भाषण केलं होतं तें ऐकून आमची निराशा झाली होती. परंतु आजच्या त्यांच्या व्याख्यानांत त्यांच्या वक्तृत्वाची चमक दिसेल अशी आशा आम्हांला होती. तेव्हां पांच वाजण्यापूर्वीच आम्हीं विश्रांति, चहा आटोपून तयार झालों आणि चहापार्टीसाठीं युनिव्हर्सिटीच्या इमारती पुढील बगीचांत अगदीं वेळेवर हजर झालों.

•

आम्ही पोंचलो तेव्हां पार्टी सुरू झाली होती. बगीचा मधून हिरवळीवर पन्नाससाठ छोटीं छोटीं टेबलं मांडली होतीं. प्रत्येक टेबला भोंवतीं चार

खुर्च्या होत्या, आणि मांजरा सारख्या हलक्या पावलांनीं त्यामधून वेटर्स लगबगा हिंडत होते. आम्ही एका टेबलावर जाऊन बसलों. टेबलावर केक, बिस्कीटं, उपमा व आइसक्रीम मांडलेलं होतं. सूर्य बराच वर होता व त्याचीं तिरपीं किरणं पाहुण्यांच्या डोळ्यांत शिरत होतीं. पार्टी चालू असतांना सर्व पाहुण्यांचं स्वागत करण्यासाठीं स्वतः दिवाणसाहेब टेबलां मधून हिंडत होते. ते आमच्या टेबलापाशी येऊन उभे राहताच आम्ही उठून त्यांना अभिवादन केलं. त्यांनींही दोन मिनिटं थांबून आमची मोठया अगत्यानं चौकशी केली व आमच्याशीं हस्तांदोलन करून ते पुढे गेले. या दोन मिनिटांत मी त्यांना जवळून पाहिलं तेव्हां त्यांच्या बुद्धिमान चेहऱ्यावरचा व आचारांतला खानदानी रुबाब मला फार आवडला, व लवकरच ऐकायला मिळणार असलेल्या त्यांच्या व्याख्यानाविषयींची माझी उत्सुकता वाढली.

युनिव्हर्सिटीच्या इमारतीचा मोठा हॉल आम्ही जाण्यापूर्वीच चिकार भरला होता. परंतु एका ओळखीच्या स्वयंसेवकानं आम्हांला पुढच्या रांगेतील खुर्च्या मिळवून दिल्या. सहा वाजतां सर सी. पी. अय्यर भाषण करावयास उठले व जवळजवळ तासभर त्यांनीं सूफीपंथ व वेदांत याबद्दल तौलनिक स्वरुपाचं अत्यंत मनोवेधक असं विवेचन केलं. त्यांची इंग्रजी भाषा अवघड होती. मधून मधून आपल्या विधानांच्या पुष्टीसाठीं सूफी पंथांतलीं वचनं आणि उपनिषदं गीता यांमधील श्लोक अस्खलित स्वच्छ वाणींत ते म्हणून दाखवीत होते. विषयाचा भारदस्तपणा, विचारांचं सामर्थ्य आणि भाषेचा बलशाली ओघ यांमुळें त्यांच्या वक्तृत्वानं आमच्या मनावर जबरदस्त मोहिनी घातली. पहिल्या दिवशीं त्यांचं भाषण ऐकून झालेल्या निराशेची यावेळीं त्यांनीं पुरेपूर भरपाई करून दिली होती, व आपल्या वक्तृत्वाबद्दल व विद्वत्तेबद्दल पसरलेल्या कीर्तीचा खरा प्रत्यय आम्हांला आणून दिला होता.

आपलें भाषण संपवून ते खालीं बसले तेव्हां सभागृहांत थोडा वेळ अगदीं पूर्ण स्तब्धता पसरली, आणि स्तब्धतेचा आमच्या मनावर कांहीं

अवर्णनीयच परिणाम होत आहेसं मला वाटलं. सर सी. पी. यांच्या आवेशयुक्त वक्तृत्वानं आणि पांडित्यपूर्ण विचारसरणीनं संपूर्ण तासपर्यंत सतत भरलं गेलेलं तें वातावरण जरी सर सी. पी. प्रत्यक्ष बोलावयाचे थांबले तरी अजूनहि तसंच कायम होतं, आणि त्या वातावरणाची उंच पातळी सोडून सामान्य व्यवहाराच्या खालच्या पातळीवर यावयास आमची जणूं तयार नव्हती. उत्तम भाषण, उत्तम गाणं, उत्तम नृत्य, अशा कोणत्याही एका कलेचा आविष्कार पाहिला कीं त्यानंतरची स्तब्धता नेहमीं याचप्रकारची असते असा माझ्याप्रमाणेंच इतरांना अनुभव आला असेल असं वाटतं. मनुष्याला व्यावहारिक जगांतून वरच्या पातळीवर नेणं हेंच कलावंताच्या ठिकाणच्या प्रतिभेचं कार्य समजलं पाहिजे म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं.

अखेर ती स्तब्धता संपली, आणि प्रोफेसर वाडिया बोलायला उभे राहिले. प्रो. वाडियांच्या भाषणाचा विषय ‘बुद्धधर्म’ हा होता. “बुद्धाचा अवतार हिंदुस्थानांत झाला. बुद्ध धर्माची संस्थापना याच देशांत झाली. बुद्धसंप्रदाय या देशाबाहेर अजून जिवंत आहे. परंतु जेथें भगवान बुद्ध जन्मले त्या या देशांत मात्र त्यांचं नांव आणि संप्रदाय नामशेष व्हावा ही केवढी खेदाची गोष्ट! मीं जेव्हां जेव्हां गयेला जातों तेव्हां तेव्हां भगवान बुद्धाच्या मूर्तीवर वटवाघळं घिरट्या घालतांना पाहून माझं अंतःकरण शतशः विदीर्ण होतं.” अशा आशयाचं मोठं भावनापूर्ण व काव्यमय भाषण प्रोफेसर साहेबांनीं केलं. सर. सी. पी. च्या नंतरचं हें वाडियाचं भाषण म्हणजे खानदानी संगीता नंतर झालेलं भावपूर्ण काव्यगायनच म्हणानात. सभा जिंकली अशा समाधानांत प्रोफेसरसहेब भाषण संपवून खालीं बसले, व त्यांचं भाषण चालू असतांना निर्विकार मुद्रेनें बसलेले सर सी. पी. उठून उभे राहिले, व म्हणाले. “प्रोफेसरसाहेबांच्या भाषणावर टीका करण्याचा अधिकार मला नाहीं. परंतु त्यांच्या भाषणांतील कांहीं विधानांतील चुका दाखविल्यांखेरीज मला राहवत नाहीं. कारण आज जवळ जवळ पन्नास वर्षे मी हिंदुधर्माचा जितका चिकित्सापूर्ण अभ्यास केला असेल तितका

दुसऱ्या कोणी केला नसेल.” अशी प्रस्तवना करून सर साहेबांनीं प्रोफेसर वाडियांच्या भाषणांचा मुद्देवार समाचार घेण्यास सुरवात केली. त्यांच्या प्रतिपादनाचा मुख्य आशय असा होता कीं बुद्धधर्माचा बडेजाव हिंदुस्थानांत दीर्घकाल राहूं शकला नाहीं याचं मुख्य कारण असं, कीं तो धर्म हिंदुधर्माचा पराभव कधीं करूं शकला नाहीं. बुद्धधर्म म्हणजे सनातनी हिंदुधर्माविरुद्ध पुकारलेलं एक बंड होतं, आणि हिंदुधर्माच्या विशाल स्वरूपांत इतर बंडं ज्याप्रमाणें गडप झालीं त्याप्रमाणेंच बुद्धाचा सुधारकी पंथही गडप झाला. बुद्धाच्या विचारसरणींत ज्या ज्या स्वीकारणीय अशा गोष्टी होत्या त्या त्या वैदिक हिंदुधर्मानं आत्मसात् केल्या, त्यामुळें एक मोठा स्वतंत्र धर्म या नात्यानं हिंदुस्थानांत बुद्धधर्माला कायमचं स्थान मिळणं अशक्य झालं. यांत बुद्धाचा मोठेपणा हिंदुस्थानाला कळला नाहीं असं सिद्ध होत नसून हिंदुधर्माची विशालता व सर्व संग्राहकता सिद्ध होते. अर्थात् यांत विषाद मानण्यासारखं कांहीं एक नाही. बुद्धानं जें कार्य केलं तें क्रांतीच्या स्वरूपाचं म्हणतां येईल. तो क्रांतिकारक होता धर्म संस्थापक नव्हता.”

‘सूफीझम’ वर सरसाहेबांनीं जें नुकतचं विवेचन केलं होतं. त्यांत त्यांच्या भाषेचं सामर्थ्य आणि अलौकिक बुद्धिमत्ता आम्हांला दिसली होती. परंतु प्रोफेसर वाडियांच्या भाषणावर केलेल्या या विदारक टीकेंत सरसाहेबांची समयसूचकता, स्वतःच्या मताबद्दलची दृढ श्रद्धा, आणि प्रतिपक्षाचं म्हणणं सरळ त्यांच्या गळयांत घालण्याचं व प्रतिपक्षाला चारी मुंड्या चीत करण्याचं त्यांचं वकिली कसब पाहून आम्ही चकित झालों. आतांहीं आपल्या विधानांच्या समर्थनार्थ सरसाहेब गीता–उपनिषदांतले श्लोक व वाक्यं धडाधड म्हणून दाखवीत होते. जणूं त्यांनीं ह्या प्रतिहल्ल्याची पूर्वतयारी घरीं केली होती.

सर सी. पी. भाषण संपवून खाली बसले तेव्हां टाळयाचा प्रचंड कडकडाट झाला, सर साहेबांचं भाषण श्रोत्यांना विलक्षण आवडलं होतं. विशेषतः ज्या आवेशानं त्यांनीं सनातन हिंदुधर्माची बाजू मांडली होती

तो आवेश पाहून श्रोते त्यांच्यावर बेहद्द खूष झाले होते. सर सी. पी. नीं सभा जिंकली. प्रो. वाडिया चेहरा पाडून बसले. खरं पाहतां शांतपणें विचार केल्यानंतर प्रो. वाडियांच्या भाषणांतील विधानं कांहीं सारींच चुकीचीं नव्हतीं. परंतु या दोघां विद्वांनां मधलीं हीं बौद्धिक कुस्ती आम्हांला फार आवडली. दोघांच्या उत्तरांत व प्रत्युत्तरांत सत्यासत्य काय असेल तें असो, परंतु त्यामुळें आम्हांला मात्र सर सी. पींच्या वक्तृत्वाचा आणखी एक अजब नमुना ऐकायला मिळाला होता व त्या आनंदांत आम्हीही खूप जोरानं टाळ्या पिटल्या.

पुढें त्रिवेंद्रमहून मद्रासला जावयास आम्ही निघालों तेव्हां वाडिया आणि प्रो. शरीफ ही मंडळी आमच्या डब्यांतच होती. गप्पांच्या ओघांत प्रो. वाडिया यांच्या व्याख्यानाचा सर सी. पी. नीं घेतलेला खरपूस समाचारही निघाला. तेव्हां आप्पा वाडियांना हसून म्हणाले, "एक शंका तुम्हांला विचारावीशी वाटते. विचारूं काय, "

वाडिया म्हणाले, " विचारा कीं, "

आप्पा म्हणाले, " सर सी. पीं. चं व्याख्यान समयस्फूर्त होतं कीं आधीं तयार केलेलं होतं ? साऱ्या सभेचा त्या दिवशीं समज झाला कीं सर सी. पी. आयत्या वेळेस बोलले. परंतु मला मात्र तसं वाटलं नाहीं. कारण तुमच्या व्याख्यानाला उत्तर द्यायसाठीं म्हणून सर सी. पीं.नीं खूपच टिपणं आणि उतारे काढून आणले होते. आणि म्हणून मला एक शंका आलेली आहे. "

प्रो. वाडियांनीं आपल्या जाड भिंगाच्या चष्म्यांतून आपले बटबटीत डोळे मोठे करीत विचारलं, " कोणची शंका बुवा ? "

" व्याख्यानाच्या आदल्या दिवशीं तुम्ही सर सी. पी. कडे जेवायला गेला होतां ना ? "

आप्पांच्या या प्रश्नाचा रोख न कळल्यामुळें वाडियांनीं डोळे आणखीनंच मोठे करून विचारलं, " होय, गेलों होतो. पण त्याचा काय संबंध ? "

" संबंध असा कीं जेवणाच्यावेळीं न कळत तुमच्या पोटांत शिरून

सर सी. पी. नीं तुमचं व्याख्यान तुम्हांला बडबडायला लावलं असलं पाहिजे आणि मग तुमचा धुव्वा उडविण्याची व्यवस्थित तयारी करून ते व्याख्यानाला आले असले पाहिजेत अशी माझी खात्री आहे. खरं कीं नाहीं ? बोला. ”

यावर डब्यांत खूपच हंशा पिकला. वाडिया इतकंच म्हणाले कीं, सर सी. पी. हिंदुस्थानांतील एक सर्वांत हुशार माणूस आहे ”

यावर सर सी. पींच्या हुशारीच्या म्हणजे वस्तादगिरीच्या गप्पा निघाल्या व त्रावणकोर संस्थानांतील ख्रिश्चन लोकांचा वरचश्मा मोडून काढण्यासाठीं सर सी. पी. नीं कोणकोणतीं हुशार कारस्थानं रचलीं त्यांच्या ऐकीव हकीगती प्रो. वाडिया व प्रो. शरीफ आम्हांला सांगू लागले.

त्रिवेंद्रममधले आमचे तीन दिवस किती आनंदात गेले होते ! बुधवारीं तत्त्वज्ञानाच्या परिषदेच्या उद्घाटनाचा अपूर्व सोहळा आम्हीं पाहिला, गुरुवारीं त्रिवेंद्रम शहरांतलीं प्रेक्षणीय स्थळं पाहिलीं आणि दोन अप्रतिम व्याख्यानं ऐकलीं. शुक्रवारीं राजवाड्यावर मेजवानीस गेलों आणि दरबारच्या नर्तकांचं अपूर्व नृत्य पाहिलं. परंतु या सर्व आनंदावर आमच्या केप कामोरिनच्या ट्रिपनं कळस चढणार होता व म्हणून तिकडे जायला कधीं निघतों असं आम्हांला झालं होतं. शनिवारीं—म्हणजे २२ तारखेला—सकाळीं उठून आम्ही त्रिवेंद्रमच्या बाजारपेठेंतून हिंडलों, संध्याकाळीं साडेचार वाजतां प्रो. दामले यांच्या व्याख्यानासहि हजर राहिलों; परंतु आमचं सारं चित्त कन्याकुमारीकडे लागलेलं होतं. व्याख्यान ऐकून आम्ही होस्टेलवर परतलों तेव्हां सहा वाजले होते. ट्रिपला निघणाऱ्या तिन्ही बसेस् पोर्चमध्यें येऊन उभ्या राहिल्या होत्या. आम्हीं नोकरांकरवीं आमचं सामान बसटॉपवर ठेवलं आणि बसमध्यें पुढच्या बाकावर जाऊन बसलों. बसचं इंजन छक्‌चक् वाजूं लागलं तशी माझीहि छाती आनंदानं धडधडूं लागली. कन्याकुमारीविषयीं ज्या सत्य कथा मीं ऐकल्या व वाचल्या होत्या त्या मला अद्भुतरम्य वाटल्या होत्या. केवळ हिंदुस्थानचंच नव्हे तर आशिया खंडाचं जें शेवटचं टोक, जिथं सूर्य व चंद्र एकाच क्षितिजावर

उगवतात आणि मावळतात, स्वामीविवेकानंदांचं जें स्फूर्तिस्थान, तें पाहण्यासाठीं निघालों असतां, आनंदानं, अद्भुताच्या भयानं माझी छाती धडधडावी यांत नवल कोणतं ? आमची बस त्रिवेंद्रम शहराबाहेर पडली आणि सिमेंट-कॉंक्रीटच्या सुंदर रस्त्यानं, जणूं पंखांवर उडाल्याप्रमाणं कन्याकुमारीचा मार्ग आक्रमूं लागली.

त्रिवेंद्रम ते कन्याकुमारी हा चोपन्न मैलांचा सिमेंटचा रस्ता त्रावणकोर संस्थानचं एक भूषणच आहे. इतका सुंदर व लांब असा हा रस्ता गर्द, सुरम्य, शीतल वनश्रीच्या गाभाऱ्यांतून गेला असल्यामुळं रस्त्याच्या दोन्ही बाजूंस पसरलेली सृष्टिशोभा पाहण्यांत आम्ही गुंग झालों. परंतु आम्ही तीस मैल गेलों असूं नसूं इतक्यांत तिन्हीसांजा टळल्या आणि जणूं एखाद्या रूपवतीनं आपल्या मुखावर बुरखा ओढावा त्याप्रमाणं ही सारी सृष्टिशोभा अंधाराच्या बुरख्याआड दिसेनाशी झाली. मात्र जिकडे तिकडे चांदणं अगदीं टिपूर भरलेलं असावं तसं आकाश उजळलं होतं. चहूंबाजूंस विलक्षण शांतता पसरली होती आणि उंचावरून समुद्रसपाटीकडे गाडी उतरत असल्यामुळें जत्रेंतल्या पाळण्यांत खाली झुकतांना जसं वाटतं तसं आम्हांला सारखं वाटत होतं. बाहेरची शोभा बंद झाल्यामुळं आंत आम्हां सर्व उतारूंची एकमेकांत बोलणीं जोरानं सुरू झालीं होतीं आणि मध्येंच एखाद्या लहान मोठ्या गांवाचा टप्पा आला की अड्ड्यावर जें जें कांहीं विकायला आलं असेल तें घेण्याची साऱ्यांची एकच घाई उडत असे. विकायला येणाऱ्या वस्तूंत विणलेल्या चटईच्या अगदीं छोट्या छोट्या—कुंकवाच्या करंड्याएवढ्या म्हणाना—परड्यांत भरलेले काजूगर मला फार गमतीचे वाटले.

आम्हांला वाटलं होतं कन्याकुमारी जवळ येऊं लागली की आम्हांला तें कळेल. दिवे दिसतील, समुद्र दिसेल, अशी कांहीं तरी कल्पना होती. परंतु दोन तासांच्या प्रवासानंतर आमच्या बसेस एकाएकी उभ्या राहिल्या आणि आमच्याबरोबरचे व्यवस्थापक म्हणाले, “ उतरा खाली ” आम्ही आश्चर्यानं विचारलं “आली कन्या कुमारी !” ते म्हणाले, “होय”

आम्ही आजूबाजूस पाहिलं तो एखाद्या अगदीं निर्जन ठिकाणीं आल्याचा भास होत होता. गडीमाणसं कंदील घेऊन आलीं व आम्हांला वाट दाखवूं लागलीं. चढ-उतराचा रेताड रस्ता तुडवीत आम्ही चालूं लागलों. आम्हां दोघांसाठीं 'केप' हॉटेलमध्यें जागा राखून ठेवल्या होत्या तिथं आम्ही पोंचलों तों जेवण तयारच होतं. जेवतांनासुद्धां आपण कन्याकुमारीस आलों आहों असा कांहीं विश्वास वाटेना. अत्यन्त एकान्त ठिकाणच्या एखाद्या डाकबंगल्यांत आपण येऊन उतरलो आहोंत असं वाटत होतं. फक्त समुद्राच्या लाटांचा धीरगंभीर आवाज सारखा चालू असलेला कानांवर येत होता. परंतु जेवण आटोपल्यावर दुसऱ्या मजल्यावरच्या गॅलरींत आम्ही जाऊन पाहतों तों एकदम केवढी विलक्षण शोभा आम्हांला दिसली ! दृष्टि जेथपर्यंत पोंचत होती. तेथपर्यंत दर्या पसरलेला होता व कांहीं वेळापूर्वीचें ढग आता विरळ होऊन चंद्रानं आपली चंद्रिका त्यावर उधळली होती. हा दर्या म्हणजेच हिंदी महासागर ! हॉटेल पुष्कळच उंचावर होतं. परंतु हॉटेलच्या जागेपासून तों अगदीं थेट लाटा फुटत होत्या तेथपर्यंत टप्प्याटप्प्यांनीं बांधलेल्या चिरेबंदी पायऱ्या दिसत होत्या. आम्ही निघालों आणि सावकाश पायऱ्या उतरून जवळजवळ समुद्रांतच जाऊन बसलों. तिथं बसल्यानंतरहि कन्याकुमारीचा भूगोल आमच्या लक्षांत येईना. सकाळीं उठल्यानंतर कोणत्या प्रकारचं स्थळ आपल्याला दिसणार आहे त्याची कल्पना करतां येईना. फक्त अथांग सागराच्या सहवासांत जी भव्यता मनाला जाणवते, तिचा अनुभव येत होता आणि याच्या भरीला आपण आपल्या मायदेशाच्या दक्षिणेकडील अंतिम टोंकावर बसलों आहोंत, आपल्या पाठीमागं अगदीं हिमालयपर्यंतचा खंडतुल्य हिंदुस्थान आहे आणि चार पावलं पुढं टाकली कीं आपली मायभूमि आपण सोडल्यासारखं होईल., अशी गंभीर जाणीव मनांत वरचेवर येत होती !

त्या सुखाचा कंटाळा येणें शक्यच नव्हतं. पण हॉटेलांतील दिवे विझूं लागले आणि आभाळांत ढग जमून थोडी झिमझिमहि सुरू झाली तेव्हां आम्ही उठलों आणि आमच्या खोलीवर गेलों. नोकर आमची वाटच

पाहात होता. तो इंग्रजींत म्हणाला, " लवकर उठलं पाहिजे साहेब. सूर्योदय पाह्यचा आहे ना ! " आम्ही म्हटलं, " वा ! पाह्यचा आहे ना म्हणजे ? आम्हांला हांक मार म्हणजे झालं. " कन्याकुमारीस सृष्टि-सौंदर्याचें भोक्ते येतात ते चंद्रोदय व सूर्योदय पाहण्यासाठीं ! चंद्रसूर्यांचे उदय हे एकाच क्षितिजावर झालेले जिथं दिसतात असं जगांतलं हें एकच ठिकाण आहे. आम्हांला कन्याकुमारीला येऊन पोचायला थोडा उशीर झाल्यांमुळं चंद्रोदय पाहण्याची संधि आम्ही गमावली होती. तेव्हां सूर्योदय पाह्यलाच पाहिजे असं घोकीत आम्ही निजलों !

अरुणोदयाच्या घटकेला नोकरानं दार ठोठावलं त्याबरोबर आम्ही ताडकन् उठून दाराशीं गेलों. आम्ही बाहेर जायची गर्दी करूं लागलों तेव्हां नोकर म्हणाला, " There will by no sunrise today. Sir," ( आज सूर्य उगवणार नाहीं, साहेब. ) त्याच्या त्या बोलण्यानं आम्ही थक्कच झालों ! आज सूर्य उगवणार नाहीं ? म्हणजे काय ? अरे, ज्या सूर्याला उगवतांना पाहण्यासाठीं आम्ही हजारों मैलांचा प्रवास करून मोठ्या आशेनं आणि उत्सुकतेनं या ठिकाणीं आलों तो आज उगवणारच नाहीं ? आम्हीं गोंधळून दारांतच उभे राहिलों !


★



*

# ५

" साहेब, आज सूर्य उगवणार नाहीं ! " या वेटरच्या इंग्रजी वाक्यानें आम्ही चकित होऊन जागच्या जागीं क्षणभर उभे राहिलों होतों. त्याच्या त्या चमत्कारिक घोषणेचा अर्थच आमच्या लक्षांत येईना ! परंतु मग हॉटेलच्या मागच्या गॅलरीकडे आऊन आम्हीं जेव्हां आभाळाकडे दृष्टि टाकली तेव्हा तो अर्थ आमच्या तात्कडतोब लक्षांत आला. बाहेर झिमझिम पाऊस पडत होता. आभाळांत ढगांची दाटी झाली होती. दूरच्या क्षितिजाची रेषा कोणती तें दाट धुक्यामुळं कळत नव्हतं. जवळचीं झाडं आणि त्यापलीकडे पसरलेला हिंदी महासागर यांखेरीज कांहींच दिसत नव्हतं. अशा स्थितींत सूर्य उगवलेला दिसणार कसा ! " There will be no sunrise today ! " ( आज सूर्योदय होणार नाहीं ) या आमच्या वेटरच्या



मीनाक्षी मंदिराचा कळस, मदुरा.

त्या चमत्कारिक बातमीचा अर्थ इतकाच होता, कीं सूर्योदय झालेला दिसणार नाहीं. याप्रमाणं वेटरच्या बोलण्याचं कोडं उलगडलं; पण आमची निराशा व्हायची ती झालीच !

काल रात्रीं आम्हांला केप कामोरीनला येऊन पोचायला उशीर झाला होता म्हणून चंद्रोदय पाहण्याची आमची संधि गेली आणि आज या धुक्यामुळं आणि पावसामुळं सूर्योदय पाहण्याच्या आनंदाला आम्ही मुकलों होतों. वास्तविक कन्याकुमारीला जाण्याचा आदर्श काल म्हणजे चैत्री पौर्णिमा. या पौर्णिमेला एकीकडे सूर्यास्त होत आहे आणि दुसरीकडे चंद्रबिंब उगवत आहे. असं अपूर्व दृश्य या ठिकाणीं पाहायला मिळतं. हिंदुस्थानच्या पूर्वेचा बंगालचा उपसागर व पश्चिमेकडचा अरबी समुद्र या दोहींचा संगम हिंदी महासागरांत होत असल्यामुळें पूर्व–पश्चिम अशीं दोन्ही क्षितिजं ज्या ठिकाणीं एकदम दृष्टीच्या टप्यांत येतात असं कन्याकुमारीचं टोक हें एक जगांतलं एकच स्थळ आहे. इतर कुठंहि न दिसणारा सूर्यास्त–चंद्रोदयाचा दुहेरी सोहळा पाहण्यासाठीं दूरदूरचे लोक या ठिकाणीं येतात. आम्ही कांहीं चैत्री पौर्णिमेला गेलों नव्हतों, त्यामुळं वर्षांतून एकदाच येणारी ही पर्वणी आम्हांला साधतां येणार नव्हती. तथापि सूर्यास्त आणि सूर्योदय यांची शोभा वेगवेगळी का होईना आम्ही पाहूं शकूं, अशी आमची अपेक्षा होती. परंतु ती अपेक्षा आतां लयाला गेली होती.

माणूस एखाद्या सुखाला पारखा झाला कीं त्याच्या खालोखाल किंमतचं दुसरं सुख कोणतं मिळण्यासारखं आहे तें त्यानं पाहावं असं एक सुभाषित आहे. सुभाषित आहे म्हणजे माणसाचा मनोधर्मच तसा आहे. त्यामुळं आम्हीं मनाशीं विचार केला, कीं चंद्र–सूर्याच्या उदयास्तांवर ताबा चालविणारीं पौराणिक काळांतील मोठीं माणसं कांहीं आपण नव्हे; तेव्हा "अरे! सूर्योदय पाहयला मिळाला नाहीं!" असं हळहळत बसण्यापेक्षां ती मजा नाहीं तर दुसरी कोणती मजा करतां येईल ती करूं या. साऱ्या दिशा ढगांनीं आणि धुक्यानं भरल्या आहे, पावसाच्या बारीकबारीक धारा पडत आहेत,

अशा पहाटेच्या वेळीं समुद्रकांठावरून सहल करण्याचा आणि लहर आल्यास समुद्रस्नान करण्याचा आनंद काय कमी म्हणावयाचा ? या विचारानं आम्हीं ताबडतोब टॉवेल वगैरे कपडे घेतले. आणि हॉटेलमधून बाहेर पडून डोक्यावर झिमझिम पाऊस खुशाल घेत समुद्राच्या तीरा-कडे निघालों.

आम्ही ज्या रस्त्यानं चाललों होतों तो रस्ता कन्याकुमारीच्या मंदिरा-कडे गेला होता. रस्त्याच्या एका बाजूला डाक बंगल्यासारख्या दिसणाऱ्या कांहीं इमारती आणि गांवाची तुरळक लोकवस्ती दिसत होती. दुसऱ्या बाजूला किनारा पसरला होता. दूरवर समुद्रांत स्वामी विवेकानंदांची शिला दिसत होती. या शिलाखंडावर बसून चिंतन करीत असतां त्यांना हिंदु-धर्मांचा प्रचार करण्यासाठीं अमेरिकेस जाण्याचा साक्षात्कार झाला म्हणतात! या शिलाखंडाच्या पायथ्याशीं लाटा उसळत होत्या, फेसाळत होत्या व अलीकडे कांहीं अंतरावर कांहीं मंडळी समुद्रस्नान करीत होती. कन्या-कुमारीच्या समुद्रस्नानानं चौदा तीर्थांत स्नान केल्याचं पुण्य लागतं म्हणतात; म्हणून भाविक स्त्री पुरुष ही पुण्यसंपादनाची संधि कधीं दवडीत नाहींत. आम्ही किनारा ओलांडून समुद्रांत शिरलों. आतां आम्ही हिंदु-स्थानच्या टोकाशीं उभे होतों. आमच्या डाव्या–उजव्या बाजूंनीं पूर्व-पश्चिम किनाऱ्यांच्या वाकड्यातिकड्या रेषा वरच्या बाजूस गेलेल्या दिसत होत्या आणि दृष्टीसमोर अथांग दर्या पसरला होता. एक प्रचंड लाट वेगानं धावत आली आणि आम्ही मागं सरकणार इतक्यांत आम्हांला नखशिखान्त भिजवून पार पळाली देखील. मीं खालीं पाहिलं तों आमच्या पायाखाली माणकासारखी तांबडीलाल वाळू पसरली होती. असली तांबडी तेजस्वी वाळू मी प्रथमच पाहात होतें. मी खाली वाकून ओंजळीमध्यें ती वाळू घेतली आणि एखाद्या विभूतीच्या चरणधुळीमुळं अंतःकरण कृतज्ञतेनं, भक्तीनं भरून यावं त्याप्रमाणं माझ्या देशाचे ते चरणरज हातांत धरल्यावर माझं अंतःकरण गहिवरून आलं.

महासागराच्या त्या खट्याळ लाटांशीं हुतूतूचा खेळ मनमुराद खेळून

स्नान-आटोपून—आम्ही कन्याकुमारीच्या मंदिराकडे निघालों तेंव्हां दिवस पुरता उजाडला होता. आकाश स्वच्छ झालं होतं आणि कोवळं सूर्यबिंब बरंच वर चढलेलं दिसत होतं. देऊळ अगदीं समुद्रालगतच आहे आणि देवळाच्या आवाराभोंवती उंच तटबंदी भिंत बांधलेली आहे. आम्ही मुख्य दरवाजापाशीं आलों तेव्हा दाराशीं एक शिपाई उभा होता. माताजीचं दर्शन घ्यायचं असेल तर स्नान केलं पाहिजे आणि पुरुषांनीं फक्त कमरेच्या वस्त्राशिवाय बाकीचे कपडे काढले पाहिजेत असं त्यानं सांगितलं. आमचं स्नान आटोपलंच होतं. आप्पांनीं सूटबूट काढून कमरेभोंवतीं टॉवेल गुंडाळला आणि आम्ही मंदिराच्या आवारांत प्रवेश केला. चारी बाजूंनीं मोठमोठ्या दगडी ओवऱ्या बांधलेल्या आम्हांला दिसल्या. थिटेथिटे वाटणारे दगडी खांब, फरसबंद जमिनीचे व ठेंगड्या दगडी कडीपाटाचे गाभाऱ्याच्या चारी बाजूंचे, चिंचोळे लांबलचक सभा-मंडप वगैरेचं बांधकाम हजारों वर्षांपूर्वींच्या एखाद्या लेण्याप्रमाणं आम्हांला वाटलं. पर्वतांच्या पहाडांत खोदलेल्या अजिंठ्याच्या लेण्यांमध्यें प्रवेश केल्यानंतर जो निर्जन शुकशुकाट, एकांत आम्हांला आढळला, तसलंच वातावरण कन्याकुमारीच्या समुद्रकिनारीं बांधलेल्या या प्राचीन देवालयांत आम्हांला आढळलं. सभामंडपांतून आम्हीं मंदिराच्या गाभाऱ्यांत दर्शना-साठीं आतां थोडे स्त्री-पुरुष जमले होते. आम्हीहि त्यांच्यांत मिसळलों.

गाभारा बराच मोठा होता. देवीच्या देव्हाऱ्यापासून गाभाऱ्याच्या दारा-पर्यंत दोन कठडे लावले होते व त्याला रेलून, वाकून आम्ही देवीची मूर्ति पाहात होतों. गाभाऱ्यांतल्या कोंदट हवेंत जीव घुसमटत होता. वर्षानुवर्ष तेलपाणी सांडल्यामुळं पायांखालची जमीन चिकट, तेलकट लागत होती. पुजाऱ्यानं आरती पेटविली तेव्हा निरांजनांच्या सौम्य प्रकाशांत कन्याकुमारीची मूर्ति मला स्पष्ट दिसली. कन्याकुमारीची मूर्ति फार सुंदर आहे. मदुरेच्या मीनाक्षीप्रमाणं उजव्या हातांत अलंकार घेऊन डावा हात कमरेवर ठेवून कन्याकुमारी उभी होती. पुजाऱ्याच्या आरतीमधे आम्हीं दोन रुपये टाकले. त्यानं मुद्दाम एक वेताची लहानशी टोपली आणवली व त्यामध्यें नारळ,

फुलं, कुंकू वगैरे प्रसाद घालून ती आम्हांला दिली. देवीचा प्रसाद घेऊन आम्ही सभामंडपांत आलों. प्रदक्षिणेच्या निमित्तानं देऊळ चौफेर पाहिलं आणि बाहेरच्या आवारांत आलों. चारी बाजूंच्या ओवऱ्या व ओटे रिकामेच होते. चुकून कुठंतरी एखादा दाढीवाला बैरागी तीन दगड मांडून बसलेला दिसे.

आम्ही विश्रांतीसाठीं एका ओवारीच्या कट्ट्यावर बसलों. इतक्यांत एक म्हातारा बैरागी आमच्याजवळ आला आणि विचारूं लागला, "तुम्ही महाराष्ट्रीयन काय?" तो बैरागीहि महाराष्ट्रीयनच होता. त्यानं आपलं नांव शिवरामबुवा असं सांगितलं. आपण लोकमान्य टिळकांच्या सहवासांत कांहीं दिवस होतों असं त्यानं सांगतांच आम्हांला त्याच्याविषयीं अधिक उत्सुकता वाटूं लागली. त्यानं जवळ जवळ वीस वर्षं या मंदिरांत काढलीं होतीं. त्याच्या संन्यासमार्गाचा इतिहास कांहीं नवीन नव्हता; परंतु त्यानं सांगितलेली देवी कन्याकुमारीची कथा मात्र मला मनोरंजक वाटली. मदुरेच्या मीनाक्षीचं सुरस चमत्कारिक चरित्र ऐकल्यापासून 'स्त्रियश्चरित्रम्' हें अर्धं सुभाषित मला पटलं होतं. तेव्हां कन्याकुमारीचं चरित्र शिवरामबुवा सांगूं लागला तें मी उत्कंठेनं ऐकूं लागलें.

कैलास पर्वतावर भगवान शंकर आपली पत्नी उमा हिच्याबरोबर राहात होते. मयासुराची स्त्री पुष्पकाशी शंकराच्या निवासस्थानीं आली आणि तिनं शंकराची तपस्या आरंभली. आनंदाश्रूंचा अभिषेक, हास्याचीं पुष्पं, श्वासाचा गंध, कायेचा धूप, शब्दांचा नैवेद्य आणि दृष्टीचीं निरांजनं वगैरे साधनांनीं पुष्पकाशीनं शंकराची तीन युगंपर्यंत पूजा केली. अखेर शंकर प्रसन्न झाले व त्यांनीं "वर माग" असं तिला म्हणतांच तिनं वर मागितला, "हे भगवान! सृष्टीची उत्पत्ति, तिचं पालन आणि तिचा संहार आपल्याच हातीं आहे. माझी एकच इच्छा आहे, कीं सृष्टीच्या संहारकालीं आपल्याशीं क्रीडा करण्याचं सुख मला मिळावं." शंकरानं अर्थातच हा वर तिला दिला व संहारकालापर्यंत दक्षिण समुद्राच्या किनाऱ्यावर तप करीत बसण्याची तिला सूचना केली. त्याप्रमाणं कन्याकुमारी सृष्टीच्या

C983

संहाराची व आपल्या वरप्राप्तीची वाट पाहात एका हातांत पुष्पहार घेऊन या ठिकाणीं उभी आहे. तिच्या या तपस्येचा किंवा कौमार्याचा भंग करण्याचा प्रयत्न बाणासुरानं केला. परंतु त्या प्रयत्नांत त्याला यश मुळींच आलं नाहीं. उलट कन्याकुमारीच्या खड्गानं त्याचा बळी घेतला व या राक्षसाला मारून सृष्टीचं संकट हलकं केलं.

कन्याकुमारीची चरित्र-कहाणी ऐकून मला मोठी मौज वाटली व अजून तिच्या चरित्रावर चित्रपट कसा घेतला गेला नाहीं याचं नवल वाटलं. शंकर, उमा, कन्याकुमारी हा कथेचा प्रसिद्ध त्रिकोनी सांगाडा व बाणासुरासारख्या खलपुरुषाची त्यांत भर असल्यावर चित्रपट बावन आठवडे चाललाच पाहिजे !

आम्ही कन्याकुमारीचं देवालय पाहून बाहेर पडलों तेव्हां नऊ वाजले असावे. गांवांतल्या बाजारपेठेंत 'आठवण' म्हणून कांहीं वस्तु खरेदी करण्याच्या हेतूनं आम्ही देवळासमोरच्याच एका गल्लींत शिरलों. या गल्लींत दोन्ही बाजूंनीं चिमुकलीं दुकानं होतीं; परंतु त्यांत देवीचे छापील फोटो व स्थलमाहात्म्याचीं चोपडीं यांपलीकडे कांहींच नव्हतं. आम्ही एक दोन रस्ते हिंडून पाहिले; परंतु मोठीं दुकानं आढळलीं नाहींत. अखेर जवळच कोळ्यांच्या वस्तींत सुंदर शंख–शिंपले मिळतात अशी कुणी माहिती दिल्यावरून आम्ही कोळ्यांच्या झोपड्यांकडे निघालों. गांवापासून महारवाडा थोड्या अंतरावर असावा त्याप्रमाणं कोळ्यांच्या लहानलहान झोपड्या गांवापासून थोड्या अंतरावरच होत्या. ही वस्ती घाणेरडी होती. झोपड्या अगदीं लहान व अस्वच्छ होत्या. ठिकठिकाणों उकिरडे सांठले होते व ते विसकटत कोंबड्या फिरत होत्या. आम्ही मधल्या पाऊलवाटेनं या वस्तींत शिरलों तेव्हां कच्च्या मासळीचा दर्प नाकांत शिरला. झोपड्यांत सामसूम होतं परंतु आमची चाहूल लागतांच प्रत्येक झोपडींतून म्हाताऱ्या कोताऱ्या बायका आणि पोरं धावत आमच्याभोवतीं जमा झालीं व आपल्या हातांत ओटयांत आणलेल्या शंख, कवड्या, शिंपा दाखवून आपल्या भाषेंत एकच कल्ला करूं लागलीं. अशा परिस्थितींत सौदा करणं शक्य नव्हतं.

अखेर दोन शंखमाला आम्हीं खरेदी केल्या आणि कसेबसे त्या कोळयांच्या जाळयांतून बाहेर पडलों व सरळ रस्त्यानं केप हॉटेलकडे जाण्याऐवजीं समुद्रकिनाऱ्यावरून रमतगमत चालू लागलों. केप कामोरीनच्या समुद्रांतली वाळू रंगीबेरंगी आहे. मघाशीं मीं तांबडी वाळू पाहिली होती; परंतु आतां ब्रशानं पट्टा ओढावा त्याप्रमाणं प्रत्येक मोठी लाट किनाऱ्यावर कधीं सोनेरी तर कधीं जांभळ्या तर कधीं तांबड्या वाळूचा पट्टा ओढून परत जाई. सोनेरी, जांभळी व तांबडी वाळू मी मुद्दाम हातरुमालांत निरनिराळी बांधून घेतली. प्रत्येक सुंदर दृश्य असं हातरुमालांत बांधून घरीं नेतां येईल तर किती बहार होईल, असा विचार कन्याकुमारीच्या सौंदर्यावर लुब्ध झालेल्या माझ्या मनांत वरचेवर येत होता. वाळूंत, रेंताडांत उगवलेली सुंदर पिवळी तांबडी फुलं आठवण म्हणून माझ्या डायरींत ठेवण्यासाठीं मी खुडून घेतलीं. केपचा निमुळता त्रिकोनी किनारा, त्यापलीकडे उसळणारा प्रचंड महासागर, कन्याकुमारीच्या देवालयाची शोभा, ह्या साऱ्या विशाल आठवणीं लहान लहान फुलांच्या, शंखशिंपल्यांच्या रूपानं जणूं मी सांठवीत होतें.

आम्ही केप हॉटेलवर पोचलों तेव्हां अकरा वाजून गेले होते. उन्हाची तिरीप लागत होती व उष्मा वाढला होता. हॉटेलांत अगदीं सामसूम होतं. आमच्या बरोबरची सर्व डेलिगेट्स मंडळी दुसऱ्या एका बंगल्यांत उतरली होती. या बंगल्याच्या पाठीमागच्या अंगणांत आचाऱ्यांनीं मोठी रसोई उघडली होती, व एखाद्या लग्नसमारंभात रिकामटेकडे पाहुणे वादविवाद, पत्ते, गाणीं, वगैरे करमणूकींत वेळ घालवितात त्याप्रमाणें, मद्रासी, गुजराथी, व हिंदी डेलिगेटस एकीकडे खाद्यपेयांवर ताव मारतां मारतां दुसरीकडे जिवाची मनसोक्त करमणूक करून घेत होते. स्त्री-डेलिगेट्स साठीं जवळच्याच एका बंगल्यांत उतरण्याची सोय होती. केपहॉटेलमध्यें मात्र आम्ही दोनचार मंडळीच उतरलों होतों. त्यामुळें शेसवाशे स्त्री-पुरुषांबरोबर येऊनही हवी असणारी शांतता व स्वातंत्र्य आम्हांला भरपूर मिळालं होतं. या हॉटेलमध्यें आमची व्यवस्थाही बादशाही थाटाची होती. एक प्रशस्त बेडरूम, तिला लागूनच, पोशाखाची खोली, स्नानगृह, एवढा

तीन खोल्यांचा सबंध ' सूट ' च आमच्या ताब्यांत होता. शिवाय लहर लागेल तेव्हां ऐष आरामांत समुद्राची शोभा पाहतां यावी म्हणून एक प्रशस्त दिवाणखाना होता. त्याच्या भिंतींना मोठमोठ्या खिडक्या होत्या, व त्यां लगतच कोच मांडलेले होते. समुद्रस्नान आटोपून परतल्यावर आम्ही या दिवाणखान्यांत विश्रांति घेतली. " जेवण तयार आहे " असा निरोप घेऊन वेटर आला तेव्हां तळमजल्यावरच्या जेवण्याच्या खोलींत आम्ही गेलों. आमचं टेबल तयार होतंच. आम्ही जेवण्यास सुरवात केली; इतक्यांत बेटी हायमन आमच्या टेबलापाशीं कुठून कुणास ठाऊक प्रगट झाली व " मी बसूं का इथें ? " असं विचारूं लागली. अर्थात् आम्ही तिला बसा म्हटलं. बेटीच्या रूपानं मूर्तिमंत करमणूकच आमच्या पंक्तीला येऊन बसली होती. सुरवातीच्या संभाषणांत बेटीनं सिलोन युनिव्हर्सिटी-मधील स्वतःचा प्रोफेसरचा हुद्दा, व स्वतःचा संस्कृत विषयाचा व्यासंग, त्याबद्दल स्वतः लिहिलेले कांहीं ग्रंथ वगैरे माहिती सांगितली. परंतु पुढें जेवणाबरोबर बेटीही गप्पांच्या रंगात आली व अखेर आपल्या जातीवर गेली. म्हणजे एखाद्या हौशी स्त्रीप्रमाणें साड्या, झगे वगैरे बद्दल माझ्याशीं बोलूं लागली. तिला माझ्या नेट जॉर्जेटच्या साड्या फार आवडल्याचं तिनं पुनःपुन्हा सांगितलं, तेव्हां मीही तिला म्हटलं,

" राजवाड्यावर पार्टीच्या वेळीं तुम्ही जो गाऊन घातला होता तो तुम्हांला फार शोभून दिसत होता. "

यावर बेटीनं असे कांहीं मुरके मारले कीं कांहीं विचारूं नका. मला खूपच हसूं आलं. पण तें कांहीं तिचा तो अभिनय पाहून नव्हे तर पार्टीच्या वेळीं बेटीच्या झग्याची जी दशा उडालेली मी पाहिली ती आठवून. बेटीचा तो झगा पायघोळ होतांच परंतु मागच्या बाजूला एखाद्या राणीच्या झग्याप्रमाणें त्याला ' ट्रेन ' होती व बेटी चालूं लागली कीं तिच्या पावलांपाठीमागें चांगली फूटभर लांब झग्याची किनार लोळत असे. पुढें पार्टीची गर्दी उसळली तेव्हां जो तो बेटीच्या झग्याच्या किनारीवर पाय देऊं लागला व थोडयाच वेळांत झग्याच्या मागच्या बाजूच्या त्या

नाजूक लेसच्या चिंधड्या उडाल्या. बेटीच्या लक्षांत ही गोष्ट आली तेव्हां एखाद्या बाईनं पुढचे ओचे आवरून धरावे त्याप्रमाणें कमरेमागें हाताच्या मुठींत झग्याचा घोळ उचलून धरून बेटी वावरूं लागली होती. तें विनोदी दृश्य आतां आठवल्यामुळेंच मला हसूं लोटलं होतं.

ऑमलेटचा मोठा घास काट्यावर तोलून अलगद तोंडांत घालून बेटीनं काटेचमचे प्लेटींत ठेवले व डोक्यावर जणूं भला मोठा गवताच्या भारा धरावा तसे हात पसरून ती मला म्हणाली,

"एवढी मोठी हॅट आहे माझी. पण मी ती घरीं सिलोनला ठेवून आलें."

वेटरनं अननसाचं पुडिंग आणलं तेव्हां साहजिकच तिच्या गप्पा थंडावल्या. आमचं जेवणही लवकरच आटोपलं. आम्ही उठणार इतक्यांत वेटर आप्पांच्या कानांत हलकेच म्हणाला,

"साहेब आपल्याला शंख पाहिजेत ना? मी गांवांतून आणवले आहेत."

वेटरनं ट्रेमधून बरेचसे शंख, कवड्या व शिंपले आणले व आमच्यापुढें धरले. आम्ही एक नारळाएवढा रुपेरी शंख घेतला व बेबी रोहिणीसाठीं रंगीबेरंगी कवड्या व शिंपलेही खरेदी केले.

जेवण आटोपून आम्ही वर दिवाणखान्यांत गेलों तेव्हां साडेबारा झाले होते. एक वाजतां आमच्या मोटारी परत त्रिवेंद्रमकडे निघणार होत्या. मधला वेळ कसा घालवावा याची कांहीं पंचाईत नव्हती. सूर्याच्या वाढत्या तेजाखालीं तळपणाऱ्या त्या महासागराची शोभा पाहावी तितकी अपुरीच वाटण्यासारखी होती. सूर्य आतां आकाशाच्या मध्यावर आला होता. परंतु वर आकाशांतल्या सूर्याचं तेज अधिक कीं रुप्याच्या तप्त रसाप्रमाणं सळसळणाऱ्या त्या जलाशयाचं तेज अधिक असा भ्रम मनाला पडत होता! सागराच्या पृष्ठभागावर खवल्यांसारखं दिसणारं लाटांचं नक्षीकाम, कुठं फिका निळा तर कुठं हिरवा असे मनोहर रंग, लांबच लांब अशा वांकड्यातिकड्या किनाऱ्याशीं सतत झुंज खेळणाऱ्या, दुधा-

सारखा शुभ्र फेस उडविणाऱ्या लाटा–हें सर्व पाहून मन आनंदानं भरून जात होतं. खालीं अंगणांत झाडाच्या सावलींत खुर्ची टाकून बेटी हायमन बसली होती. परंतु सागराची शोभा पाहण्याऐवजीं आपल्या पर्समधला छोटा आरसा वरचेवर पुढं धरून त्यांत आपला चेहरा पाहण्यांत ती गुंतली होती.

एक वाजतां मोटारी हॉटेलपुढच्या रस्त्यावर येऊन उभ्या राहिल्या. आम्ही तयार होतोंच. आमचं सामान वेटरनं खालीं नेऊन मोटारींत ठेवलं होतं. आम्ही क्षणभर त्या खोलींत घुटमळून उभे राहिलों. आयुष्यांतली अविस्मरणीय एक रात्र व अर्धा दिवस जिथं आम्हीं घालवला, ती खोली सोडतांना मनाला किती अवघड वाटत होतं ! आम्ही खालीं आलों, वेटरना बक्षिशी दिली, त्यांचा निरोप घेतला. "पुन्हा या" असं आग्रहाचं बोलावणं त्यांनीं केलं, त्याला "होय' हि म्हटलं आणि बसमधें आमच्या जागेवर जाऊन बसलों. पंधराएक मिनिटांत बसेस सुरू झाल्या. शरिरानं आम्ही कन्याकुमारीपासून दूर चाललों होतो; परंतु माझं मन मागं रेंगाळत होतं. ज्या सागराची शोभा आम्हीं अनिमिष नेत्रांनीं पाहिली त्याकडे व भारतवर्षाच्या दक्षिण टोंकाला एकाकी उभ्या असणाऱ्या कन्याकुमारीच्या मंदिराकडे माझी दृष्टि पुनः पुन्हा वळत होती.

कन्याकुमारीपासून कांहीं मैल गेल्यावर डाव्या बाजूच्या प्रदेशांत दूरवर एक गोपूर दिसूं लागलं. हें गोपूर सुचिंद्राच्या देवालयाचं होतं. सुचिंद्राचं मंदिर फार प्रेक्षणीय आहे म्हणतात. मंदिराचं द्रविडीयन बांधकाम, स्तंभ, गोपुरं म्हणजे प्राचीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुनाच असं समजलं जातं. परंतु तें मंदिर पाहण्याइतका अवधि आम्हांला नव्हता.

आतां भर दुपार होती. रस्त्याला एकसारखी चढण होती. मोटारीचं इंजन तापूं लागलं होतं, आणि उन्हाच्या झळा खिडकींतून आंत शिरत होत्या. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं डोंगराळ मुलूख पसरलेला होता. मधून मधून तलावाचं पाणी पसरलेलं दिसे. वरचेवर नारळी पोफळींची दाट बनं दृष्टीस पडत त्यामुळें उन्हाचा ताप किंचित् कमी वाटे, परंतु कन्या-

कुमारीहून परत फिरल्यावर प्रथमच प्रवासाचा शीण जाणवूं लागला होता. आदल्या रात्रीं कन्याकुमारीकडे आमच्या मोटारी धांवत होत्या त्या वेळीं मनाला वाटणारी अधीरता, उत्सुकता आतां या परतीच्या प्रवासांत पार नाहींशी झाली होती. मनाची ओढ नाहींशीं झाली होती, व एक प्रकारची उदासवाणी शिथिलता मनाला आली होती. तास दीड तासांत सुमारे पावणेतीन वाजतां आम्ही पद्मनाभपुरम् येथील राजवाडा पाहाचा बेत ठरलेला होता.

अठराव्या शतकांत महाराजा मार्तंडवर्मा यांची पद्मनाभपुरम् ही राजधानी होती. त्या काळांत बांधिलेल्या या राजवाड्याचं केरळ-शिल्प-सौंदर्य फारच प्रेक्षणीय व ऐतिहासिक दृष्ट्या मौल्यवान समजलं जातं. या राजवाड्याचं बांधकाम आम्हांला ब्रम्ही पद्धतीचं वाटलं. ब्रम्ही पॅगोडाप्रमाणं छपराची रचना असलेला हा चार मजली राजवाडा अत्यंत प्रशस्त वाटला. राजवाड्याची दारं, कमानदार खिडक्या, तुळया, कपाटं, ठिकठिकाणीं ठेवलेले मंचक, आसनं, पलंग वगैरेंचं लाकडी कोरीव काम फारच अप्रतिम होतं. एका दिवाणखान्यांत त्रावणकोर राजघराण्याचा समग्र इतिहास दर्शविणारीं चित्रं भिंतीवर रंगविलेलीं दिसलीं. तीं इतकीं सुंदर होतीं, कीं तीं पाहण्यांतच आम्ही रमून गेलो. ' पुंथम डॅमवर उभा राहिलेला मार्तंडवर्मा, ' ' रविवर्म्याची मारेकऱ्याच्या तावडींतून सुटका, ' ' १७३१ चा कट ' वगैरे ग्रुप पेंटिंग्स फारच सुंदर होती. आम्हीं ती चित्रं पाहण्यांत गुंतलो, पण त्यामुळं आमची व इतर मंडळींची चुकामूक झाली. आम्ही शिलालेखांचा हॉल, मूर्तींचा हॉल वगैरे हॉलमधून चटकन् दृष्टि फिरवून पुढं गेलेल्या मंडळींना गाठावं म्हणून घाईनं राजवाड्याबाहेर पडणार इतक्यांत कोणीसं विचारलं, " तुम्ही दुसऱ्या मजल्यावरचं घड्याळ पाहिलं का ? फारच गमतीदार आहे. " हें ऐकल्यावर आम्ही मागं फिरलो व सरळ दुसऱ्या मजल्यावर गेलो. घड्याळाचीं यंत्रं ज्या माळयावर मांडलेलीं होतीं, तिथं जाण्यासाठीं अरुंद, उभीं शिडी होती ती चढून आम्ही वर गेलों. तिथं घड्याळजीनं आम्हांला घड्याळाची यंत्ररचना समजावून

सांगितली. तीनशें पन्नास वर्षांपूर्वी पद्मनाभपूरम् एथील एक लोहार स्पेनला गेला होता. तिथून घड्याळाच्या यंत्राची माहिती शिकून परत आला व त्यानं हें घड्याळ तयार करून बसवलं. लांबच लांब साखळ्या आणि वजनं लावून घड्याळाचे कांटे फिरावेत अशी योजना तयार केलेली होती. या घड्याळाचे ठोके खूप लांबवर ऐकूं जातात असं घड्याळजी म्हणाला. साडेतीनचा ठोका ऐकण्याची माझी फार इच्छा होती, परंतु बाहेर बसचा हॉर्न वाजूं लागला. आम्ही घाई घाईनं राजवाड्याबाहेर पडलों व कशीबशी बस गांठली.

पद्मनाभपुरम् ते त्रिवेंद्रमचा प्रवास एरवी इतका कंटाळवाणा झाला नसता. परंतु एका गोष्टीमुळें त्या प्रवासाची आठवण कायमची राहिली. आमच्या मागच्याच सीटवर एक हिंदी कविवर्य बसले होते. आतांपर्यंत ते नुसतं गुणगुणत होते. परंतु पद्मनाभपुरम् सोडल्यानंतर त्यांनीं आपल्या कविता खड्या गळयानं म्हणण्यास सुरवात केली. त्यांच्या शेजारीच बसलेले त्यांचे दोस्त 'वाहवा' 'अहाहा' अशा उद्‌गारांनीं त्यांना अधिकच भडकवूं लागले. पुढेंपुढें तर रुक्ष आवाजांतला हा कविविलाप आम्हांला असह्य वाटूं लागला. एकीकडून उन्हाच्या झळा व दुसरीकडून या कविराजांचा गळा यांत आमचा चोळामोळा होऊन गेला. अखेर कविराजांचं काव्यगायन बंद पाडण्याची एक युक्ति पुढच्या बाकांवर बसलेल्या दोन सिलोनी विद्यार्थिनींनीं शोधून काढली. त्यांनीं एकदम खड्या आवाजांत "दूर हटो ये दुनियावाले हिंदुस्थान हमारा है" हें फिल्मी गाणं म्हणावयास सुरवात केली. तें संपल्यावर आझाद हिंद फौजेचं मोर्चा गीत त्यांनीं सुरू केलं. या दोन रणदुंदुमी सुरू झाल्यावर मात्र कविराज जे गप्प झाले ते अखेरपर्यंत.

●

त्रिवेंद्रमच्या युनिव्हर्सिटी होस्टेलवर आम्ही पोचलों तेव्हां बरोबर पांच वाजले होते. सहाच्या गाडीनं बहुतेक प्रतिनिधी मंडळी त्रिवेंद्रम सोडणार होती. त्यांच्यासाठीं पावणेसहा वाजतां बसेस स्टेशनवर जाणार होत्या. आम्हांला दुसरे दिवशीं सकाळीं साताच्या गाडीनं मद्रासला जायचं होतं.

कुमारीहून परत फिरल्यावर प्रथमच प्रवासाचा शीण जाणवूं लागला होता. आदल्या रात्रीं कन्याकुमारीकडे आमच्या मोटारी धांवत होत्या त्या वेळीं मनाला वाटणारी अधीरता, उत्सुकता आतां या परतीच्या प्रवासांत पार नाहींशी झाली होती. मनाची ओढ नाहींशीं झाली होती, व एक प्रकारची उदासवाणी शिथिलता मनाला आली होती. तास दीड तासांत सुमारे पावणेतीन वाजतां आम्ही पद्मनाभपुरम् येथील राजवाडा पाह्यचा बेत ठरलेला होता.

अठराव्या शतकांत महाराजा मार्तंडवर्मा यांची पद्मनाभपुरम् ही राजधानी होती. त्या काळांत बांधिलेल्या या राजवाड्याचं केरळ-शिल्प-सौंदर्य फारच प्रेक्षणीय व ऐतिहासिक दृष्ट्या मौल्यवान समजलं जातं. या राजवाड्याचं बांधकाम आम्हांला ब्रम्ही पद्धतीचं वाटलं. ब्रम्ही पॅगोडाप्रमाणं छपराची रचना असलेला हा चार मजली राजवाडा अत्यंत प्रशस्त वाटला. राजवाड्याची दारं, कमानदार खिडक्या, द्रुळया, कपाटं, ठिकठिकाणीं ठेवलेले मंचक, आसनं, पलंग वगैरेंचं लाकडी कोरीव काम फारच अप्रतिम होतं. एका दिवाणखान्यांत त्रावणकोर राजघराण्याचा समग्र इतिहास दर्शविणारीं चित्रं भिंतीवर रंगविलेलीं दिसलीं. तीं इतकीं सुंदर होतीं, कीं तीं पाहण्यांतच आम्ही रमून गेलो. 'पुंथम डॅमवर उभा राहिलेला मार्तंडवर्मा,' 'रविवर्म्याची मारेकऱ्याच्या तावडींतून सुटका,' '१७३१ चा कट' वगैरे ग्रुप पेंटिंग्स फारच सुंदर होती. आम्हीं ती चित्रं पाहण्यांत गुंतलो, पण त्यामुळं आमची व इतर मंडळींची चुकामूक झाली. आम्ही शिलालेखांचा हॉल, मूर्तींचा हॉल वगैरे हॉलमधून चटकन् दृष्टि फिरवून पुढं गेलेल्या मंडळींना गाठावं म्हणून घाईनं राजवाड्याबाहेर पडणार इतक्यांत कोणीसं विचारलं, "तुम्ही दुसऱ्या मजल्यावरचं घड्याळ पाहिलं का ? फारच गमतीदार आहे." हें ऐकल्यावर आम्ही मागं फिरलो व सरळ दुसऱ्या मजल्यावर गेलो. घड्याळाचीं यंत्रं ज्या माळ्यावर मांडलेलीं होतीं, तिथं जाण्यासाठीं अरुंद, उभीं शिडी होती ती चढून आम्ही वर गेलों. तिथं घड्याळजीनं आम्हांला घडयाळाची यंत्ररचना समजावून

सांगितली. तीनशें पन्नास वर्षांपूर्वी पद्मनाभपूरम् एथील एक लोहार स्पेनला गेला होता. तिथून घड्याळाच्या यंत्राची माहिती शिकून परत आला व त्यानं हें घड्याळ तयार करून बसवलं. लांबच लांब साखळ्या आणि वजनं लावून घड्याळाचे कांटे फिरावेत अशी योजना तयार केलेली होती. या घड्याळाचे ठोके खूप लांबवर ऐकूं जातात असं घड्याळजी म्हणाला. साडेतीनचा ठोका ऐकण्याची माझी फार इच्छा होती, परंतु बाहेर बसचा हॉर्न वाजूं लागला. आम्ही घाई घाईनं राजवाड्याबाहेर पडलो व कशीबशी बस गांठली.

पद्मनाभपुरम् ते त्रिवेंद्रमचा प्रवास एरवी इतका कंटाळवाणा झाला नसता. परंतु एका गोष्टीमुळें त्या प्रवासाची आठवण कायमची राहिली. आमच्या मागच्याच सीटवर एक हिंदी कविवर्य बसले होते. आतांपर्यंत ते नुसतं गुणगुणत होते. परंतु पद्मनाभपुरम् सोडल्यानंतर त्यांनीं आपल्या कविता खड्या गळयानं म्हणण्यास सुरवात केली. त्यांच्या शेजारीच बसलेले त्यांचे दोस्त 'वाहवा' 'अहाहा' अशा उद्गारांनीं त्यांना अधिकच भडकवूं लागले. पुढेंपुढें तर रुक्ष आवाजांतला हा कविविलाप आम्हांला असह्य वाटूं लागला. एकीकडून उन्हाच्या झळा व दुसरीकडून या कवि-राजांचा गळा यांत आमचा चोळामोळा होऊन गेला. अखेर कविराजांचं काव्यगायन बंद पाडण्याची एक युक्ति पुढच्या बाकांवर बसलेल्या दोन सिलोनी विद्यार्थिनींनीं शोधून काढली. त्यांनीं एकदम खड्या आवाजांत "दूर हटो ये दुनियावाले हिंदुस्थान हमारा है" हें फिल्मी गाणं म्हणा-वयास सुरवात केली. तें संपल्यावर आझाद हिंद फौजेचं मोर्चा गीत त्यांनीं सुरू केलं. या दोन रणदुंदुमी सुरू झाल्यावर मात्र कविराज जे गप्प झाले ते अखेरपर्यंत.

●

त्रिवेंद्रमच्या युनिव्हर्सिटी होस्टेलवर आम्ही पोचलों तेव्हां बरोबर पांच वाजले होते. सहाच्या गाडीनं बहुतेक प्रतिनिधी मंडळी त्रिवेंद्रम सोडणार होती. त्यांच्यासाठीं पावणेसहा वाजतां बसेस स्टेशनवर जाणार होत्या. आम्हांला दुसरे दिवशीं सकाळीं साताच्या गाडीनं मद्रासला जायचं होतं.

परंतु पहाटे उठून स्टेशनवर जाण्याची दगदग टाळण्यासाठीं आम्ही आमचं सामानसुमान आवरलं, व इतर प्रतिनिधींबरोबर सहा वाजतांच स्टेशनवर दाखल झालों. होस्टेल सोडून निघालों त्यावेळीं गुजराथी मेसमधल्या नोकरांनीं आम्हांला मोठ्या प्रेमानं निरोप दिला. महाराजांनीं तर मिठाईचं भलं मोठं पार्सलच आमच्या हातांत दिलं. होस्टेलच्या आवाराबाहेर आमच्या मोटारी पडल्या तरी देखील आमची दृष्टि वरचेवर मागें वळत होती. ज्या ठिकाणीं चार दिवस आनंदांत घालविले त्या ठिकाणीं मन रेंगाळू पहात होतं. स्टेशनच्या इमारतींत दुसऱ्या मजल्यावर उतारूंसाठीं 'रिटायरिंग रूम्स' मिळतात. त्यांपैकीं एक खोली आम्ही रिझर्व केली होती, व आणखी एक रात्र या सुंदर शहरांत घालवायला मिळणार या गोष्टीमुळें मनाला थोडा विरंगुळा वाटत होता. आम्ही साडेसहाच्या सुमारास स्टेशनवरील रिटायरिंगरूममधें दाखल झालों. कन्याकुमारीच्या प्रवासाचा शीण घालविण्यासाठीं आम्ही आतां अगदीं दिवे लागणी झाली होती तरी स्नान केलं आणि त्रिवेंद्रमचा निरोप घेण्यासाठीं जणूं बाहेर पडलों.

कोणत्याही मोठ्या शहराच्या रेल्वे स्टेशनापुढें असावं तसं मोठं प्रशस्त आवार त्रिवेंद्रमच्या स्टेशनापुढें आहे. आतां रात्र पडल्यामुळें या आवारांत जिकडे तिकडे दिवे लागले होते. अलिकडे कांहीं स्टेशनांवर जी एक विचित्र तांबूस पिवळसर असल्या प्रकाशाची तऱ्हा सुरू केलेली आहे—व जिच्यांत माणसांचे चेहरे महा भयंकर दिसतात, आणि जिचा मला अगदीं तिटकारा वाटतो—तसली प्रकाशाची तऱ्हा येथें नव्हती. उलट प्रकाश भरपूर परंतु डोळ्यांना जाचणार नाहीं आणि प्रसन्न होता. आम्हीं दिवसांपूर्वी जेव्हां रात्रीच्या याच प्रहराच्या सुमारास त्रिवेंद्रमच्या स्टेशनावर प्रथम दाखल झालों तेव्हां निवासस्थान गांठण्याच्या घाईपुढें इकडे तिकडे दृष्टि टाकण्यास आम्हांला सवडच झाली नव्हती. परंतु आतां आम्हांला घाई नव्हती. वेळेचं बंधन नव्हतं. चैनींत रेंगाळत हिंडण्यासाठींच आम्ही बाहेर पडलों होतों. त्यामुळें स्टेशनाच्या पोर्चमधून

शहराकडे जाणाऱ्या रस्त्यानं चालूं लागल्यावर आम्ही आधीं भोंवतालचा देखावा पाहून घेतला. मी कांहीं फारसा प्रवास केलेला नाहीं, परंतु जो केला आहे त्यावरून मीं असं ठरवलं आहे कीं गांवें दोन प्रकारची असतात. ज्यांच्या स्टेशनांपुढचा देखावा गलिच्छ आणि बकाली असतो अशीं, आणि उलट ज्यांच्या स्टेशनांपुढें प्रशस्त स्वच्छ आणि आकर्षक असा देखावा दिसतो अशीं. त्रिवेंद्रम शहर या दुसऱ्या वर्गांत खात्रीनं मोडेल. या स्टेशनापुढच्या आवाराचा विस्तार कांहीं अतिशय मोठा नाहीं. परंतु भोंवतालच्या इमारती, बस कंपनीचं तिकिट ऑफिस, त्याला लागूनच असलेली गर्द झाडीनं भरलेली लहानशी मोकळी जागा, आणि शहराकडून एका बाजूनं येऊन स्टेशनावरून कन्याकुमारीकडे जाणारा रुंद डांबरी रस्ता, या साऱ्या गोष्टी इतक्या कांहीं स्वच्छ आणि नीटनेटक्या आहेत कीं नवख्या पाहुण्याला आपलं हार्दिक स्वागत झाल्यासारखं वाटतं.

हें दृश्य बघत बघत आम्ही शहराकडे जाणाऱ्या रस्त्यानं निघालों. आम्हांला पाहतांच झटकेवाले आणि रिक्षावाले पुढें आले. परंतु आम्हांला त्यांचीं वाहनं नकोच होतीं. पायीं सहल करण्याच्याच हेतूनं आम्ही निघालो होतो. पहिल्या मुख्य चौकांत आल्यावर आम्हांला चार दिवस ओळखीचा झालेला रस्ता दिसला. हा रस्ता म्हणजे युनिव्हर्सिटी होस्टेलकडून येऊन पद्मनाथाच्या मंदिराकडे जाणारा. हें मंदिर पाहाण्याचं आमचं राहिलंच होतं. म्हणून आम्ही डाव्या अंगाला वळून मंदिराच्या दिशेनं चालूं लागलों. रात्र नुकतीच सुरू झाली होती, परंतु रहदारीला ओहोटी चागली होती. त्रिवेंद्रम शहराला लवकर झोपीं जाण्याची सवय दिसली. आजूबाजूच्या दुकानांत शिरावं, एखादी चांगली वस्तू दिसली तर विकत घ्यावी, असा उद्योग आम्ही सुरू केला. हस्तीदंताच्या वस्तू नारळाच्या सोलाच्या अगदी बारीक तंतूंचे जोंधळ्याएवढाले कुसरीचे दाणे बनविलेल्या माळा, आणि चटईच्या लहानमोठ्या पिशव्या, करंड्या इत्यादि मालच या दुकानांतून मुख्यत्वेंकरून होता. एका अगदीं छोट्या दुकानांत चिकणमातीच्या तऱ्हेतऱ्हेच्या मूर्ती मांडलेल्या दिसल्या. त्यांतला

एक भटजी आम्हांला फार आवडला. त्याची मूर्ति मोठी कलाकुसरीनं कोरली होती असातला भाग नाहीं, परंतु त्यांच्याकडे पाहताच हसूं यावं अशी त्याची बैठक होती म्हणून. त्याच्या आखुड मांड्या, त्याच्या उजव्या हातांत दिलेला लहानसा लाडू, गणपतीसारखं त्याचं लंबोदर, त्याच्या उघड्या अंगावरचं जानवं, कपाळाचं गंध, सबंध अंगाला दिलेला फिकट निळसर रंग आणि गुळगुळीत तासलेलं त्याचं डोकं, हा सारा अवतार पाहिल्याबरोबर हसूं लोटणं अपरिहार्य होतं. बेबीच्या खेळण्याच्या एकंदर सरंजामांत ही स्वारी शोभेल अशा हेतूनं आम्ही या भटजीबोवांची खरेदी केली. मोठ्या प्रयासानं हे महाराज आम्ही मृत्यूच्या तावडींतून परवांपर्यंत वाचविले होते. परंतु अखेर आमचं लक्ष नव्हतं अशावेळीं बेबीनं आणि तिच्या मैत्रिणींनीं त्याच्या पोटांत किती लाडू आहेत तें पाहण्याचा प्रयोग केला आणि भटजी महाराजांचा निकाल लागला. बेबीला वाटलं नाहीं इतकं आम्हांला वाईट वाटलं. कारण त्रिवेंद्रमची एक विनोदी आठवण नाहींशीं झाली.

पद्मनाथाचं देवालय पाहण्याचं आम्ही ठरविलं होतं. परंतु देवळाकडे जाणाऱ्या लहानशा रस्त्यांत शिरून आम्ही जेमतेम मंदिराच्या प्राकारांत शिरलों आणि परत फिरलों. आमची कल्पना होती कीं देवालयांत रोषनाई असेल. पण तसं कांहींच नव्हतं. शिवाय देवालयाचीं गोपुरं किंवा कळस विशेष भव्य नाहींत असंही आमच्या लक्षांत आलं. म्हणून पद्मनाभाला त्याच्या गाभाऱ्यांत शिरून तसदी देण्याऐवजी आम्ही सभामंडपाच्या बाहेरूनच नमस्कार ठोकला व परत मोठ्या रस्याला लागलों.

आता दुतर्फाच्या दुकानांकडे आमचं लक्ष विशेषसं नव्हतं. कारण त्यांत शिरून माल पाहण्याची अगर विकत घेण्याची आमची हौस आम्ही आधींच भागविली होती. म्हणून एकीकडे गेल्या चार दिवसांतल्या गोष्टींच्या आठवणी एकमेकांत काढीत बोलत बोलत आम्ही रस्त्यानं चाललों होतों. त्या तशा चालण्यांतही फार सुख होतं, आकाशांत वर आलेल्या मोठ्या चंद्रमंडळाच्या टिपूर प्रकाश आणि रस्त्यावर आणि दुकानांतल्या विजेच्या

दिव्यांचा प्रकाश यांनीं उजळून निघालेल्या अत्यंत स्वच्छ, शांत आणि प्रशस्त राजरस्त्यानं हिंडत हिंडत गप्पा मारण्यांत मौज होती. गेल्या पांच दिवसाच्या मुक्कामांत जें जें आवडलं तें तें आम्ही एकमेकांना जणूं नव्या गप्पा मारल्याप्रमाणें सांगत होतो, आणि आज आमच्या या सफरीला एक वर्षाहून अधिक दिवस होऊन गेले तरी त्रिवेंद्रमचा विषय निघाला कीं किती बोलूं आणि किती नको असं मला तरी होतं. त्रिवेंद्रम शहर एका पहिल्या दर्जाच्या संस्थानाची राजधानी या दृष्टीनं आदर्श वाटण्यासारखं आहे. इथें राजधानीचं वैभव आणि आधुनिक शहराचे सारे आधुनिक थाट यांचं मोहक मिश्रण झालेलं आहे. साऱ्या इमारती, सारे बगीचे आणि सार्वजनिक विहाराच्या साऱ्या जागा चित्रासारख्या दिसाव्या अशा स्वच्छ, सुशोभित ठेवल्या आहेत. महाराजांच्या आणि राजघराण्यांतील इतर मंडळींच्या सन्मानार्थ प्रजाजनांची हास्यास्पद धावपळ आणि मुजऱ्यांची धांदल तर येथें आम्हांला कधींच दिसली नाहीं; परंतु सर्वांना आपल्या राजाविषयीं व देशाविषयीं विलक्षण अभिमान वाटत असल्याचं आम्हांला वरचेवर दिसून आलं. येथील विद्यार्थीवर्गांत इतर प्रांतांतील विद्यार्थ्यांप्रमाणें पुष्कळ जागृति झाली आहे. परंतु त्यांच्या ठिकाणीं महाराजांविषयीं विलक्षण आदर आहे, आणि शिष्टाचार आणि नम्रता हे दोन गुण इतर कुठल्याही तरुणांत आढळले नाहींत इतक्या प्रमाणांत या तरुणांत आम्हांला दिसले. परिषदेला इतके पाहुणे आलेले, परंतु कुठें गोंधळ नाहीं, गडबड नाहीं, बाचाबाची नाहीं, सारे कार्यक्रम अगदीं वक्तशीर पार पडत होते व त्याचं श्रेय या तरुण स्वयंसेवकांनाच खचित होतं.

अशा कित्येक गोष्टींची एकमेकांत चर्चा करीत चालतां चालतां आमच्या एकदम लक्षात आलं कीं स्टेशनापासून आम्ही चांगले अडीच मैल दूर आलों आहोंत. एवढा पल्ला पायीं परत गांठायचा म्हटलं तर तास-सव्वातास सहज लागणार होता. शिवाय त्रिवेंद्रमच्या बस सर्व्हिसची मजा आम्ही अजून घेतलेली नव्हती. म्हणून आही एका बसमध्यें चढलों आणि

लाकडी फळीच्या बाकावर बसलों. मुंबईच्या मानानं या बसेस अगदीं सामान्य आहेत. परंतु त्यांतही चक्कर मारण्यांत आम्हांला त्यावेळीं गम्मत वाटली. स्टेशनच्या चौकांत आम्ही उतरलों. एका उडुपी हॉटेलांत जेवण केलं, आणि मग रिटायरिंगरूमवर परत आलों तेव्हां अकरा वाजून गेले होते.

सकाळीं साताच्या गाडीनं आम्हीं त्रिवेंद्रम सोडलं. वरकलाइ, कोईलॉन, कुंडारा, टेनमलाइ स्टेशनं घेऊन आमची गाडी दुपारीं एक वाजतां शंकोटा स्टेशनांत उभी राहिली. त्रिवेंद्रमहून बरोबर घेतलेली मेवामिठाई आम्हीं केव्हांच खलास केली होती व भूक इतकी लागली होती, कीं स्टेशनवरचा केळीच्या पानांत गुंडाळलेला दहीभात आम्हीं आवडीनं खाल्ला. संध्याकाळीं आठाच्या सुमारास आमची गाडी मदुरा स्टेशनांत आली. मदुरेच्या महाराष्ट्रमंडळाचे सभासद आम्हांला भेटण्यासाठीं आले होतें. आम्ही तंजोरला यावं अशी त्यांची फार इच्छा दिसली; परंतु “पुन्हा केव्हांतरी अवश्य येऊं” असं सांगून त्यांचं समाधान करणं आम्हांला भाग होतं. गाडीनं मदुरा स्टेशन सोडलं आणि दुसरे दिवशीं सकाळीं सात वाजतां आमची गाडी मद्रास स्टेशनांत शिरली. स्टेशनवर आमचे स्नेही शेषय्या आलेच होते. त्यांच्या घराजवळच थंबुचेट्टी रोडवरील मोठ्या हॉटेलांत त्यांनीं आमची उतरण्याची सोय केली होती. आम्हीं खोलींत सामान टाकलं आणि नोकरानं आणून ठेवलेला चहा घेणार इतक्यांत हळूहळू स्नेही मंडळी जमूं लागली. मद्रासच्या महाराष्ट्र समाजाचे श्री. जोशी, मानेगांवकर आलेच होते; परंतु विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे ‘त्रिवेणी’चे संपादक श्री. रामकोटीश्वर राव यांचा व माझा नवा परिचय झाला. आप्पांचा व त्यांचा स्नेह संपादक लेखक या नात्यानं खूपच होता. परंतु आम्ही तिघंहि एकत्र येण्याचा हा योगायोग पहिलाच होता. जोशी मानेगांवकरांचे आप्पांच्या व्याख्यानाचे व सत्काराचे बेत एकीकडे चालले होते. मद्रास येथे चारपांच दिवस राहण्याचा आमचा पूर्वीचा बेत आम्हीं बदलून फक्त दोनच दिवस राहण्याचं आम्हीं ठरविलं होतं; त्यामुळं वेळ थोडा व कार्यक्रम फार अशी पंचाईत होऊन बसली होती.



कथाकलि नृत्यांतील सुष्ट दुष्ट पात्रांचे वेष

उदयशंकरच्या 'कल्पना' चित्रपटासाठीं मुंबइचे श्री. पार्श्वनाथ आळतेकर सध्यां मद्रासमध्यें आहेत असं आम्हांला कळतांच आम्ही त्यांना भेटण्यासाठीं शहरालगतच्याच मैलापूर या वसाहतींतल्या 'हर्मिटाज' या बंगल्यावर गेलों. बंगल्यांतील पुढच्या हॉलमध्येंच श्री. पार्श्वनाथ आळतेकर बसले होते. फार दिवसांनी एकमेकांना भेटल्यामुळं ती भेट फारच आनंदाची झाली. "उद्यां सकाळीं श्री. उदयशंकर चित्रपटाच्या तालमी घेणार आहेत, तुम्ही अवश्य या," असं आळतेकरांनीं आमंत्रण दिलं. उदयशंकरचं नांव मी माझ्या लहानपणापासून ऐकत आलें होतें. त्यांच्या दर्शनाची पूर्वी कधींहि न लाभलेली उद्यां अशी अचानक संधी लाभलेली पाहून मला अतिशय आनंद झाला.

आम्हीं श्री. आळतेकरांचा निरोप घेतला आणि बसनं सुमारें साडेअकराच्या सुमाराला हिंदुस्थानांतलं थिऑसफी पंथाचं पवित्र केंद्र "अड्यार" येथें पोंचलों. अड्यार हें थिऑसफीचं केंद्र असलं तरी या वसाहतीची रचना एखाद्या अमेरिकन वसाहतीप्रमाणं आधुनिक घरांची वाटली. आम्ही गेलों तेंव्हा थिऑसफी पंथाची जागतिक कॉन्फरन्स चालू होती व त्यासाठीं हिंदुस्थानच्या चारी दिशांहून व परदेशांतून आलेल्या थिऑसफिस्ट स्त्री-पुरुषांनीं वसाहतीचे नीटनेटके रस्ते गजबजलेले होते. ठिकठिकाणीं झालरी-झालरींचे शामियाने, राहुट्या उभारल्या होत्या. चित्रकलेचीं, हस्तव्यवसायाचीं प्रदर्शनं उघडलीं होतीं व थिऑसफी कॉलेजच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी कँटीनवजा उपहारगृहं चालविलीं होतीं. मुख्य इमारतींतील जगप्रसिद्ध लायब्ररी पाहाण्यासारखी आहे. लायब्ररीनजिकच्या प्रशस्त दिवाणखान्यांतील भिंतीवरून लाओ त्झ, नानक, गौतमबुद्ध, वगैरे धर्मसंस्थापकांचीं तैलचित्रं टांगलेलीं आहेत. ॲनी बेझंटचा शुभ्र पुतळा, ब्लावेत्स्की, ॲलकूट यांचे पुतळे व विशेषतः हॉलच्या मध्यभागीं लहान बालकाला खांद्यावर घेऊन उभ्या राहिलेल्या बालिकेचा पुतळा आम्हांला फारच आवडला. या हॉलमध्यें चारी भिंतींलगत सर्व देशांचीं निशाणं लावलेलीं आम्हांला दिसलीं नि हिंदुस्थानचं निशान म्हणून 'युनि-



८

यन जॅक’ फडकत असलेलं पाहून आम्हांला मोठी शरम वाटली! अड्यारमध्यें जो तास दीड तास आम्हीं घालविला त्यावरून थिऑसफी पंथाच्या प्रचाराची व कार्याची आम्हांला बरीचशी कल्पना आली. अड्यारमध्यें मंडळींनीं आमचं जें आदरातिथ्य केलं, जे नवीन परिचय झाले व थिऑसफी पंथाच्या अनुयायांचं जें संमिश्र संमेलन आम्हीं पाहिलं, त्यावरून त्यांच्यामध्यें आधुनिक विचारसरणी, नीटनेटकेपणा, रसिकपणा आणि नम्रता आम्हांला दिसून आली व आमचा आदर वाढला. अड्यारचा प्रसिद्ध ‘बनियन’ वृक्ष (वटवृक्ष) पाहून आम्हांला मोठं आश्चर्य वाटलं व मदुरेच्या हजार खांबांच्या हॉलची आठवण झाली. मूळ वृक्षापासून फुटलेल्या पारंब्यांतून अनेक वृक्ष वाढल्यामुळं एका वृक्षापासूनच्या या अनेक वृक्षांचा एक विस्तर्ण मंडपच बनला होता; या वृक्षांच्या शीतल छायेंत स्त्रीपुरुष हिंडतफिरत होते, खाद्यपेयं घेत होते.

आम्ही अड्यारहून थंबुचेट्टी रोडवर आमच्या हॉटेलांत परतलों तेव्हां दोन वाजून गेले होते. जेवण आटोपून आतां संध्याकाळपर्यंत विश्रांति घ्यायची असं मी ठरवलं होतं; परंतु जेवण आटोपतांक्षणींच आप्पांना कोणीं सांगितलं, कीं मद्रासच्या सुप्रसिद्ध चेपॉक ग्राउंडवर क्रिकेटची मॅच चालू आहे, आप्पा एकदम निघाले. मलाहि क्रिकेट फार आवडतं असं मी नेहमीं अवसान आणीत असतें. परंतु मद्रासच्या बसेसमधून मैलन् मैल भटकल्यामुळं मी भयंकर थकलें होते व क्रिकेटप्रेमाचं ओढून आणलेलं चंद्रबळ नाहींसं झालं होतं!

चेपॉक ग्राउंडवरची मॅच पाहून आप्पा परतले तेव्हां उरलेली सारी संध्याकाळ मद्रासच्या मुख्य रस्त्यांतून व बाजारपेठांतून भटकण्यांत घालविली. नाताळ चालू असल्यामुळं जिकडे तिकडे विजेच्या दिव्यांची रोषनाई केलेली होती. दुकानांत व रस्त्यांत स्त्रीपुरुषांची अतोनात गर्दी उसळली होती.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्हीं ‘हर्मिटाज’वर गेलों तेव्हां तालमीची सर्व तयारी झाली होती. हॉलमध्यें एका बाजूला बऱ्याचशा मुली व

दुसऱ्या बाजूला बरेचसे तरुण मुलगे वाट पहात बसले होते. भिंतीलगत एक छोटसं टेबल व खुर्च्या मांडल्या होत्या. टेबलाच्या एका बाजूला साथ–संगतीची वादक मंडळी बसली होती. या ऑर्केस्ट्रामधें तऱ्हेतऱ्हेची नवी जुनी वाद्यं मला दिसलीं. सरोद, सरस्वती वीणा, सतार, तबला, पखवाज, ढोल, चायना गॉंग, शंख, सिंबल्स, बासरी, क्लॅरिओनेट, फिडल, दिलरुबा वगैरे मिळून तीस बत्तीस वाद्यांचा ताफा तयार होता, व तालीम लवकरच सुरू होणार होती म्हणून ही सर्व साथीदार मंडळी खुंट्या पिळून तबले ठोकून, सूर मिळविण्याची तयारी करीत होती. टेबलाच्या दुसऱ्या बाजूस पाहुण्या प्रेक्षकांसाठीं खुर्च्या मांडलेल्या होत्या. या खुर्च्यांवर आम्ही बसलों. पांचदहा मिनिटांतच व्हरांड्याकडील बाजूनं दोन व्यक्तींनीं हॉलमध्यें प्रवेश केला व त्या लगबगा टेबला मागील खुर्च्यांवर जाऊन बसल्या. त्यांपैकीं एक उदयशंकर व दुसऱ्या त्यांच्या पत्नी अमला नंदी ! उदयशंकरांचं नांव मी फार दिवसापासून ऐकत होतें परंतु त्यांना पाहण्याची संधि यापूर्वी मला मिळाली नव्हती. त्यामुळें त्यांना पाहतांना मला मोठं कुतुहल वाटत होतं. त्यांनीं जो पोषाख केला होता तो त्यांच्या व्यवसायाला शोभेल असाच होता. त्यांनी अंगांत पिवळ्या रंगाचा बिनबाह्याचा रेशमी खमीस घातला होता, व मोठ्या काठाचं धोतर काचा मारून ते नेसले होते. त्यांची गौरवर्ण मुद्रा हिरव्या निळसर डोळ्यांमुळें भेदक दिसत होती. त्यांच्या पत्नी अमलादेवी सकच्छ साडी नेसल्या होत्या, मात्र महाराष्ट्रीय पद्धतीनं नव्हें तर केवळ नृत्याच्या हालचालीला सोयिस्कर व शोभून दिसेल अशा तऱ्हेनं त्यांनी कास घातली होती. विशेषत: अमलादेवींच्या केशभूषेकडे माझं लक्ष गेलं. मानेपासून मस्तकाच्या मध्यापर्यंत निमुळता लांबट अंबाडा बांधून त्यावर फुलांची वेणी त्यांनीं घातली होती. अमलादेवी वर्णानं काळ्यासावळ्याच आहेत परंतु त्यांचे रेखीव नाकडोळे व त्यांच्या फुलासारख्या हलक्या हालचाली यामुळें त्या मला फारच आकर्षक वाटल्या.

उदयशंकर व अमलादेवी दोघंही खुर्चीवर बसलीं. टेबलावर कोपरं

टेकून, लांबसडक बाहूंचे नाजूक पंजे एकमेकांवर घाशीत किंचित्, उंच घोगऱ्या आवाजांत समोर बसलेल्या मुलांमुलींना उदयशंकर म्हणाले, " ओराइट " उदयशंकर यांच्या तोंडून पुन: पुन्हा निघणारा हा उद्गार म्हणजे एका जगविख्यात कलावंताची गंमतीची लकब ( mannerism ) म्हणून लक्षांत ठेवण्याची इच्छा मला झाली असती. परंतु आधी मद्रास शहरांत ट्रॅममधून हिंडतांना तिकिट विक्री करणारा कंडक्टर पुन:पुन्हा हीच " ओराइट " अशी आरोळी ड्रायव्हरला देत असे ती माझ्या कानी पडली होती. त्यावेळेस कंडक्टरकडून ड्रायव्हरला पुन्हा पुन्हा मिळणाऱ्या 'ओराइट' अशा त्या हुकुमाच्या अर्थाचा मला कांहीं केल्या तर्क करतां आला नव्हता. उदयशंकर यांच्या तोंडून आतां तो उद्गार ऐकल्यावर त्याचा अर्थ माझ्या एकदम ध्यानांत आला आणि मी स्वत:शीच खूप हसलें व मनाशी म्हणालें, " ओराइट " म्हणजे ' ऑल राइट ' काय ! मद्रासी लोकांनी बनविलेला हा अपभ्रंश लक्षात ठेवण्यासारखा आहे खरा !

उदयशंकरनीं तालीम घेण्यास सुरवात केली. ते सांगूं लागलें, " कल्पना करा, तुमच्यासमोर समुद्रांत एक नाव हेलकावे खाते आहे. हळूहळू समुद्रांत वादळ सुरू होत आहे. नावेचे हेलकावे वाढत आहेत. त्या भयंकर वादळांत ती चिमकुली नाव टिकाव धरणं कठीण दिसूं लागलं आहे. नावेंत बसलेले तुमचे नातेवाईक ' धावा, वांचवा ! ' अशा आरोळ्या देत आहेत, आक्रोश करीत आहेत. आणि हां हां म्हणतां तुमच्या दृष्टीसमोर ती नाव तुमच्या प्रियजनांसह समुद्रांत गडप झाली आहे. अशा वेळीं तुम्हीं सारेजण काय कराल ? तुमच्या मनांत काय विचार येईल ? तुमच्या हातून काय गोष्टी घडतील ? विचार करा. अभिनय करूं नका. फक्त विचार करून ठेवा काय अभिनय करायचा त्याचा, अन् मी सांगेन तेव्हां अभिनय करा. "

पांच मिनिटं थांबून त्यांनी मुलांमुलींना विचारलं, " रेडी ? " आणि मग ते संगीत-वादकांकडे वळले आणि म्हणाले, " ओराइट." त्याबरोबर एकदम संगीत सुरू झालं. त्याच्या मंद मंजुळ लयकारीवर एक युवक

नौकानृत्य करूं लागला आणि त्याच्याकडे किनाऱ्यावर उभे राहिलेले ते मुलगे आणि मुली माना उंचावून, हातरुमाल उडवून, जणू नौकेंतल्या आपल्या आप्तेष्टांना निरोप देण्याचा अभिनय करूं लागलीं. इतक्यांत संगीतांतला ढोल वाजूं लागला. विजेसारखे कर्कश स्वर निघूं लागले. सिंबलसचा थरकाप ऐकणाऱ्याच्या हृदयापर्यंत पोचला. वादळ सुरू झालं. नौका डगमगूं लागली. आणि किनाऱ्यावर उभ्या राहिलेल्या जमावाच्या तोंडावरचं हास्य मावळलं! नौकेचे हेलकावे वाढले तशी किनाऱ्यावरचा घबराट वाढला. नौका गटंगळ्या खाऊं लागली तशी किनाऱ्यावरचा जमाव पुढं सरकला. कांहीं मुलींनी एकमेकींना मिठया मारल्या आणि आक्रोश करूं लागल्या. एक धाडकन् मूर्च्छित होऊन पडली, एकीनं डोळे झाकून घेतले, एकीनं मोठी किंकाळी फोडली. पुरुषांपैकीं एक दगडासारखा निश्चल उभा राहिला, दुसरा तोंड झाकून हुंदके देऊं लागला, तिसरा इतरांच्या गळीं पडला, बाकीचे सारे त्या नौकेंतल्या आपल्या नातेवाइकांकडे पाहात ओरडूं लागले, हातवारे करूं लागले. अखेर नौका बुडाली! आणि तें भयानक दृश्य उघड्या डोळ्यांनी पाहणारा तो जमाव हताश होऊन उभा राहिला. संगीत थांबलं.

" ओराइट. " उदयशंकर म्हणाले एकंदर तालीम सुंदर झाली होती. परंतु कांहीं मुलामुलींना त्यांच्या चुका समजावून देऊन ते म्हणाले, " रेडी! "

पुन्हा एकदा याच प्रसंगाची तालीम झाली.

उदयशंकरांची तालीम घेण्याची पद्धत मला फार आदर्श वाटली. अभिनय पढविण्यापेक्षा स्वयंस्फूर्तीनंच तो विद्यार्थ्यांना सुचावा अशा पद्धतीनं ते शिकवीत होते. उदयशंकरांच्या नृत्यकौशल्याविषयीं व ' शोमन ' म्हणून त्यांचं नांव मीं फार ऐकलं होतं. परंतु आता त्यांची शिकवण्याची पद्धत आणि त्यामागचं चातुर्य, नावीन्य, कल्पकता पाहून त्यांच्याविषयीचा माझा आदर द्विगुणित झाला.

" नाऊ द गर्ल्स! " उदयशंकर म्हाणाले. त्याबरोबर साऱ्या मुली पुढं झाल्या आणि मुलगे बाजूला जाऊन बसले. उदयशंकरच्या हाताखाली याहून

देखण्या मुली असावयस पाहिजे होत्या असं माझ्या मनांत आलं. त्या पांचपंचवीस मुलींत देखण्या अशा एकदोनच निघाल्या असत्या. बाकीच्या अगदीं एखाद्या ख्रिश्चन बोर्डिंगांतून आणलेल्या पोरींप्रमाणं दिसत होत्या! या मुलींनी रास, होरी, मणिपुरी, रंगपंचमी व महालक्ष्मी वगैरे नृत्यांचे कांहीं भाग करून दाखविले. नंतर मुली बाजूला झाल्या व मुलगे पुढं आले. या मुलांनी ढोलकनृत्य खड्गनृत्य, नागनृत्य, आसामी नृत्य वगैरे प्रकार एकेका मिनिटांत संपवले. नंतर मुलांमुलींनी मिळून "पदवीदान समारंभ" या विषयावर आधारलेलं नृत्य करून दाखविलं. कथा कादंबऱ्यांतून कलेपेक्षा प्रचार केला जावा अशीं मतं ठोकून देणारांना असलीं प्रचारकी थाटाचीं नृत्यं दाखवलीं पाहिजेत. म्हणजे प्रचाराच्या ओझ्याखालचं एक गाढव एवढाच कलेचा हास्यास्पद अर्थ कसा शिल्लक राहतो तें त्यांना स्पष्ट दिसेल.

उदयशंकर यांच्या पत्नी अमला यांचंहि थोडसं नृत्य आम्हांला पाहायला मिळालं. परंतु तेवढ्यावरून त्यांच्या पावलांचं आणि शरिराचं चापल्य व मोहकता दिसली ती आम्हांला भारी आकर्षक वाटली. उदयशंकर आणि अमला आपल्या "कल्पना" चित्रपटासाठीं कल्पनातीत श्रम घेत होते. आणि त्यांची तयारी, त्यांचं कर्तृत्व आणि महत्त्वाकांक्षा लक्षांत घेतां एकदा अपाल्या नृत्यकौशल्यानं ज्या कलावंतानं सारं जग गाजविलं, तो पुन्हां एकदा आपल्या चित्रपटानं तें गाजविणार असंच कुणालाहि वाटेल.

'हर्मिटाज' हून आम्ही हॉटेलवर परतलों. संध्याकाळीं आम्ही महाराष्ट्र समाजाला भेट दिली. आपल्याकडे प्रथम भाषणं व नंतर उपहार अशी पद्धत आहे; पण मद्रासेंत प्रथम उपहार व नंतर भाषणं असा उलटा कार्यक्रम दिसला. प्रेक्षकांच्या दृष्टीनं हा उलटा उपक्रम सोयीचा असला तरी वक्त्याच्या दृष्टीनं पुष्कळदा घातक ठरण्यासारखा आहे. सत्कार-समारंभांत जीं कांहीं भाषणं झालीं त्यामधे एका विदुषींचं—मला वाटतं त्यांचं नांव केतकर असावं—भाषण फार चांगलं झालं. आपांनीं उत्तरदाखल भाषण केलं तें नेहमीप्रमाणं "थोडक्यांत गोड" असं होतं.

आम्हीं महाराष्ट्र समाजाचा निरोप घेतला तेव्हां आमच्याभोंवती शेकडों मंडळी जमली. त्यांचा प्रत्येकांचा तो प्रेमळपणा पाहून निरोप घेणंहि अवघड वाटूं लागलं. अखेर साडेनवाच्या सुमाराला आम्ही कसेबसे हॉटेलवर परतलों. रात्रीं श्री. शेषय्या, श्री. रामकोटीश्वरराव या दोघांनी मेजवानीचा बेत ठरवला होता, तेव्हा वेळेवर हजर राहणं जरूरीचं होतं. परंतु आम्हीं हॉटेलच्या मोठ्या हॉलमधे जातों तों सर्व मंडळीं आमच्यासाठींच खोळंबली होती. मद्रासेंतील वृत्तपत्रव्यवसायांतीली बडी मंडळी मेजवानीस आली होती. त्यांच्या परिचयाचा व सहवासाचा आनंद फार मोठा होता. पंगत जाडया विद्वानांची असली तरी खूपच रंगली. 'त्रिवेणी' चे संपादक रामकोटीश्वर राव यांचा विनोदी स्वभाव, 'नवोदय' चे संपादक शेषय्या यांचा मनमोकळेपणा, मच्छलीपट्टम्‌च्या बँकेचे डायरेक्टर वेंकटरामन् यांचा कानडीचा अभिमान, यांमुळं संभाषणांत खूप गमंत आली होती. बंगलोर नॅशनल कॉलेजचे प्रिन्सपल संपतगिरी राव, कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद तिमलराव, विजगापट्टमचे पत्रकार विश्वनाथम्, बंगलोरच्या 'सत्यशोधन प्रकाशन' चे मालक ॲडव्होकेट श्रीनिवासराव, 'अंध्र प्रभा' चे संपादक श्री. नारला, 'मद्रास मेल' चे उपसंपादक के. सत्यनारायण वगैरे मंडळींत निरनिराळ्या विषयांवर चर्चा चाले तीदेखील मनोरंजक होती.

संभाषणांत विषयांची जितकी विविधता होती, तितकीच पानांतल्या पक्वान्नांतहि होती. साडेदहा-अकराला आम्ही पानांवरून उठलों आणि पानसुपारीसाठीं शेजारच्या खोलींत मांडलेल्या गोल मेजाभोवती बसलों. प्रथम रामकोटीश्वर राव आपलं भाषण करण्यासाठीं उठले. मेजवानीनंतरचीं हीं भाषणं म्हणजे एक गंडांतरच! इंग्रजी वाङ्मयांत या प्रसंगावर एक मोठा उद्बोधक चुटका आहे. एका गुलामाला त्याच्या कांहीं अपराधावरून देहान्ताची सजा देण्यांत आली व त्याला सिंहाच्या पिंजऱ्यांत ढकलून दिलं. सिंह भुकेलेला होता. बाहेर जमलेल्या लोकांना वाटलं, आतां तो गुलामाचा फडशा पाडणार. सिंह गुलामाजवळ गेला, त्याला हुंगू लागला—आणि काय आश्चर्य! तो सिंह निमूटपणें पिंजऱ्यांच्या कोपऱ्यांत

खाऊन स्वस्थ बसला ! गुलाम अर्थातच बचावला. तो बाहेर आल्यावर लोकांनी विचारलं, "अरे, तो वखवखलेला सिंह तुला न खातां परत गेला ! तूं युक्ति तरी कोणती योजलीस !" यावर गुलाम म्हणाला, "सिंह मला खाण्यासाठीं म्हणून जवळ आला तेव्हां मी त्याच्या कानांत पुटपुटलों, 'बाबा' मला खा पाहिजे तर. परंतु नंतर तुला मेजवानीनंतरचं भाषण (after-dinner speech) करावं लागेल !' तें ऐकतांच सिंह शेपूट खालीं घालून पळाला झालं."

परंतु आम्हीं मेजवानी झोडण्याचा अदूरदर्शीपणा केल्यामुळं त्या सिंहा-प्रमाणं पळून जाणं शक्य नव्हतं. तेव्हां प्रत्येकाला चार शब्द बोलणं भाग होतं.

पाहुण्यांना निरोप देऊन आम्ही तिसऱ्या मजल्या वरील आमच्या खोलीवर गेलो तेव्हां बारा वाजून गेले होते. सकाळीं साडेआठाच्या गाडीनं आम्हाला निघायचं होतं. पहाटे उठण्याचा आत्मविश्वास आम्हा दोघां-च्याही ठिकाणीं नसल्यामुळें सामान आताच आवरून ठेवण आवश्य होतं. परंतु खोलीत अंधार होता. आम्ही बटन दाबून पाहिलं तो दिवाच लागेना. मग अठवलं कीं रात्री बारा वाजतां हॉटेलांतले दिवे बंद होतात. आम्ही एका नोकराला उठवून मेणबत्त्या आणवल्या आणि मेणबत्त्यांच्या उजेडांत सामान आवरून ट्रंका भरण्या विक्रम केला व झोंपीं गेलों. सकाळी शेषय्या व रामकोटीश्वरराव जोरजोरानं दार ठोठावूं लागले तेव्हां आम्ही दचकून उठलों. क्षणभर वाटलं कीं आता कसली आपण गाडी गाठतों. परंतु व्यवस्थित बांधून ठेवलेलं सामान दृष्टीस पडतांच आम्ही सुटकेचा निश्वास टाकला. आता फक्त चहा आणि निरोप घ्यायचा एवढंच काम होतं. परंतु इतकी सावधगिरी बाळगून देखील गाडी गाठण्याची नेहमीची धावपळ कांही चुकली नाही. आयत्यावेळीं स्टेशनवर जाण्यास टॅक्सी मिळेना. गाडी चुकली तरी बेहत्तर रिक्षात बसायचं नाहीं असा माझा निश्चय तेव्हा आम्ही मोठ्याच फिकिरीत पडलों. अखेर सामान रिक्षांतून पुढें पाठवून आम्ही बस मधून कसंबसं वेळेवर स्टेशन गाठलं. साडेआठवाजता आमची गाडी मद्रास स्टेशनाबाहेर पडली.

बरोबर अकरा दिवसापूर्वी आम्ही त्रिवेंद्रमच्या सफरीसाठीं घराबाहेर पडलों ते आता घराकडे वळलों. जातांना गाडी जितकी सावकाश जाईल. जितकीं नवी स्थळं पाहायला मिळतील, तितकीं थोडींच अशी आमची वृत्ति होती. परंतु आतां प्रवास केव्हां संपेल व घरीं केव्हां जाऊं असं आम्हाला झालं होतं. त्यामुळें मद्रासमधें आणखी दोन दिवस राहण्याचा आमचा पूर्वीचा बेत आम्ही बदलला होता, व अठ्ठावीस ऐवजी सव्वीस तारखेसच आम्ही मद्रास सोडलं. सकाळची वेळ मोठी प्रसन्न होती. त्रिवेलोर आर्कोनम, तिरूत्तम अशी स्टेशनं घेत गाडी चालली होती. परंतु बाहेरच्या देखाव्याकडे आता पहावंसं वाटत नव्हतं. एकतर याच मार्गानं आम्हीं त्रिवेंद्रमला गेलो होतों व त्यामुळें हीं सारी स्टेशनें व दोन्ही बाजूंचं सृष्टिसौंदर्य आम्ही एकदा पाहिलेलं होतं. शिवाय त्रिवेंद्रमच्या ' टेक्नीकलर ' वनश्रीपुढें ही शोभा मला अगदी फिकी वाटत होती. आम्ही कांहींवेळ मद्रास स्टेशनवर विकत घेतलेलीं वर्तमानपत्रं वाचलीं. तीं वाचून झाल्यावर मग एकच करमणुकीचा मार्ग शिल्लक राहिला. तो म्हणजे डब्यांतल्या मंडळींच्या निरीक्षणाचा. आमच्या डब्यांतली मंडळी आमच्याबरोबरच मद्रासला गाडीत चढली होती. त्या चौघा पुरुषांपैकीं एक वृद्ध होता, दुसरा त्याचा धाकटा भाऊ शोभेल अशा पोक्त वयाचा होता तिसरा कॉलेज विद्यार्थ्यासारखा दिसणारा. त्या वृद्ध गृहस्थाचा मुलगा असावा व चौथा या तिघांशी किंचित् अदबीनें वागत असलेला पाहून त्यांचा सेक्रेटरी अगर छोटासा भागीदार असावा असा आम्ही तर्क केला. ही सर्व मंडळी खूपच श्रीमंत असावीत. त्यांचे पोषाख तर उंची होतेच. शिवाय, त्यांच्याबरोबर फळांच्या करंड्या, फराळाचे डबे व एकदोन नोकर एवढा सरंजाम होता. गाडी स्टेशनांत थांबली कीं दुसऱ्या डब्यातली त्यांची मंडळी त्यांना भेटून, विचारपूस करून जात. त्यांचं सर्व संभाषण तेलगूंत चाललं होतं. शिवाय त्यांचा व्यवसायही अगदी भिन्न म्हणजे गिरण्या वगैरेसारखा असावा असा आमचा तर्क होता. तेव्हा प्रवासापुरती का होईना पण त्यांची व आमची दोस्ती जम-

ण्याचा कांहींच संभव नव्हता. परंतु नंदलूर स्टेशनांत गाडी थांबली व अशी एक असंभाव्य गोष्ट घडली कीं जीमुळें आमच्यातला अबोला वाढण्याऐवजी नाहीसा झाला. नंदलूर स्टेशनांत गाडी आली तेव्हां सुमारे साडेबारा झाले होते, व याच स्टेशनवर चांगले जेवण मिळेल अशी सूचना आम्हांला डब्यांतल्या मंडळींनी दिली होती. भूक इतकी लागली होती कीं डब्यांतला जेवणाचा मासला एकवेळ अनुभविलेला असून देखील अ.म्ही पुन्हा जेवण मागवलं. थोड्याच वेळांत कमरेइतक्या उंचीचे चारपाच डबे घेऊन मनुष्य डब्यांत शिरला व त्यानं ते सारे डबे मधल्या मोकळ्या जागेत ठेवले. आम्ही बाकावरची पुस्तकं, वर्तमानपत्रं आवरली. ती मंडळीसुद्धां आपले बिछाने आवरून जेवण्याच्या तयारीला लागली होती. आप्पांनीं त्यांतला एक डबा उचलला व तो ते डायनिंग टेबलाप्रमाणें मांडलेल्या आमच्या ट्रंकवर ठेवणार इतक्यांत त्याची कडी निसटली व एकावर एक रचलेले चारही कप्पे खाली कोसळले ! तुमच्या आयुष्यांतील सगळ्यांत अधिक शरमिंदेपणाचा क्षण कोणता असं कोणी मला विचारलं तर मी हाच क्षण सांगेन. कारण ते डबे कोसळल्यावर जो प्रकार झाला त्याचं वर्णन करणंही कठीण आहे. डब्यांत ज़िकडे तिकडे ताक, सार, रसभाजी सांडून उग्रवास पसरला. उंची सूटकेसवर, आणि त्या चारि गृहस्थांच्या परीटघडीच्या उंची कपड्यावर साराची रंगपंचमी झाली. आणि प्रथमग्रासे मक्षिकेऐवजी डब्यांचं पतन झाल्यामुळें जेवणाचा विरस झाला. त्या मंडळींची कोणत्या शब्दांत क्षमा मागावी तें आम्हांला कळेना. परंतु आम्ही त्यांची समजूत काढायची तें उलट तेच आमची समजूत घालूं लागले. जणूं कांहीं त्यांच्याच हातून डबा पडला होता व आमचे कपडे खराब झाले होतें. त्यांनीं नोकराकडून डबा साफ केला, आपले कपडे बदलले, व सारा प्रकार हसण्यावारी नेऊन आमचा संकोच घालविला. थोड्याच वेळांत आम्ही सर्व एकत्र जेवायला बसलो. त्यांनीं घरून बनवून आणलेली इडली आम्हांला आग्रह करून वाढली. नंतरच्या त्यांच्या बोलण्यांत आम्ही त्यांच्याशिवायी केलेले सारे

तर्क खरे ठरले. मद्रासची ती व्यापारी मंडळीं होती. त्यांच्या व्यापाराचा व्याप व ऑफिस मुंबईस होतं. तो वृद्ध गृहस्थ त्या तरुण मुलाचा बापच होता, व दुसरा अदबशीर वागणारा त्यांचा मॅनेजर होता. मधूनमधून त्यांना भेटणारी मंडळीं त्यांच्या ऑफिसांतील नोकर होते. सर्व कंपनी मुंबईस चालली होती. त्या तरुण मुलानं विलायतची सफर केली होती. आणि शिकून डिग्री घेण्याऐवजी तो व्यापारांत शिरला होता. तो एक-दोन तामीळ चित्रपटांचा निर्माता होता. त्याच्या एका चित्रपटांत शांता आपटेनं काम केलं होतं !

मग गप्पांना काय तोटा ! फळांच्या करंड्या संपल्या. परंतु विषय संपण्याचं लक्षण दिसेना. अखेर कुडापा स्टेशनांत गाडी थांबली तेव्हा मात्र आमच्या गप्पांना ओहोटी लागली. कदाचित् आम्ही एक छोटीशी झोपही काढली असती. पण इतक्यांत एक भले उंच, धिप्पाड गृहस्थ आमच्या डब्यांत शिरले. त्यांच्याबरोबर सामान विशेष नव्हतंच आमच्या डब्यांत त्यांच्यापुरती जागा नव्हती त्यामुळें ते डब्यांत शिरले तेव्हां आमच्या चेहऱ्यावर आठ्या पडल्या असाव्यात. परंतु आमच्या गुप्त विरोधाला न जुमानता, अघळपघळ हसत त्यांनीं आपला शिरकाव करून घेतला व जणू त्यांची आमची खूपच जानपछान असावी अशा तऱ्हेनं त्यांनीं गप्पा मारावयास सुरवात केली. त्यांच्या बोलण्यांत निरनिराळे विषय आले. परंतु राजकारण हा विषय त्यांच्या विशेष आवडीचा दिसला. त्यांनीं अनेक गमतीच्या हकीकती सांगितल्या. त्यांतली एक अशी कीं मागें निवडणुकीच्या दिवसांत आंबेडकरांनीं दक्षिणेत दौरा काढला होता त्या वेळीं योगायोगानं त्याच गाडीत हेही गृहस्थ प्रवास करीत होते. प्रत्येक स्टेशनवर जवळपासच्या शेकडों खेड्यांतून हजारो अस्पृश्य अंबेड-करांचं दर्शन घेण्यासाठीं स्टेशनवर जमत होतेआणि विन्मुख होऊन परत जात होते. कारण आंबेडकरांच्या डब्याच्या दार खिडक्या बंदच असत. प्रत्येक स्टेशनवर त्यांच्या दर्शनासाठीं जमलेल्या लोकांना खिडकीत डोकावून नुसतं तोंड दाखविण्याइतकी फुरसत आणि सौजन्य अंबेडकरांसारख्या

मोठ्या पुढाऱ्याच्या अंगी नसावं याचं या गृहस्थांना मोठं आश्चर्य वाटलं व अंबेडकरांची भेट घेण्याचा निश्चय करून कुडापा स्टेशनवर हे गृहस्थ त्यांच्या डब्यापाशीं गेले आणि द्वाररक्षकाला म्हणाले, " अंबेडकरांना भेटायचं आहे." परंतु शिपायानं ठराविक उत्तर दिलं कीं " साहेब कामांत आहेत." फारच चिकाटी धरल्यावर शिपाई म्हणाला " सलून-मध्यें या व या काचेच्या खिडकीतून साहेबांचं दर्शन घ्या." यावर हे गृहस्थ खूपच हसले व म्हणाले, " अंबेडकर स्वतःला समजतात कोण ? नेता की सिनेमा नट. ते नेता असले तर जनतेला भेटणं त्याचं कर्तव्य आहे—" आणि खिडकीवाटें डोकावून न पाहतांच हे गृहस्थ परत आपल्या डब्यांत जाऊन बसले.

अशा अनेक गंमती सांगून या गृहस्थांनीं तास दीड तास आमची करमणूक केली. संध्याकाळीं साडेसहाच्या सुमाराला आमची गाडी गुंटकल स्टेशनांत आली. साडेसहाच झाले हो तरी झपाझप अंधार पडूं लागला होता. आम्ही सामान हमालाच्या स्वाधीन केलं व हुबळीच्या गाडीत आमच्या राखीव जागी ठेवण्यास बजावून आम्ही रिफ्रेशमेंटरूमकडे वळलो. रिफ्रेशमेंटरूममध्यें एक पंजाबी कुटुंब जेवत होतं. सबंध टेबलावर त्यांच्या डब्यांची, ताटांची गर्दी झाली होती. व एक देखणी बाई दोन लहान मुलांना आळीपाळीनं बिर्यानी भरवीत होती. आम्ही टेबलापाशीं जाऊन बसल्यावर त्या मुलांनी जेवण सोडलं व तीं आमच्याकडे टकमका पाहूं लागली. मुलांच्या या वर्तनाचा त्या बाईला मोठाच संकोच वाटला, पण मला मात्र मौज वाटली. वेटरनं आमचं जेवण आणल्यावर आम्ही अगदीं मजेत सावकाश जेवूं लागलों. गाडीला खूपच अवकाश होता. शिवाय डाव्या हाताच्या भिंतीवर पाटीं होती की गाडी सुटण्यापूर्वी पाच मिनिटं घंटा वाजवून सूचना देण्यांत येते. यावर विसंबून आम्ही निश्चित होतो. परंतु जेवतां जेवता मधेच मला आगगाडीची घंटा ऐकूं आली. वेटर टेबलापाशी आल्यावर मी सहज चौकशी केली तों त्यानं सांगितलं की ही हुबळीची गाडी निघाली. त्याचे ते शब्द ऐकतांच आम्ही जेवण

अर्धच सोडलं, पांचाची नोट त्याच्या हातांत कोंबली आणि धांवतच खोलीबाहेर पडलों. आम्ही गाडींत चढतों न चढतों तोच गाडी हालली आणि सुरू झाली.

दिवसभर प्रवासाचा आणि गप्पा मारण्याचा शीण आला होता. आम्ही बर्थवर बिछाने पसरले आणि पडलों. झोप येत नव्हती. परंतु आगगाडीच्या तालावर हेलकावे खाणाऱ्या मनाला जी एक प्रकारची ग्लानी आली होती ती झोपेपेक्षांही सुखदायक होतीं. ग्लानी केव्हां संपली आणि झोप केव्हां सुरु झाली तें देखील मला कळलं नाही. रात्रभर गाडी चालू होती, मधेच थांबत होती, पुन्हां तिची गति सुरू होत होती. सकाळीं पूर्ण उजाडल्यावर गाडी हुबळीच्या स्टेशनांत उभी राहिली. तेव्हां आम्ही जागे झालों. उठून खिडकी वर सरकवून आम्ही बाहेर पाहतों तों चक्क उन्हं पडली होती. आम्हाला या स्टेशनवर गाडी बदलायची होती. हुबळीहून मिरजेकडे जाणाऱ्या गाडीला चांगला दीडतास अवकाश होता. आम्ही तोंड धुऊन चहा घेतला व स्टेशनबाहेर पडलों. चार दोन टांगे उभे होते त्यापैकीं एकांत बसून आम्ही हुबळी गावांतील मोठ्या रस्त्यानं जाऊं लागलों. ताजीं वर्तमानपत्रं विकत घ्यावीं आणि गांवही पहावं अशा दुहेरी हेतूनंच आम्ही निघालों होतों. प्रथमच जें वृत्तपत्रांचं दुकान दिसलं तेथें आम्ही टांगा उभा केला व दुकानांत शिरलों. झंकार, धनुर्धारी, मौज वगैरे साप्ताहिकांचें अंक व सकाळ, काळ वगैरे मराठी वृत्तपत्रं पाहून मला एकदम आनंद झाला. कोल्हापूर सोडल्यापासून गेल्या अकरा दिवसांत मराठी वर्तमान पत्र आम्हाला पाह्यला मिळालं नव्हतं. त्यामुळें आम्ही सर्व वृत्तपत्रं व साप्ताहिकं खरेदी केलीं. पैसे देऊं लागलों तसे दुकानचे मालक हसून म्हणाले, "आपल्याकडून पैसे नाहीं घ्यायचे." दुकानदारानं आम्हांला ओळखलं होतं हें उघडच होतं. आमच्या 'झंकार'चे ते एक विक्रेते होते. आम्ही त्यांचा निरोप घेतला व थोड्या लांबच्या रस्त्यानं परत स्टेशनकडे वळलों. गाडीची वेळ झाली होतीच. हमालानं आमचं सामान एका कंपार्टमेंटमधें व्यवस्थित ठेवलं होतं. आम्ही शेजारीं

पाहिलं तो त्या डब्यांत खूपच गर्दी होती. मग आमच्या लक्षांत आलं की आम्ही बायकांच्या डब्यांत चढलों होतों. आम्ही मोठयाच पंचाइतीत पडलों. इतक्यांत हमालानं सांगितलं कीं स्टेशन मास्तरांच्या परवानगीनंच त्यानं आमचं सामान. बायकांच्या डब्यांत चढवलं होत. परंतु मी अप्पांना म्हटलं, स्टेशन मास्तरनीं तुम्हांला बायकांच्या डब्यांत बसण्याची परवानगी दिली आहे खरी, परंतु डब्यांतल्या इतर स्त्रियांनी विरोध केला तर ?"

डब्यात आमच्या खेरीज तीन चार पार्शी मुली होत्या. त्यांचे ते उंची पंजाबी पोषाख, आणि पाश्चात्य पद्धतीची केशरचना, व तोंडावरचा मेक-अप व हातांतली पुस्तकं पाहून या कॉलेजविद्यार्थिनी असाव्या असा मीं तर्क केला. आणि तो खरा ठरला. " मी बसलों तर तुमची कांहीं हरकत नाही ना ! " असं अप्पांनीं आपल्या स्पेशल आवाजांत त्यांना विचारलं तेव्हां त्या सगळ्याजणीं एकदम हसल्या व इंग्रजींत म्हणाल्या " ऑफकोर्स, यू आर वेलकम " डब्यात चढतांना मागें वळून अप्पानीं माझ्याकडे अशा दृष्टीनं पाहिलं की ते उघड उघड प्रतिपादित होते, " पाहिलंस ! "

या मुली धारवाड आलं तेव्हां किलबिलाट करीत खाली उतरल्या. आता सबंध डबाच आमच्या ताब्यांत मिळाला होता. मी उठलें व त्या मुलींनीं इतका वेळ अडविलेल्या बर्थवर मनमोकळेपणानं बसणार इतक्यांत बाकाच्या कडेला एक सुंदर छोटीशी छत्री मला दिसली. आणि अप्पांचीही दृष्टि तिकडे वळली होती असं मला आढळलं. तेव्हां मीं त्यांना म्हटलं.

" चांगली आहे, नाहीं ? "

ते म्हणाले, " काय छत्री ना ? "

मी म्हटलं, " नाहीं, नाहीं. सिच्यूएशन. "

" ती कोणती बुवा ? "

मीं म्हटलं, " अशा विसरलेल्या सुंदर छत्रीवरून गोष्टींतल्या किंवा कादंबरींतल्या नायक नायिकेची पहिली जानपछान नाहीं का घडवून आणता येणार ? समजा, आता तुम्ही डब्यात एकटेच असता तर त्या मुलीची ही छत्री नेऊन द्यायसाठी—"

आप्पा एकदम म्हणाले, " तिच्यामागें धावलों असतो म्हणतेस? मुळीच नाहीं. माझी गोष्ट कशाला, कोणचाही पुरुष आजच्यासारख्या छत्र्या महाग झालेल्या असतांना आयती हातांत आलेली सुंदर छत्री प्रामाणिकपणानं नेऊन देईल असं नाही वाटत. "

" तुम्ही फारच वास्तववादी व्हायला लागलांत हं " असं मी म्हटलं व आम्ही दोघं खूप हसलों.

आमचं इतकं संभाषण होत आहे. तों गाडी सुटायची वेळ झाली आणि ती छत्री आमच्या गळयांत पडणार असा दाट संभव दिसूं लागला.

इतक्यांत त्या चोघींपैकी एक मुलगी धांवतच डब्याजवळ आली व आपली छत्री घेऊन धांवतच परत निघून गेली. धारवाड स्टेशन सोडून गाडी निघाली. तेव्हां डब्यांत आम्ही दोघंच होतो. जणूं सबंध डबा आमच्यासाठी रिझर्व केला होता. इतका निवांत व आरामशीर प्रवास करण्याची संधि अकरा दिवसांत प्रथमच आम्हांला मिळाली होती. धारवाड ते बेळगांव हा प्रवास कोणत्याच दृष्टीनं असामान्य नाहीं. मुगुद, नागलावी, अलंनावर, तावरगट्टी, नागरगाळीं, देवरायी अशी लहान लहान स्टेशनं, गाडी घेत होती. गाडीच्या दोन्ही बाजूला तो मुलूख पसरला होता तोहीं कांहीं आकर्षक नव्हता. पडिक रानं आणि जाळाऊ लाकडांच्या झाडांनीं भरलेल्या सुख्या वैराण टेकड्याच बहुधा आढळत. आमची गाडी लोंढा स्टेशनांत उभी राहिली तेव्हां दुपारी एक वाजला होता व आम्हाला भूकही फार लागली. होती. परंतु जेवण्यापूर्वी थंड पाण्यानं तोंड धुऊन, बदलायसाठी आम्ही वेटिंगरूमकडे वळलो. स्त्रियांच्या वेटिंगरूममधील ड्रेसिंग टेबल आधींच एका ॲंग्लो इंडियन मुलीनं अडवलं होतं ह्या मुलीकडे केवळ तिच्या हाडकुळेपणामुळें माझं लक्ष वेधलं होतं. इतकी कमालीची निरोगी पण कृश स्त्री मी पूर्वी कधीच पाहिली नव्हती. ह्या मुलीची वेणीफणी अपेक्षेपेक्षा लवकरच आटोपली. कारण सैन्यातून नुकताच परतलेला युरोपियन तिचा प्रियकर बाहेर तिची वाट पहात उभा होता.

ती निघून गेल्यावर इतका वेळ तिच्याकडे निरखून पहात बसलेली एक वृद्ध युरोपियन बाई मला म्हणाली,

" पाहिलंस किती हडकुळी बाई आहे ? "

मीं म्हटलं, " मला तिचा हेवा वाटतो. "

यावर ती वृद्ध स्त्री म्हणाली, " छेः छेः मी तर तिला सांगितलं कीं तुझ्यासारखी टुमटुमीत तब्येत तिनं राखली पाहिजे म्हणून. "

तें ऐकून मला हसू आलं. गरीबी श्रीमंतीप्रमाणें लठ्ठपणा आणि कृशपणा हा भेद नाहीसा होईल तेव्हांच निदान स्त्रीजात सुखी होईल असा विचार माझ्या मनांत आला, यावर त्या बाईनं पुन्हां मला विचारलं " तुला कांही मूलबिल आहे ? "

मी म्हटलं " घरी एक छोटीशी बेबी आहे माझी. "

तें ऐकतांच तिचं माझ्याविषयीं एकदम चांगलं मत झालं असावं. कारण नंतर माझा पोषाख आटोपेपर्यंत ती एकाद्या मावशीप्रमाणं राहिली. रेल्वेखात्यावर ती भयंकर संतापली होती, व तिला ज्या शिव्या स्टेशनमास्तरांना किंवा गार्डाला तोंडावर देतां आल्या नव्हत्या त्या ती आतां माझ्यापुढें मोजीत होती. ती म्हणाली. " पहाटें लोंढा स्टेशन आलं कीं मला हांक मारून उठवा असं मी गार्डाला बजावलं होतं. शिवाय खडूनं माझ्या डब्याच्या दारावर लिहिलं होतं देखील, " मला लोंढ्यास उठवा " असं परंतु गार्डनं मला उठवलं नाहीं, व मी सरळ हुबळीस गेलें. तेथून आतां परत लोंढ्याला यावं लागलं. हुबळी ते लोंढा हा उगाच फेरा पडला मला. रेल्वे ऑफिसर त्याबद्दल पैसे मागतील परंतु मी त्यांना स्वच्छ सांगणार कीं ही सारी तुमच्या गार्डाची गफलत आहे. माझ्याकडून पै नाहीं मिळणार."

थोड्याच वेळानं ती वृद्ध स्त्री लोंढ्याच्या मिशन कंपौंडकडे निघून गेली व मीही रिफ्रेशमेंटरूमकडे वळलें. तेथें आप्पा माझीच वाट पहात होते. जेवण आटोपून आम्ही परत आमच्या डब्यांत जाऊन बसलों. याही स्टेशनवर आमच्या डब्यांत कोणी चढलं नाहीं. परंतु रिझर्व डब्याची ही

मु. प्र. १९

चैन फक्त बेळगांवपर्यंत आम्ही घेऊं शकलों. सुमारें तीन वाजतां गाडी बेळगांव स्टेशनांत उभी राहिली, येथें गाडी चांगली तासभर थांबणार होती; परंतु दोन मैलांवर ठळकवाडीस आक्काच्या घरीं जाऊन परत गाडी साधण्याइतका अवधी नव्हता. म्हणून आम्ही तो बेत रहित केला. बेळगांव स्टेशनवर मिलिटरी मराठा पलटणींची खूपच गर्दी होती. खाकी पोषाख केलेले आडदांड सैनिक व दंडावर, खांद्यावर व टोपीवर हुद्याचीं व मानाचीं चिन्हं लावून हिंडणारे अधिकारी यांनीं स्टेशन गजबजून गेलं होतं. आतां आमच्या डब्यांत गर्दी होणार अशी चिंता आम्ही करूं लागतों न लागतों तोंच आमच्या डब्याच्या दाराशी कॉलेजविद्यार्थ्यांचं एक टोळकं, व त्यांच्याबरोबर दोन गृहस्थ उभे राहिलेले आम्हाला दिसले. त्यांपैकीं एकांना पाहून मला वाटलं, अरे आपले शंकरराव किर्लोस्कर इकडे कोणीकडे ? त्या गृहस्थांची उंची, उभं राहाण्याची ऐट, मानेची लकब सारं कांहीं हुबेहुब शंकररावांसारखं वाटून शंकररावच उभे असल्याचा भास मला झाला. परंतु क्षणभरच. लवकरच ते व त्यांच्याबरोबरचे गृहस्थ दोघंजण डब्यांत चढले, 'हुश्य' करून बसले व आप्पाकडे पाहून त्यांनीं नमस्कार केला. आप्पांनीं माझ्या कानांत सांगितलं कीं शंकररावसारखे दिसणारे, गृहस्थ फर्ग्यूसन कॉलेजांत प्रोफेसर आहेत, व दुसरे शॉर्ट व हाफशर्ट घातलेले सावंतवाडी कॉलेजचे प्रिन्सिपाल आहेत. मी असा तर्क केला कीं डब्याबाहेर उभे असलेले विद्यार्थी या दोघांना स्टेशनपर्यंत पोचवायला आले असावेत. परंतु थोड्याच वेळांत ही सर्व विद्यार्थी मंडळी आपापल्या सामानासह डब्यांत चढली. त्यांचं सामान मोठं विचित्र होतं. बंद लाकडी खोके, काथ्यानं चारी बाजूंनीं बांधलेले पत्र्याचे डबे, भाजीपाल्यानं भरलेल्या बुरुडी टोपल्या व त्यांतून डोकावणाऱ्या मोठ्या बाटल्या हे सर्व पाहून हा प्रकार असावा तरी काय अशा घोटाळ्यांत माझं मनं पडलं. बेळगांवपर्यंत ऐसपैस बसलेल्या आम्ही हातपाय आवरून घेऊन या टोपल्या, डबे खोक्यांना जागा करून दिली. पुढें बोलतांना प्रोफेसर साहेबांनीं सांगितलं कीं कॉलेजची वनस्पति शास्त्राची (बॉटनी) ट्रिप त्यांनीं काढली होती, व बेळगांव-खानापूरच्या डोंगरांत भटकून

तऱ्हेतऱ्हेच्या वनस्पती, दगडमातीचे नमुने, व जंगलांत स्वस्त मिळाला म्हणून खरेदी केलेला मध वगैरे घेऊन ही सर्व मंडळी पुण्यास निघाली होती. पुढें हे प्रोफेसर व आप्पा क्रिकेटच्या गप्पा मारूं लागले. सावंतवाडीच्या कॉलेजचे प्रिन्सिपाल सीटवर मागे टेकून स्वस्थ पडून राहिले. विद्यार्थी वनस्पतींची गंमतीदार नांवं घेऊन एकमेकांत चर्चा करूं लागले. गाडी सुरू होणार इतक्यांत लष्करी पोषाख केलेले चार सैनिक आमच्या डब्यांत चढले. आम्ही त्यांना कशी बशी जागा करून दिली. अवजड पोशाखांत, अपरिचित लोंकांत ते सैनिक अधिकच अंग चोरून बसले. जणूं शिक्षणखात्यांतील सुशिक्षित मंडळींचा त्या लष्करी लोकांना संकोचच वाटत होता. गाडीनं बेळगांव स्टेशन सोडलं. सुळेभावी, सुळधाळ, पाच्छापूर हीं लहान लहान स्टेशनं मागं पडलीं तशा विद्यार्थ्यांच्या गप्पा थंडावून साहजिकच सर्वांचं लक्ष या लष्करी सैनिकांकडे वळलं, व आम्ही त्यांची चौकशी केली. ही सर्व मंडळी इटालीच्या रणक्षेत्रावरुन, रजेवर घरीं निघाल्याचं ऐकून आमचं कुतुहल वाढलं. युरोपच्या रणक्षेत्रावर लढून परतलेल्या या सैनिकांची हकीकत ऐकण्याची उत्सुकता आम्हाला वाटत होती. सैनिकांनी आपले अनुभव लिहून पाठवावे. व त्यांत उत्तम ठरणाऱ्या हकीगतीला मोठं बक्षीस द्यावं अशी योजना आम्ही ‘ झंकार ’ साप्ताहिकांतून प्रसिद्ध केली होती. परंतु तिला सैनिकांकडून फारसा पाठिंबा मिळाला नव्हता. त्यामुळें युरोपमध्यें लढाई गाजवून परत घरीं चाललेले हे मराठा सैनिक पाहतांच आमच्यांतील वृत्तपत्रकार खडबडून उठला होता. त्या सैनिकांपैकीं जो एक मध्यम वयाचा व बराचबोलका होता त्यांला आम्ही आमची योजना, व त्याबाबतींत सैनिकांनीं दाखविलेला निरुत्साह याविषयीं सांगताच तो आपल्या इंग्रजी मराठींत म्हणाला,

“ त्याचं अस आहे साहेब, आम्हा सैनिकांत सुशिक्षित लोक आधीच फार थोडे. त्यात लिहिण्याची आवड असणारे एकदोनच निघायचे. परंतु त्यातही दुसरी अडचण अशी आहे कीं नोकरीवर असेपर्यंत आपले खरे अनुभव लिहिण्याचं स्वातंत्र्य सैनिकाला नसतं.

" लिहिण्याचं जाऊं दे. पण बोलण्याचं स्वातंत्र्य असतं ना? निदान तुमच्या इटालीच्या रणक्षेत्रावरचें अनुभव आम्हाला ऐकविण्यास तर कांहीं हरकत नाहीं?" असा प्रश्न आम्ही करावयाचा अवकाश, तो मराठा सैनिक भराभर बोलूं लागला. युरोपांत, इटलींत जीं नवी माणसं भेटलीं, नवे अनुभव मिळाले, नवं जीवन कंठलं त्यांची आठवण जणुं त्याच्या अंतःकरणांत उचंबळत होती, व तिला वाट देण्याची अधीरता त्याच्या तोंडून एकामागून एक बाहेर पडणाऱ्या मनोरंजक हकीगतीत आकंठ भरली होती. युरोपियन स्त्रीपुरुषांच्या जीवनांतील रसिकता, मोकळेपणा, टापटीप, कलात्मकता व शिस्त या सर्व गोष्टींची या मराठा सैनिकाच्या मनावर मोठी छाप पडलेली दिसली, व प्रत्येक नवी गोष्ट सांगतांच आधीं "साहेब लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे" असं म्हणण्याची त्याची लकब एखाद्या विनोदी पात्राला शोभण्यासारखी होती. युरोपमधील स्त्रीपुरुष एकमेकाशीं किती मोकळेपणानं, खेळीमेळीनं वागतात, तेथील स्त्रिया, पाकशास्त्राइतक्यांच सौंदर्यशास्त्रांत किती निष्णांत आहेत, तेथील लोकांची घरं किती स्वच्छ, व सुशोभित राखलेलीं असतात, तेथील स्त्रीपुरुषांना निसर्गसौंदर्याची केवढी भूक आहे, त्यांच्यामधें साध्या शेतकरी-वर्गालाही संगीत नृत्य वगैरे कला कशा अवगत आहेत, वगैरे वर्णन करून तो पुनः पुन्हा म्हणे, "साहेब कसं जगावं हें त्या लोकांपासून आम्ही शिकावं."

त्या मराठा सैनिकाच्या गोष्टी ऐकण्यांत आम्ही अगदीं रमलों होतों. तीहि स्वारी ऐन रंगांत आली होती. त्यानं आपल्या लष्करी कोटाच्या आंतल्या खिशांतून एक भलं जाडजूड पाकीट काढलं. व क्षणभर तें दाखवावं की नं दाखवावं अशा संभ्रमात तो पडला. परंतु आमच्या आतुर मुद्रा पाहून असो, किंवा स्वतःला आलेले रोमांचकारक अनुभव सांगून टाकण्याच्या हौसेमुळें असो, त्यानं अखेर पाकीट उघडलं आणि सात आठ फोटो काढून आमच्या हातीं देत तो म्हणाला,

" मोटार सायकलीच्या मागच्या सीटवर बसलेली मुलगी, इटालीनमध्यें

माझी जिवलग मैत्रीण झाली होती. ती एका श्रीमंत काऊंटची एकुलती एक मुलगी आहे. हिच्या बरोबर मी इटालींतल्या थाटबाज उपहागृहांत कितीदातरी जेवलों, व नृत्य केलं. रविबारी आम्ही दोघं मिळून वनभोजनाला जात असूं. सायकलवरून मोटारीतून, पायीं, नावेंतून सहल करीत असूं–”

आम्ही ते फोटो आळीपळीनं पाहूं लागलों. फोटोंत या मराठा सैनिकाच्या फटफटीच्या मागच्या सीटवर एक तरुण सडपातळ मुलगी, खुशाल त्याच्या खांद्या भोंवती हात टाकून बसलेली होती. खांद्यावर तिचे चापझेले केस रुळत होते. आणि खरोखर ती मला फार देखणी वाटली. दुसऱ्या एका फोटोत हीं दोघं मित्रमंडळीसह वनभोजन करीत होतीं. तिसऱ्या एकात मोटारीच्या बॉनेटवर दोघंही हसत बसलीं होतीं.

आम्ही ते फोटो पाहिले आणि अचंबा करीत त्या सैनिकाला विचारलं, “ पुढें काय झालं ? ”

“ पुढें काय व्हायचं ? ” त्यानं हसून ते फोटो परत पाकिटांत घातले व पाकिट कोटाच्या आतल्या खिशांत ठेवून दिलं, “ पुढें अर्थातच ती मला म्हणाली, कीं आपण लग्न करूं या मी तुमच्या बरोबर हिंदुस्थानला, येईन, तिच्या बापानंहि मला खूप गळ घातली. तिच्या नांवावर ठेवलेल्या इस्टेटीचं आमीषही दाखवलं ”

“ मग ? ” आम्ही उत्सुकतेनं विचारलं.

“ पण तिला मी नकार दिला. इकडे देशावर सगळी मंडळीं मला काय म्हणतिल या विचारानं मी तो मोह टाकला.”

त्या दोघांचे ते फोटो पाहिल्यानंर, व त्या मुलीचं सौंदर्य आधुनिकपणा व रसिकता लक्षांत घेतल्यानंतर तिच्या प्रेमाला नकार देण्याचा मोह टाळणं ही मोठी कटीण गोष्ट असली पाहिजे ह्यांत संशय नव्हता. स्वदेशाच्या, व स्वकीयांच्या अभिमानामुळें हा मराठा सैनिक त्या दिव्यांतून पार पडला होता. परंतु आपल्या या प्रेमप्रकरणामुळें आम्हा श्रोत्याच्या

मनांत विनाकारण गैरसमज उत्पन्न होऊं नये यासाठीं त्या सैनिकानं पुढें खुलासा केला,

" इटालींत दोस्तांना विजय मिळाल्यानंतर त्या देशांत भयंकर हलाखीची परिस्थिति पसरली. पुरुष लढाईंत बळी पडले. बायका व तरुण मुली एकट्या पडल्या. अशावेळीं, पैशाइतकीच महत्त्वाची सुरक्षितता म्हणजे प्रियकर मिळणं असं स्त्रियांना वाटूं लागलं. व म्हणून तरुण पुरुष दिसला कीं त्याला प्रथम प्रेमाच्या व नंतर लग्नाच्या जाळ्यात अडकविण्याचा प्रयत्न इटालियन स्त्रिया करूं लागल्या. माझ्या प्रमाणें इतर कित्येक मराठा सैनिकांना अगदीं माझ्यासारखे अनुभव आले आहेत."

त्यानं असं म्हणतांच त्याच्याच समोर बसलेला एक तरुण मराठा सैनिक एकदम हसला.

आम्हांनीं त्याला विचारलं, " तुम्ही कांहीं फोटो, आठवणी बरोबर आणल्या आहेत कीं नाहीं ? "

यावर तो आणखी हसून म्हणाला, " माझ्याकडे खूप फोटो, पत्रं जमलीं होतीं. परंतु मुंबईच्या जमिनीवर पाऊल टाकण्यापूर्वीं जवळ होती नव्हती तेवढी पत्रं व फोटो मी दर्यांत फेकून दिले. युरोपच्या आठवणी युरोपांत. इथं मायदेशांत आल्यावर आपलं जिणं आपल्या वळणानंच कंठणं भाग आहे."

या तरुण मराठ्यांचं हें शरणागतीचं बोलणं आमच्या मराठा मित्राला आवडलं नसावं. त्याच्या चेहऱ्यावर एकदम असंतोष दिसूं लागला व तो पुढें म्हणाला,

" हां. असंही कांहीं जणांना वाटतं. परंतु माझं मत फार निराळं आहे, साहेब. युरोपमधें मी जो प्रवास केला व तेथील मुक्कामांत युरोपिअन लोकांच्या राहणींतल्या, वर्तनांतल्या ज्या गोष्टी मला आवडल्या, त्या मी कधी विसरणार नाहीं. किंबहुना त्यांच्या राहणीतली शिस्त, टापटीप, सौंदर्य, शिष्टाचार, मनमोकळेपणा आम्हा हिंदी लोकांनीं आचार विचारांत

आणावा असं मला वाटतं. आपली राहणी आपण सुधारली पाहिजे अशी तळमळ जिवाला लागते."

"हिंदुस्थानांत परतल्यावर, येथील सौंदर्यशून्य, खेडवळ रुक्ष जीवन तुम्हांला कंटाळवाणं वाटेल, नाहीं?"

या प्रश्नावर एखाद्या इंग्रज पुरुषाप्रमाणें त्या मराठा सैनिकानं आपले खांदे हलविले आणि उत्तर दिलं,

"होय तसं वाटेल खरं. परंतु माझ्या पुरतं बोलायचं झालं तर खेड्या-वरचं माझं घर मी आधुनिक तऱ्हेनं परत बांधवलं आहे, व माझ्या माणसांनाही मी हळूहळू आधुनिक आचार विचारांचे शिक्षण देऊं लागलो आहे—

बोलतां बोलतां मिरज स्टेशन आलं. डब्यांतले ते सैनिक खाली उतरले. त्यांपैकीं फोटो व आठवणी समुद्रास्तुप्यंतु करणाऱ्या मराठा सैनिकांचा सत्तरी उलटून गेलेला वृद्ध बाप स्टेशनवर आला होता. हिंदुस्थानांतला तो एक गरीब शेतकरी होता एवढं सांगितल्यावर त्याच्या अंगावरच्या फाटक्या तुटक्या सदऱ्याचं व फेटा म्हणून डोक्यावर बांधलेल्या चिंध्यांचं वेगळं वर्णन करण्याची काय जरूरी आहे? त्याच्या अंगांत एक जुना मिलीटरीचा कोट होता. आतां ज्याला आपल्या अशक्त दुबळया हातांनी तो मिठी मारीत होता, त्याच मुलानं त्याला हा कोट पाठवला असावा.

बापलेकांच्या त्या आलिंगनाकडे पाहून कुणाच्याहि डोळयांत अश्रु उभे राहिले असते. वृद्ध पिता आणि लढाईवरून परतलेला जीविताचा आधारच असा पुत्र यांची भेट हृदयस्पर्शी तर खरीच. परंतु शिवाय त्या तरुणाचा कडक इस्त्रीचा, मानचिन्हांनीं भूषविलेला खाकी पोषाख, आणि त्याच्या वृद्ध पित्याच्या अंगावर लोंबणारी लक्तरं, तारुण्यापेक्षां 'जेवणखाण फुकट' म्हणूनच महायुद्धाच्या काळांतदेखील धष्टपुष्ट झालेला त्या तरुणाचा मर्दानी देह, व उलट, खडकाळ जमिनींत हाडाची काडं करून महा-गाईच्या काळांत कशीबशी गुजराण करणारा त्याचा दुबळा बाप, हा विरोध मला अत्यं हृदयस्पर्शी वाटला. केवळ ह्या महायुद्धामुळें अ पल्या

देशांतल्या कित्येक घरांतल्या दोन पिढ्यांत पडलेल्या फरकाचं तें प्राति-निधिक चित्रच होतं ! तें पाहतां पाहतां माझ्या साहजिक मनांत आलं, नाना देश हिंडून, स्वतंत्र आधुनिक जीवनाचें हरतऱ्हेचे नमुने पाहून परत आतां आपल्या घरीं व शेतवाडीवर परत आलेल्या या मुलां-सारखे हजारो तरुण हिंदुस्थानांत परत आले असतील, हे सारेजण आपल्या जुन्या तऱ्हेच्या राहणीशी, कुटुंब व्यवस्थेशीं आणि समाजाशीं मिळतं घेऊन अथवा जुनी घडी शक्य तो सुधारण्याचा प्रयत्न करून या पुढचा काळ कंठतील काय ? कीं आताशा इंग्लिश अमेरिकन मासिकांतल्या लघुकथांतून वरचेवर आढळणाऱ्या लष्करी आयुष्यांतील साहसाबरोबरच त्यांतल्या गौरवाला आणी चैनीला चटावल्यामुळें साध्यासुध्या शांत राहणींत रमण्याचं नाकारणाऱ्या इंग्रज आणि अमेरिकन तरुणांप्रमाणेंच या आमच्या हिंदी तरुणांचीही स्थिति होणार आहे ?...

परंतु असले गंभीर विचार करण्या इतपत अवधि नव्हता. मिरजेवर आम्हाला चहा घ्यायचा होता आणि गाडी बदलायची होती. आता आगगाडीच्या प्रवासाचा आम्हाला अगदी कंटाळा आला होता. केवळ घरी जाण्याची ओढ होती म्हणूनच आम्हीं यानायातीनं कोल्हापूरच्या गाडींत बसलों. गाडी सुरू झाली, जयसिंगपूर हातकणंगलं, रूकडी हीं सारी एकाद्या ओळखीच्या माणसाप्रमाणें वाटणारीं स्टेशनं मागं पडलीं कोल्हापूर जवळ येऊं लागलं तशी आमची अधीरता वाढूं लागली. आता प्रवास केव्हां संपेल, आणि कोल्हापूरच्या स्टेशनवर उतरून आमचा टांगा चिरपरिचित रस्त्यांनं घरापर्यंत केव्हां जाईल असं आम्हाला झालं होतं.

आम्ही ता. २८ डिसेंबर रोजी रात्रीं अकराला घरीं पोचलों. तेव्हा. बेबी रोहिणी निजली होती. पण मी तिला मुद्दाम उठवून जवळ घेतलं. माझी कल्पना होती कीं आम्हाला पाहून तिला आनंद होईल. पण ती अशा कांहीं बावरलेल्या दृष्टीनं आमच्याकडे पाहूं लागली कीं गेल्या दहाबारा दिवसांत आम्ही तिच्या दृष्टीस न पडल्यामुळें आम्ही तिच्या

दृष्टीस न पडल्यामुळें आम्ही कायमचेच खतम् झालों असं जणूं तिनं ठरवलं होतं, व आम्ही पुढें आहोंत हें तिला खरंच वाटत नव्हतं. पण नंतर चारपांच मिनिटांतच तिची नजर पालटली व ती हसून आम्हांला बिलगली. तें पाहतांना मला जो आनंद झाला तो साऱ्या प्रवासाच्या आनंदाहून जास्त होता. मी मनाशी ठरवलं की पुन्हां बेबीला सोडून प्रवासाला जायचं नाहीं. परंतु हें वाटणंही तेवढ्यापुरतंच होतं. कारण आता पुन्हा जेव्हां आम्ही दूरच्या प्रवासाचे बेत करतों तेव्हा बेबीला बरोबर न्यायची कीं घरीं ठेवायची असा प्रश्न आमच्यांत निघतोच!

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 983
शाखा
REFBK-0008143